
श्रीकाकुलम् —
गोदावरीच्या खोऱ्यातील लाल संग्रामाची चक्षुर्वै सत्यं हकीकत

पुढील अंकी — बुधवार दिनांक २६ ऑगस्ट १९७०

# माणूस

२२ ऑगस्ट १९७० : चाळीस पैसे

# रोखलेल्या बंदुका उठलेली जनता



२२ ऑगस्ट १९७०

# माणूस

| वर्ष : दहावे | संपादक | सहाय्यक |
| --- | --- | --- |
| अंक : अकरावा | श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर |
| | | सौ. निर्मला पुरंदरे |

| किंमत | वार्षिक वर्गणी | परदेशाची वर्गणी |
| --- | --- | --- |
| चाळीस पैसे | वीस रुपये | चाळीस रुपये |


## सप्रेम नमस्कार...

□ आपला ८ ऑगस्टचा अंक खूप आवडला. तेंडूलकरांची रातराणी अत्यंत वास्तव आहे. कारण तमाशाच्या संगीतबारीबाबतचे असे अनुभव प्रत्यक्ष अनुभवले आहेत. 'भंडारदऱ्याचे युद्ध' हा लेख खूप चांगला जमलाय. द्विसाप्ताहिक होणार त्याबद्दल अभिनंदन.

१० ऑगस्ट, १९७० — वसंत भोळ, मुंबई

□ विशेषांक छान वाटला. विशेषत: 'जितेन्द्र अभिषेकी', व. कृ. ची गोष्ट, भंडारदऱ्याचे युद्ध आणि सत्तेचाळीस सालातील सत्तेचाळीस दिवस सर्व लोकांचे अभिनंदन. परंतु 'हीरा कोल्हापूरकरीण'वर लिहून श्री विजय तेंडुलकरांनी आपले 'रातराणीचे' स्टँडर्ड कमी करू नये. सर्वांनीच तसा अभिप्राय दिला. तसेच काही-तरी लिहून कुणीही 'रातराणी' चालवू शकेल. पण तसे आपण करू नये.

११ ऑगस्ट, १९७० — अशोक गोखले, पुसद

□ आठ ऑगस्टच्या अंकात श्री. वा. वा. गोखले यांचा लेख वाचला. त्यामधील 'लाखोमे गुणवंत... ... छिपे न छिपाये' या ब्रिज भाषेतील कवितेचा अर्थ मला चुकीचा वाटतो. वास्तविक या कवितेचा अर्थ पुढीलप्रमाणे हवा. गुणी माणूस

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्र इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

लाखांतही ओळखू येतो. त्याचप्रमाणे दाता पाठीमागूनही ओळखला जातो. शंभर घुघटच्या आत जरी चंचल स्त्री ठेवली तरी तिच्या चचलतेस बाघ घालणे शक्य नाही, तिची चचलता लपवणे शक्य नाही. मला वाटते. श्री. जितेन्द्र अभिषेकीनाही ह्याच अर्थ अभिप्रेत असावा.

भंडारदऱ्याचे युद्ध केवळ अभ्यापूर्ण व विचारास चालना देणारे. विशेषत: शेवटचा भाग तर अप्रतीमच. मला वाटते, जमीनीवरून चालणाऱ्यास ठेच लागण्याचा प्रश्न येतो. हवेतून तरंगणाराना......

**१२ ऑगस्ट, १९७०** — **श्यामसुंदर जाजु**, बार्शी

◻ नेहमीची सदरे आणि अभिषेकीचे ‘ संगीत ’ असलेल्या आपल्या ८ ऑगस्टच्या विशेष अंकात कर्नल जाधवांनी माझ्या मते सर्वांना खाऊन टाकले. अगदी नजदीक फायर करून ! रॉबिनहूड, तीन शिलेदार इ. लहानपणी वाचून स्वप्नाळू बनलेल्या माझ्यासारख्याला शौर्य व साहसाचा हा पूर्वार्ध वाचून ते दोन्ही हिरो पुन्हा भेटल्यासारखे वाटले. अशा हकिकती मिळवण्याचा व सादर करण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करावा. प्रेमाच्या, स्वप्नरजनीय कथाकादबऱ्यांच्या अमली नशेतून आजच्या तरुणाना आपणच जागे करू शकाल.

भडारदऱ्याचे युद्धसुद्धा पहिल्या झपाट्यात वाचून टाकले. बाकीचे साहित्य निवांतपणे वाचण्याजोगे ! असो.

**८ ऑगस्ट, १९७०** — **प्रमोद शंकर खोपकर**, मुंबई

◻ आताच ‘ माणूस’च्या ८ ऑगस्टच्या अकातील कर्नल जाधवांच्या ‘ सत्तेचाळीस सालातील सत्तेचाळीस दिवस ’ या चित्तथरारक अनुभवकहाणीचा पूर्वार्ध वाचून सपवला. लगेच लिहायला बसलो. कारण धमन्यातून सळसळून वाहू लागलेले रक्त स्वस्थ बसू देईना ! कृतघ्नते तुझं नाव पाकिस्तान...अस चित्कारावं वाटू लागलंय. खरंच गेल्या २३ वर्षात आपण स्वातत्र्य मिळूनही हळूहळू स्वाभिमानशून्य बनत चाललो आहोत. मागे इथे आलेल्या एका परदेशी प्रवाशाने Informal सवादात एक शका व्यक्त केली होती—‘ You Indians in your veins have blood or mud ?’ मी निरुत्तरच झालो होतो. आज कर्नल जाधवाच्या एका untold story नं जाणीव करून दिली. अशा अकथित सत्यकथा, तरुण पिढीला वारंवार वाचायला मिळतील तर आपल्या रक्तात प्रवाही उष्णता भिनेल आणि सध्याचा गतिहीन कर्दम वितळून जाईल.

खरंच, एक वाहणारी जखम उघडी करून दाखवल्याबद्दल कर्नल जाधवाचं अभिनदन ! आणि आज २४ व्या स्वातत्र्यदिनाच्या उबरठ्यावर On thorns of liberty we still bleed ही जाणीव करून देण्याचे औचित्य साधल्याबद्दल आपल्याला धन्यवाद ! सपादकमहाशय, ‘ सत्तेचाळीस दिवसा ’चा उत्तरार्ध जरा लवकरच पाठवा न !

**१० ऑगस्ट, १९७०** — **रमेश सप्रे**, पणजी

# मायाळू प्रेमळ समाजवादी सरकारचा नवा पराक्रम !

हे ल्या पंधरा ऑगस्टच्या निमित्ताने काही अ-राष्ट्रीय आणि अ-समाजवादी विचार डोक्यात डोकावू पाहत आहेत. पण एक जागृत भारतीय नागरिक म्हणून डोकं हलवून हलवून आपण हे नतद्रष्ट विचार डोक्यातून झटकून टाकीत आहोत. पुन्हा पुन्हा. आणि राष्ट्रप्रेमाने ठिबकत असलेल्या विचारांना प्रयासाने पाचारण करून आपण भारावून जाण्याचा प्रयत्न करीत आहोत. जय भारत ! जय समाजवाद ! देशप्रेमाने भारलेल्या, समाजवादाच्या अतीव निष्ठेने ओथंबलेल्या काही गोष्टी ऐकवू ? हुश्शार ! रुमाल वगैरे सज्ज ठेवा. हळवे असाल तर अश्रू ढाळाल. नसाल तर निदान गहिवराल तरी. स्वातंत्र्यपूर्व काळातल्या गोष्टी कसल्या ऐकता ? या नव्या अतीव राष्ट्रप्रेमाच्या अपरंपार समाजवादी निष्ठेच्या एक-दोन गोष्टी ऐका ! आपण तर सांगायच्या आधीच गहिवरू लागलो....

असो. तर गोष्ट आहे औषधाच्या किमतीची. एकेदिवशी भल्या पहाटे आपल्या समाजवादी सरकारने जाहीर केलं. औषधांच्या किमती खाली उतरविल्या जातील. खबरदार कारखानदारांनो. तुमचे दिवस आता सपत आले. नफा कमविता काय. थाबा आता थोडे दिवस. आम्ही नवी ड्रग्ज कंट्रोल ऑर्डर काढीत आहोत. मग तुमच्या गमजा चालणार नाहीत. तुम्हाला फटाफट किमती खाली आणाव्या लागतील. आमच्या गोरगरीब जनतेला परवडतील अशा औषधांच्या किमती आल्या पाहिजेत.

गोरगरीबांमध्ये आनंदी आनंद पसरला. औषधांच्या किमती खाली येणार काय ? वा ! काय प्रेमळ सरकार आहे हो ! आणि दुसऱ्या बाजूने औषध कारखानदारांचा

गिल्ला सुरू झाला. आम्ही विरोध करू. सरकारशी भांडू. किमतीमध्ये कपात आम्ही सहन करणार नाही वगैरे वगैरे. आता हे औषध कारखानदार कसे नफे कमवितात हे काय कुणाला माहित नाही. एकेका बाटलीवर शभर टक्के दीडशे टक्के नफा म्हणजे काहीच नाही. चारशे पाचशे टक्के नफा म्हणजे काही तरी धंदा अशी यांची समजूत. एक पेडियाट्रिक ड्रॉप्सची बाटली घ्या. बाटली असेल तुमच्या करंगळी एवढी. ती असेल पाऊण भरलेली. किमत असेल पाच सहा रुपयांच्या वर. बाटली पूर्ण भरलेली नसतेच. त्यावर कारखानदारांचा नफा किती म्हणाल तर तीनशे टक्के. आपण ज्या ताप, सर्दी, डोकेदूखीच्या फॉर्म्युला गोळ्या वापरतो, त्याच्यावर कारखानदारांचा किती टक्के फायदा असतो हे तुमच्या डॉक्टरांना जाऊन विचारा. त्या गोळ्यांसारखेच डोळे पांढरे कराल.

अशा या दुष्ट कारखानदारांना वठणीवर आणण्याचे आमच्या प्रेमळ, पराक्रमी, समाजवादी सरकारने ठरविले. ही काय कमी गोष्ट झाली. या कारखानदारानी केवढे आकाड-तांडव केले. मुंबईमध्ये रोज बैठकी, सभा, प्रेस-कॉन्फरन्सेस आणि मुंबईच्या इंग्रजी वर्तमानपत्रांमध्ये रोज हात-हातभर बातम्या. बातम्यांवरून कळत होते या कारखानदाराची हबेलहंडी उडाली आहे. सरकारने यांचा कान धरून ची ची करीत गुडघ्यावर आणले आहे. गोरगरीब जनता खूष झाली होती. आणि कारखानदार लोक घाबरले होते. गरम झाले होते. धंदा सोडण्याची भाषा करू लागले होते.

एकूण असे वातावरण असताना एक ऑगस्ट रोजी औषधाच्या किमतीची नवीन ऑर्डर आली. खर म्हणजे दोन तीन ऑगस्टपर्यंत कुणालाच काही कळेना. बरीचशी औषधं तर मिळेनाशी झालीत. दुकानदारांना नवे दरच मिळाले नाहीत. कारखानदारानी याद्या पाठविल्या नव्हत्या.

शेवटी याद्या आल्या. आपल्या प्रेमळ, पराक्रमी, समाजवादी सरकारने सुचविल्याप्रमाणे सर्व औषधे नव्या किमतीत विकायला सुरुवात झाली. सर्वत्र आनंदी आनंद झाला. आपल्या समाजवादी सरकारची ही मोठीच मिळकत होती. औषध कारखानदारांना आपल्या मालाच्या किमती बदलायला लावणे ही काय कमी गोष्ट झाली! किमती बदलल्यात ना. झालं तर मग. आता चुकून बऱ्याचश्या कारखानदारांनी काही औषधाच्या किमती कमी करायच्या ऐवजी वाढविल्या आहेत ही गोष्ट खरी आहे. पण त्याकडे गोरगरीब जनतेनी दुर्लक्ष करायला हवं.

हेही खरं, आपण जी औषधं नेहमी वापरतो त्यांच्याच किमती दोन टक्क्यापासून शंभर टक्क्यापर्यंत वाढल्या आहेत. उदाहरणार्थ नेहमीच्या क्वीक रिलीफ गोळ्या, व्हिटॅमिन्स् पोषक द्रव्ये, इन्शुलिन, अँन्टासिडस्, मल्टीव्हिटॅमीन्स्, आणि इतर अनेक नेहमी लागणारी आवश्यक औषधं. यांच्या किमती चिकार वाढल्या आहेत. इतर काही औषधं की जी क्वचितच वापरली जातात, समाजाच्या वरच्या थरातच

उपयोगात आणली जातात त्यांच्या किमती कमी झाल्या आहेत.

आता या गोष्टी केवळ नजरचुकीने झाल्या आहेत यात मुळीच शंका नको. खूप विकली जाणारी, नेहमी लागणारी औषधं आता महागली आहेत. कमी विकली जाणारी आधीच महागडी औषधं थोडी खाली उतरली आहेत. म्हणजे त्यात फायदा कारखानदारांचाच असे काही लोक म्हणतात. पण या लोकांना एवढी साधी गोष्ट कळत नाही की कारखानदारांनी सगळ्याच औषधांच्या किमती कुठे वाढविल्या आहेत? सगळ्याच औषधांच्या किमती वाढविल्या असत्या तर? काही औषधांच्या कमी केल्यात ना! आणि त्या कुणाच्या दडपणाने? आमच्या प्रेमळ, पराक्रमी, समाजवादी सरकारच्या आज्ञेवरून! ये ब्बात! याला म्हणतात सरकार महाराजा! फक्त काही औषधांच्याच किमती वाढू देणे आणि इतरांच्या कमी करायला लावणे या गोष्टीला काय कमी टॅक्ट लागते? आपल्या समाजवादी सरकारजवळ ती आहे ही आपली केवढी परमभाग्याची गोष्ट! (इथे आपल्याला भरून आलं आहे.)

आपलं मायाळू, प्रेमळ, पराक्रमी, समाजवादी सरकार एवढ्यावरच थांबले नाही. गोरगरीबांसाठी एवढी मोठी गोष्ट करूनही त्याचं समाधान झालेलं नाही. परवाच रसायन खात्याचे मंत्री डॉ. त्रिगुण सेन यानी पार्लमेंटात डरकाळी फोडली खबरदार कारखानदारांनो, अजूनही तुम्ही किमती सुधारल्या नसतील तर सरकार त्या दुरुस्त करायला लावील. आपल्या ममताळू सरकारच्या प्रेमळ मंत्र्यांचा केवढा हा दरारा.

क्षयरोग–विरोधी औषधं, व्हिटॅमिन्स, वेदना कमी करणारी औषधं, सर्दी पडशावरची औषधं यांच्या किमती वाढलेल्या ऐकून डॉ. सेनांना सहाजिकच वाईट वाटलं पण ते म्हणाले, काय करणार? इलाज नाही. आपण बऱ्याचशा गोष्टींची आयात थांबविली आहे ना. म्हणून असं होतंय. पण बघू. यांच्याही किमती कमी करणार


## पुरंदऱ्यांची दौलत

**नऊ पेशवेकालीन कथा**

**ब. मो. पुरंदरे**

**किमत : साडेतीन रुपये**

**राजहंस प्रकाशन**

प्रयत्न करू. या माणसाची गोरगरीबांविषयीची तळमळ मोठी आहे असंच यावरून सिद्ध होत नाही का ?

काही दुष्ट लोकाना आपल्या समाजवादी सरकारचा ममताळूपणा बघवत नाही म्हणून ते वाट्टेल त्या अफवा पसरवितात. आपण गोरगरीबांनी त्यावर विश्वास ठेवू नये. डॉ. सेन यानी पार्लमेंटात सावधान म्हणून कारखानदारांना धमकी देताच गोर-गरीबांचे तथाकथित प्रतिनिधी म्हणविणाऱ्या विरोधी पक्षीयांच्या उरात धडकी भरली म्हणे. आणि कारखानदारांना आनंदाच्या उकळ्या फुटल्या. आता यात काही अर्थ ?

जाता जाता आणखी एक इषारा देऊन ठेवतो. जॉर्ज फर्नांडीस नामक एक उपद्-व्यापी गृहस्थ मुबईतून लोकसभेवर निवडून गेले आहेत. ते कुणावरही वाट्टेल ते बेजबाबदार आरोप करतात. त्यांच्या आरोपांवर विश्वास ठेवू नका. फर्नांडीस सयुक्त समाजवादी पक्षाचे आहेत. त्यामुळे आपल्या गोरगरिबांच्या, ममताळू, प्रेमळ, परा-क्रमी सरकारचा समाजवाद त्याना सहन होत नाही म्हणून हा आक्रस्ताळेपणा.

परवा या इसमानी लोकसभेत काय आरोप केला माहित आहे? सत्ताधारी कॉंग्रेसने म्हणे नवी ड्रग कट्रोल ऑर्डर काढण्यासाठी औषध कारखानदारांकडून सत्तर लाख रुपयाची लाच घेतली ! या बोलण्याला काही अर्थ. या आरोपातून अगदी शब्दाशब्दातून फर्नांडीसचा कसा कुत्सितपणा दिसतो बघा. आरोपाचा अर्थ कार-खानदारांना किमती वाढवून देण्याची परवानगी दिली आणि त्यासाठी पैसे घेतले. आता किमती फक्त काहीच औषधांच्या वाढल्या आहेत. सर्वच नाही हे आपणाला माहित आहे. त्यामुळे हा आरोप किती फुसका आहे हे कळून येते. आणि समजा कारखानदारांकडून पैसे घेतले तर फर्नांडीसच्या पोटात काय म्हणून दुखावं हो ? त्याला पुन्हा त्यानी लाच म्हणावं ? समाजवादी कॉंग्रेसचा हा घोर अपमान आहे. कॉंग्रेस पक्ष चालवायला काही पैसे लागत नसतील ? त्यासाठी काही श्रीमंत कार-खानदारांनी देणगी दिली तर काय बिघडलं ? पण हे सं. सो. पा. वाले नेहमी असेच काहीतरी बोलतात.

असो, तर आपल्या प्रेमळ, पराक्रमी, समाजवादी सरकारचा ममताळूपणा पटायला ही गोष्ट पुरी आहे दुसरी एक गोष्ट आहे. पण ती गोष्ट अजून चालू आहे. तिचा अजून पूर्णविराम झालेला नाही.

गोष्ट आहे गॅसच्या किमतीबद्दलची – चार – सहा महिन्यापूर्वी – किंवा त्याही अगोदर – सरकारनं तेल कंपन्याना तंबी दिली होती की घरगुती कामासाठी जो गॅस वापरला जातो त्याच्या किमती कमी करा. त्याप्रमाणे घरगुती कामासाठी गॅसच्या जो सिलिंडर १६·५६ रु. ला मिळतो त्याची किंमत लवकरच दोन–तीन रुपयांनी कमी होणार असं जाहीर झालं होतं.

आम्ही रोज वाट पाहतो. अजून बातमी आली नाही. पण एक दिवशी जरूर

येईल. गॅस–सिलिंडरच्या किमती दोन–तीन किंवा चार रुपयांनी वाढल्या म्हणून. आपल्या प्रेमळ, पराक्रमी, समाजवादी सरकारला बड्या तेल कपन्यांना दुखवून चालणार नाही. कधी तरी बातमी येईलच. ◻

# तेथे पाहिजे जातीचेच ...

नेमेचि येणाऱ्या पावसाळ्याप्रमाणे महाराष्ट्र विधानसभेच्या याही अधिवेशनात विरोधी प्रश्नप्रणीत अविश्वासाचा ठराव आला आणि सत्ताकाँग्रेसच्या प्रचंड बहुमताने तो फेटाळला गेला विरोधी पक्षाजवळ एवढी भक्कम दारू होती. पण त्याच्या सगळ्याच भाषणाचे बार साधारण फुसकेच निघाले. कारण मागच्या वेळच्यासारखी नवी प्रकरणं त्यानी काही काढली नव्हती. या उलट काँग्रेसचे लोकच आक्रमक वाटले. काँग्रेसमध्ये बोलणारे तसे कमीच. सबध प्रश्नोत्तराच्या तासात विरोधी पक्षाचे लोक आणि मत्री याच्यातच चकमकी झडत असतात. काँग्रेसचे लोक जणू काही या राज्यात चाललेल्या गोष्टीचा आपल्याशी काय संबध या थाटात मख्ख बसलेले असतात. हात वर करायच्या वेळी, होय–नाही म्हणायच्या वेळी आणि अविश्वासाच्या ठरावाच्या वेळी ते हजर असतात. मारून मुटकून बोलतात. त्यात फार दम असतोच असं नाही. पण यावेळी त्यानी थोडा आक्रमकपणा दाखवला हे खरं.

पण सागायचं आहे ते विरोधी पक्षनेते श्री. कृष्णराव धुळूप याच्या भाषणाबद्दल. त्यांनी काँग्रेसची एवढी झकास रेवडी उडविली की काँग्रेसवालेही एकदम खूष. त्याच्या भाषणाच्या वेळी हंशा टाळ्यामध्ये मत्रीही सामील होताना दिसत होते. त्यातलेच काही किस्से –

– परवा म्हणे यानी निर्णय घेतला होता अधिवेशन तहकूब करण्याचा. नंतर लगेच मागे घेतला. का तर म्हणे बाईंना अडचणीत टाकायचं नाही ! वा ! हे म्हणे बाईंना अडचणीत टाकणार ! (तोंड पहा.) अहो तुम्ही काय सागताय ! भल्या भल्यांना बाईंनी अडचणीत टाकलंय. ज्याच्या इशाऱ्यासरशी राज्यच्या राज्य हलायची त्या किंगमेकर्सना आणि पंडितांना बाईंनी भुईसपाट केलं. आणि तुम्ही आम्हाला बाईंना अडचणीत टाकण्याच्या गोष्टी सागता काय –

–महाराष्ट्राचा महान सह्याद्री हिमालयाच्या रक्षणासाठी धावून गेला होता. अहो, त्या सह्याद्रीची या बाईंनी पर्वती टेकडी करून टाकली. आणि त्याना म्हणे तुम्ही अडचणीत आणणार–

– प्रधानमत्र्याच्या शब्दासरशी तुमची गाळण उडते. त्यांना भेटायला जायचे

असल्यास मध्यस्थ कोण घालावा याचा विचार करता करता तुमच्या डोक्याचे केस जाताहेत आणि तुम्ही कोण बाईंना अडचणीत टाकणार ? –

– दिल्लीच्या सत्तेचा गोवर्धन बाईंनी आपल्या करंगळीवर उचलून धरला आहे, तुम्ही गोपाळ कशाला उगाच काठ्या लावताय. तुम्ही तुमच्या काठ्या खाली केल्याने तो गोवर्धन कोसळणार थोडाच आहे –

– तुम्ही मारे नेत्यांवर विश्वास ठेवण्याच्या गप्पा मारता. पण तुमच्या नेत्याचा तरी तुमच्यावर विश्वास आहे का ? आपण दिल्लीला गेलात. बाई आपल्याला किती वेळ भेटल्या ? फक्त तीन मिनिटं. बाई गेल्या काश्मीरला निघून आणि तुम्ही बसलात वाट पाहत –

वगैरे वगैरे.

हरे राम ! एवढी टिंगल काँग्रेसच सहन करू जाणे. त्यासाठी तशीच जाड कातडी पाहिजे. काँग्रेसच्या लोकांच्या कातड्या आहेतही म्हणा तशाच जाड. त्याशिवाय का हे असे घडते ? त्याशिवाय का टीका सहन करूनही मंत्रीलोक वाटेल ते प्रकार करीतच राहतात. तेव्हा तेथे पाहिजे जातीचेच.

पण परवा दिल्लीहून बेळगाव–कारवार वगैरे बाबतीत जो नवा तोडगा ऐकू आला त्याचे आश्चर्य वाटले नाही. लवाद किंवा सार्वमत एवढा साधा तोडगा आतापर्यंत का सुचला नव्हता ? त्यामुळे बाईंवरची जबाबदारी टळते आणि प्रश्नही पुढे ढकलला जातो. हा तोडगा आधीच यायला हवा होता.

**– अरुण गोसावी**

भूमि-प्रश्नावर देशातील दोन समाजवादी पक्ष एक झाले
आणि ९ ऑगस्टपासून भूमि-आंदोलनाला सुरुवात झाली.

या आंदोलनाचे स्वरूप, यशापयश, होणारे परिणाम
याची चर्चा सर्वत्र चालूच आहे.

यानिमित्ताने महाराष्ट्रापुरता
हा प्रश्न नेमका काय आहे
याची अधिक खोलात जाऊन केलेली चर्चा ..

# भूमि – आंदोलन

**विजय वैद्य**

पूर्वीपासूनच ऑगस्ट महिन्याने अनेक महत्वपूर्ण घटनाची नोद केलेली आहे. १ ऑगस्ट १९२० रोजी भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे सेनानी नरकेसरी लोकमान्य निधन पावले व त्याचवेळी एक नवा सेनानी लढ्याचे नेतृत्व करण्यास पुढे आला. बेचाळीस सालच्या ९ ऑगस्ट या दिवशी तर स्वातंत्र्यलढ्याच्या एका फार मोठ्या व दैदिप्यमान अशा पर्वाला आरभ झाला. त्यानंतर तब्बल तीन वर्षांनी म्हणजे १९४५ च्या ६ व ९ ऑगस्ट रोजी अनुक्रमे हिरोशिमा व नागासाकी या शहरावर अण्वस्त्रे टाकण्यात आली. मानवी इतिहासातील हे दोन काळेकुट्ट दिवस.

यानतर ४७ साल उजाडले आणि सत्तेचाळीस् सालातील ऑगस्टमध्ये भारतीय उपखंडात स्वातंत्र्याचा उदय झाला. पण हा उदय फाळणीचा व जातीय दंग्याचा शाप घेऊन आला होता, तरीही जवळजवळ दिडशे वर्षे पारतंत्र्यात काढल्यानंतर अत्यंत खडतर तपश्चर्येनंतर मिळालेले स्वातंत्र्य होते हे, म्हणूनच सर्व काही विसरण्याचा प्रयत्न भारतीय जनतेने केला. स्वकीय सरकार देशाला व पर्यायाने सामान्यजनाना आता सोनियाचा दिवस दाखविण्यास वचनबद्ध झाले होते या भावनेने जनसामान्यांत उत्साही वातावरण संचारले होते. पण आज स्वातंत्र्य प्राप्तीच्या २३ वर्षांनंतरही देशाचे चित्र फारसे बदललेले नाही. सामान्याचे चित्र विदारकच आहे. हजारो वर्षे नाडल्या गेलेल्यांची स्थिती आजही कायम असून या ना त्याप्रकारे त्याची

पिळवणूक अजूनही चालूच आहे. यातूनच वेळोवेळी असतोषाचा उद्रेक होतो व त्या वेळी सरकारला जाग येते. मोर्चे, निदर्शने हा तर नित्याचाच प्रकार होऊन बसला आहे.

सर्व सामान्याच्या काही महत्त्वपूर्ण प्रश्नाना वाचा फोडण्यासाठी ऑगस्टच्या ९ तारखेपासून स स. पक्ष व प्र. स. पक्ष यानी भूमि–आदोलनाला सुरुवात केली.

विरोधी पक्षातर्फे हे आदोलन सुरू होत असल्याने निवडणुकावर डोळा ठेऊन हे आदोलन सुरू करण्यात आल्याचा आरोप अनेकानी त्याच्यावर केला आहे. अर्थातच सत्ता मिळविण्याचा प्रयत्न करणे वा त्याकडे लक्ष ठेवणे यात राजकीय पक्षाच्या दृष्टीने गैर असे काहीच नाही. तरीही वरील प्रकारचा आरोप करून भूमिहिनाच्या प्रश्नाचे व या चळवळीचे गाभीर्य कमी करून कसे चालेल, अत्यत व्यापक दृष्टीनेच या ऐतिहासिक महत्त्वाच्या प्रश्नाकडे सर्वांनी पाहणे जरूरीचे आहे. सामान्याच्या अडीअडचणीचा त्याच्या निकडीच्या प्रश्नाचा फायदा घेऊन त्याच्यातील असतोष भडकविण्याचा प्रयत्न साम्यवादी व नक्षलवादी करीत असतात तेव्हा देशाबाहेर निष्ठा असलेल्या या लोकाकडे या चळवळीची सूत्रे जाऊ नयेत असे वाटत असेल तर सर्वांनीच या प्रश्नाकडे योग्य त्या दृष्टीकोनातून पहाणे व सरकारनेही या प्रश्नाची निकडीने दखल घेणे अत्यत जरूरीचे आहे.

आजही काही मूठभर लोकाच्या ताब्यात शेकडो एकर जमिनी आहेत. या जमिनीचे फेरवाटप होणे आवश्यक आहे.

आचार्य विनोबा भावे यानी भूदान चळवळीला आरंभ केला आणि त्याना या भूदान यज्ञात एकूण ४२ लक्ष एकर जमीन दान मिळाली. (अर्थातच यापैकी अनेक 'दनशूरा'नी ज्या जमिनीचा काही उपयोग नाही अशा जमीनी या भूदान यज्ञाला देऊन आपली वारेमाप प्रसिद्धी करून घेऊन 'दानशूरपणा'चा शिक्का मोर्तब करून घेतला हा भाग निराळा.) त्यापैकी १२ लक्ष एकर जमीन एकूण ४ लक्ष ६० हजार भूमिहीन कुटुबाना वाटण्यात आली. सरकारी यत्रणा मागे नसताही आचार्य भावे जे काम करू शकतात तशाच प्रकारचे काम सरकारला निरनिराळ्या प्रकारे करणे जड नाही. मात्र अजूनपर्यंत या प्रश्नाकडे सरकारने ज्या आस्थेवाईकपणे पहाणे जरूर आहे तसे पाहिले असावे असे दिसत नाही. नुसते कायदे करून या प्रश्नाची उकल कशी होणार ? येथे काटेकोर अंमलबजावणीच झाली पाहिजे. भूमिहिनाच्या प्रश्नाशी इतर अनेक प्रश्न, विशेषत: बेकारीचा प्रश्न निगडीत असल्याने या दोन्ही प्रश्नाची सोडवणूक एकाच वेळी करावी लागेल. आज अनेक कारणानी शेतजमीन कमी कमी होत आहे–कारखाने इत्यादीच्या उभारणीसाठी अशी लागवडीखालील जमीन जाते. तर धरणाच्या पाण्याखाली बुडाल्यामुळेही शेतजमिनीचे क्षेत्र कमी होते, अशावेळी थोडया लोकांनी शेकडो एकर जमीन स्वत.च्या हातात ठेवणे सामाजिक व आर्थिक अन्यायाचे आहे म्हणूनच जमिनीची फेर वाटपणी आवश्यक ठरते.

प्र. स, सं. स. प. च्या या ' जमीन फेरवाटप ' आंदोलनाच्या निमित्ताने महा-राष्ट्रातील या प्रश्नाचा आढावा घेणे उद्‌बोधक ठरेल.

जमीन धारणेची महाराष्ट्रातील पहिली पहाणी १९५२–५३ साली ' सेन्सस ऑफ होल्डिंग्ज'तर्फे झाली. त्यानुसार खानेसुमारीत असे आढळून आले की ५ एकरां-पेक्षा कमी जमीन असलेले खातेदार ४४ टक्के होते व त्यांच्याकडे एकूण जमिनीच्या अवघी ७·५० टक्के जमीन होती.

सुमारे ६ ते १५ एकरांपर्यंत जमीन असलेल्या खातेदारांचे प्रमाण ३१·७ टक्के होते व त्यांच्या हाती ३५ टक्के जमीन होती, १६ एकरापेक्षा अधिक जमीन धारण करणाऱ्या खातेदारांची टक्केवारी होती २४·४० व त्यांच्याकडील जमिनीचे प्रमाण ५८·५० टक्के एवढे होते. याचा अर्थ जवळजवळ निम्म्या खातेदारांना फक्त ७·७० टक्के एवढयाच जमिनीवर अवलंबून रहावे लागत होते.

ही तफावत नष्ट करून विषमता कमी करण्याच्या दिशेने प्रयत्न झाले. निर-निराळया राज्यात जमीन फेरवाटपाची अनेक विधेयके झाली पण अनेक राज्यांतील कमाल जमीन-धारणा कायदा सदोष असल्याने याचा सर्वात अधिक फायदा जर कोणी घेतला तर तो सधन शेतकऱ्यांनी व बडया बागायतदारानी.

महाराष्ट्रात १९५५ साली कूळकायद्याला दुरुस्ती जोडण्यात येऊन कुळाला क्रमाक्रमाने शेत जमिनीचा मालकी हक्क मिळण्याची तरतूद करण्यात आली. पण याची खूप ठिकाणी अमलबजावणी होऊनही अजूनही हे काम अपूर्णच राहिलेले आहे. एकसष्ट साली ' कमाल जमीन-धारणा कायदा झाला असून त्याची अंमल-बजावणी अजूनही चालूच आहे. कुळकायद्याची अंमलबजावणी कशा प्रकारे झाली हे पहाण्याकरिता महाराष्ट्रातील एका विद्यापीठाने केलेली पहाणी अभ्यास फारच उद्‌बोधक ठरेल. पण तत्पूर्वी ' नॅशनल सँपल सर्व्हे 'ने त्यांच्या १६ व्या फेरीत (१९६०–६१) कसणाऱ्या खातेदारांचे व त्यांच्याकडील जमिनीचे गटवार टक्के-वारीने केलेले वर्गीकरण पाहू.

**कसणाऱ्या खातेदारांचे व त्यांच्याकडील जमिनीचे गटवार टक्केवारीने वर्गीकरण (महाराष्ट्र)**

| गट | खातेदार टक्के | जमीन टक्के |
|---|---|---|
| १ एकरापेक्षा कमी | ४·८९ | ००·१९ |
| ५ एकरापर्यंत | ३७·३६ | ०६·७० |
| ५ ते १५ एकर | ३४·५६ | २३·८६ |
| १५ ते ५० एकर | २४·२६ | ४९·२० |
| ५० एकराच्या वर | ०३·२७ | १९·९७ |

वरील तक्त्यात भूमिहीन शेत मजूरांचा समावेश नाही. पण वरील तक्त्यावरूनही

लक्षात येते की बड्या शेतकऱ्याकडे बरीच जास्त जमीन असावी असे म्हणायला जागा आहे. ही स्थिती १९६०–६१ सालची आहे.

आता कुळकायद्याची अमलबजावणी कशी झाली ह्यासंबधीच्या पाहणी-अभ्यासातील निष्कर्ष पाहू.

१. साल १९५६–५७ ते १९६४–६५ च्या काळात कुळांना जमिनीचे मालक बनविण्याची प्रक्रिया पूर्ण झाली नाही. याची कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

(अ) विधवा किंवा अज्ञान यांच्या नावाने असलेल्या जमिनीवरील कुळांना त्या विकत घेण्याचा अधिकार देण्यात आला नव्हता. याचा उपयोग बड्या जमिनदारानी पूर्ण करून घेतला व त्याच्या काही जमिनी विधवा व अज्ञान यांच्या नावे केल्या. (ब) काही खातेदाराच्या जमिनी प्रत्यक्षात कुळाकडे होत्या पण त्याचा उल्लेख प्रत्यक्षात इन्क्वायरी रजिस्टरमध्ये करण्याचे तलाठी वा तत्सम अधिकाऱ्यांनी टाळले. त्यामुळे जवळ जवळ १४ टक्के जमीन जी कुळकसणुकीखाली येते ती वगळली गेली. (क) रेकॉर्ड ऑफ राईटस्‌मध्ये असलेल्या नोंदी चुकीच्या आहेत असे आढळल्याने काही प्रकरणे चौकशीतून गाळण्यात आली. (ड) काही कुळांनी जमिनी विकत घेण्याचे नाकारले किंवा हप्ते वेळेवर भरले नाहीत.

२. जास्तीत जास्त सवलती पदरात पाडून घेण्यासाठी काही जमीन मालकांनी वेगवेळ्या प्रकारे दडपण आणले होते.

३. रीतसर खरेदी झालेल्या जमिनीपैकी फार थोड्या जमिनीबाबतची आन्तीम प्रमाणपत्रे कूळ खरेदीदाराला दिली गेली आहेत. त्यामुळे त्या खरेदीचा टिकाऊपणा काही अंशी अनिश्‍चितच आहे.

४. बहुतेक जमीन मालकांनी आपल्या कुळांचे राजीनामे लिहून घेतले. पण यातूनही कागदोपत्री जी संरक्षित कुळे राहिली त्याच्यापैकी अंदाजे ६७ टक्के कूळ मालक बनण्याचे काम १९६४–६५ पर्यंत पुरे झाले.

५. काही शेतमालक सामाजिक दृष्ट्या कनिष्ट जातीतील असल्याने त्यांना त्यांच्या जमिनी साधनांअभावी कसणे जमत नव्हते म्हणून तुलनेने वरिष्ट जातीच्या व ज्यांची आर्थिक परिस्थिती बरी होती अशांना खंडाने दिल्या. याचा फायदा घेऊन त्या लोकांनी जमिनी आपल्या नावावर करून घेतल्या.

याचा परिणाम जमीन मालकीतील विषमता वाढण्यात झाला. कुळ कायद्याने झालेल्या परिणामापेक्षा इतर कारणांनी झालेला परिणाम अधिक बलशाली झाला असावा असे दिसते. एकूण १०० खातेदारांत ८० खातेदारांना जमीन गमवावी लागली आहे. अठराजणाची स्थिती कायम टिकून राहिली आहे व फक्त दोघांनाच जमिनीची मालकी प्राप्त झाली. यापैकी जमीन गमावणाऱ्या ८० जणांपैकी सुरुवातीच्या काळात मध्यम स्थितीतील शेतकऱ्यांनी ते परगांवी गेल्याने किंवा इतर

पृष्ठ ६१ वर

ग्यानबा

# मुक्ताफळे

## □ इसापाने न सांगितलेली हत्तीची गोष्ट

**सा**पाला दूध पाजले तरी त्याचे वीष होते ! दुधाचे वीष करण्याचा गुणही वेळे-प्रसंगी अंगी असावा लागतो. म्हणून वर्षातून एक दिवस 'नागपंचमी' ला सापाची पूजा करावी व उरलेले ३६४ दिवस साप दिसला की ठेचावा, असे आपल्या शास्त्रकारांनी सागितले आहे. इजिप्तचा बादशहा ॲमोसिस याला एकदा हा प्रश्न पडला की सापाला दूध घातले, तरी त्याचे वीष का होते ? हा इसवी-सनापूर्वी सहाव्या शतकात गादीवर होता. इजिप्तच्या राज्यकर्त्यांची बुद्धी ही ॲमोसिसपासून तो नासरपर्यंत आहे तशीच आहे !

या राजाच्या पदरी एक गुलाम होता. कुरूप आणि तोतरा असलेला हा गुलाम बुद्धीने राजापेक्षा खूपच चांगला होता. ॲमोसिस राजाने या गुलामाला विचारले– 'सापाना दूध घातले तरी त्याचे वीष का होते ?' गुलाम म्हणाला– 'जहांपन्हा, जगात धर्माने सांगितलेली एक नीति असते, पोथ्या-पुराणात ती असते. परंतु जगात नीट जगायचे असेल तर निराळी नीति लागते. पशू हे परमेश्वराने म्हणूनच निर्माण केले. परंतु त्यांच्यापासून काही न शिकता माणसे त्यांची शिकार करून मास खाऊ लागले.... गाय माणसाला किती गोष्टी देते ? शेतीला बैल देते, मुलांना दूध देते. नको ते खाते परंतु त्याचे माणसाची आयुष्ये सतेज करणारे दूध होते ! परवर-दिगार तरी तुम्ही गाई कापून खाता...'

'हरामजादे तू बकवास क्यों कर रहे है ?' बादशहा एकदम पिसाळला.

गुलाम म्हणाला–'मालिक्...तुमच्या प्रश्नाचे उत्तर तर मिळेलच परंतु पुनः तुम्हाला कसला प्रश्न पडणार नाही अशा पशूच्या गोष्टी मी तुम्हाला रोज एक याप्रमाणे सांगेन. तुम्ही त्या ऐकाव्या...'

बादशहा रोज जेवण झाल्यावर पलंगावर लोळता लोळता मासिके वाचीत असे. यामुळे गोष्ट म्हटल्याबरोबर त्याच्या पोटात गोळा आला. तो म्हणाला–'हकिमत लंबीचवडी होती है और पढ़कर या सुनकर कुछ समझमे नही आता...'

गुलाम म्हणाला–'माझ्या गोष्टी अगदी इटुकल्या मिटकुल्या असतील. बाल-गीतांसारख्या. रोज एक दोन एक दोन मिनिटे लागतील. परंतु पुढची दोन तपे तरी तुम्हाला प्रश्न पडणार नाहीत.'

मग रोज गुलाम राजाला एक गोष्ट सांगे. राजा खूष होत चालला. तात्पुरता शहाणा होत चालला. प्रत्येक गोष्ट सांगून झाली की बादशहाच्या मूळ प्रश्नाशी गोष्टीचा संबंध आहे, हे सागण्याकरता गुलाम म्हणे—

'जहांपन्हा इति-साप !'

तेव्हापासून ॲमोसिस बादशहा, गुलामाला 'इसाप' अशी हाक मारू लागला. आणि या गुलामाच्या गोष्टी, इसापाच्या नीती कथा म्हणून सर्वजण वाचू लागले. शतकानुशतके लोक या गोष्टी वाचत आहेत.

इसापनीति वाचून माणसे शहाणी झाल्याचा पुरावा नसला तरी सर्व पशू मात्र इसापाच्या पशूप्रमाणेच वागू लागले आहेत ! फक्त या इसापनीतीत एक उणीव आहे. यात सर्व पशू आहेत...फक्त हत्ती नाही ! इजिप्तच्या वाळवंटात हत्ती असणार कुठून ? एका भारतीय हत्तीने घातलेला धुमाकूळ आम्ही परवा वर्तमानपत्रात वाचला, आणि हत्ती असा का वागला हे पहाण्यासाठी इसापनीति चाळली, तेव्हा आम्हाला हे कळले की यात हत्तीची गोष्ट नाही.

हा हत्ती असेल पस्तीस वर्षांचा. नर असो वा मादी असो — आपल्या दृष्टीने सगळे 'हत्ती'च असतात म्हणून आम्हीही तसेच म्हणतो. तर हा हत्ती पाच वर्षांचा असताना म्हैसूरच्या जंगलात पकडला गेला. जगातल्या नाना पशुसंग्रहालयात भारतीय हत्तींना मागणी असते. हा हत्ती पण पासपोर्ट काढून परदेशी निघाला. रशियातील अर्मेनियाची राजधानी येरेव्हन येथे त्याला मागणी आली होती. या हत्तीने मायभूमी सोडली. परदेशात परागदा होऊन देशाच्या स्वातंत्र्यासाठी मरून गेलेल्या क्रांतिकारकांना आपण विसरलो, तिथे या हत्तीला विसरलो यात नवल नाही. या हत्तीचे मूळ भारतीय नाव काय होते कुणास ठाऊक. कदाचित 'इंदिरा' असेल. कदाचित 'बर्चीबहाद्दर' असेल. परंतु रशियातील पशुसंग्रहालयात जाताच त्याचे नाव ठेवण्यात आले — 'व्होव्हा'. व्होव्हा रशियात वाढू लागला. लहान मुलांना पाठीवरून फिरवू लागला. व्होव्हा भारतीय आहे हे रशियन विसरले — तो रशियात आहे हे आम्हीही विसरलो.

वर्षामागून वर्षे गेली. या ऑगस्ट महिन्यात त्याचा ३६ वा वाढदिवस होता. ऑगस्टची एक तारीख असेल. मॉस्कोहून दोन रशियन पाहुणे सुटी घेऊन येरेव्हनला आले होते. दोघे रशियाच्या परराष्ट्रखात्यात नोकरीला होते. पोरांना घेऊन हे दोघे पशुसंग्रहालयात सायंकाळी आले. व्होव्हा पाठीवर हौदा घेऊन उभा होता. पोरांनी सर्वांची तिकिटे काढली आणि ही दोन्ही कुटुंबे हौद्यात बसली. व्होव्हा रपेटीला निघाला. गळ्यात घंटा वाजत होत्या, परंतु व्होव्हाचे लक्ष नेहमीप्रमाणे हौद्यात बसलेली माणसे काय बोलतात इकडे होते. पाठीवर बसलेल्या दोघांच्या बोलण्यात 'भारतीय' शब्द आला म्हणून त्याने कान टवकारले. आपले बोलणे कुणी भारतीय ऐकत आहे याची त्या दोघा रशियन अधिकाऱ्यांना कल्पना नव्हती. संभाषण चालू

होते रशियन भाषेत. परंतु व्होव्हाला आता रशियन समजत होते.

'आपण नुकताच चीनचा जो नकाशा प्रसिद्ध केला आहे त्यात भारतीय प्रदेश चीनचा दाखवला आहे. मला वाटते यामुळे भारतीय सरकार खवळेल ?'

'मुळीच राग येणार नाही. वांझोट्याच्या मुलांची जन्मपत्रिका आपण वाटेल-तशी प्रसिद्ध करू शकतो! स्वर्णसिंग परराष्ट्रमंत्री आहे. त्या दाढीवाल्याला—देशाचे केसभर वाकडे झाले म्हणून कधीही राग येत नाही. इंदिरा गांधीना ७२ च्या निवडणुकीत आपण पैसा देणार आहोत. कुणी रागावलाच तर त्याच्या टाळक्यावर ती बरोबर पाणी ओतील! भूपेश गुप्ता—डांगे ही आपलीच 'पेड माकडे' आहेत. 'मॉस्कोचा नाच आणि देशाला जाच' यात त्याची हयात गेली आहे.'

व्होव्हा सगळे ऐकत होता. संभाषण रंगात येत चालले होते. त्या उर्मट रशियन अधिकाऱ्याने आपल्या बोलण्यात, छत्रपतीचे अवमूल्यन केले आणि डांगे—भूपेश गुप्ता यांच्या अकलेचे गुणगान केले.

रपेट संपली. पशुसंग्रहालय बंद झाले. व्होव्हा ठाणबंद झाला. सगळीकडे अंधार पसरला. व्होव्हा अस्वस्थ होता. भारतीय प्रदेशावर लाल भाईंनी तुळशीपत्र ठेवावे आणि भारताच्या सरकारला त्याची गंधवार्ता नसावी या गोष्टीचा संताप व्होव्हाला जाळू लागला. या पापी भूमीत आपण गेली तीस वर्षे सेवा करीत राहिलो आणि या चांडाळांची पोरेबाळे पाठीवर खेळवली याचा विषाद त्याला स्वस्थ बसू देईना. रात्रभर त्याला झोप नव्हती.

सकाळ झाली. माहुताने त्याला फिरवण्यासाठी मोकळा केला. पिसाळल्यासारखी त्याची अवस्था होत गेली आहे याची माहुताला कल्पना नव्हती. यामुळे समोरचे गुलामाचे खाणे उधळून व्होव्हा पशुसंग्रहालयाचे कवाड जमीनदोस्त करून धडकी-सरशी बाहेर उधळला तेव्हा जिवाच्या भीतीने तो पळत सुटला.

व्होव्हा येरेव्हनच्या हमरस्त्यावरून मोकाट सुटला. समोर उभ्या असलेल्या ट्रक आणि मोटारी उलथ्या पालथ्या करीत आणि टेलिफोन आणि दिव्याचे खांब आडवे करीत व्होव्हा निघाला. सर्वत्र हाहाःकार माजला. रशियन माणसे सैरावैरा पळत आहेत हे दृश्य पाहून व्होव्हाने आनंदाने चित्कार करायला सुरुवात केली. सर्वत्र टेलिफोन तारांची जाळी रस्त्यावर पसरू लागली. हत्ती मोकाट सुटल्याचे वृत्त गावात पसरताच दुकाने बंद झाली. रस्ते ओसाड झाले. सर्वत्र शुकशुकाट झाला. हलकल्लोळ माजला.

पुढचे २४ तास व्होव्हाने काय वाटेल ते केले. गाड्या उलटवल्या, कुंपणे उध्वस्त केली. बागा साफ केल्या. एका भिंतीवर धडक देताना त्याचा हस्तीदंत मोडला. असह्य वेदनांनी तो अधिकच बेभान झाला. जणू सूऽ सूऽ म्हणत अश्वत्थामाच उधळला होता.

असे फार काळ चालणे शक्य नव्हते. बुलडोझर घेऊन रशियन पोलीस त्याला

घेरू लागले. त्या रात्री तो सांपडला नाही. परंतु सकाळी त्याला गोळया घालून रशियनांनी ठार केले. व्होव्हा धरणीवर पडला. सूडाचा एक दिवस तो जगला परंतु या विलक्षण समाधानात त्याने प्राण सोडला.

४ ऑगस्ट १९७० च्या मॉस्कोहून आलेल्या बातमीत व्होव्हाला गोळया घालून ठार केला हे वृत्त आहे. ५ ऑगस्ट ७० च्या 'टाईम्स ऑफ इंडिया'त आम्ही हे वाचले. पाठोपाठ लोकसभेत नकाशांच्या प्रश्नावर काही मूर्ख राष्ट्रवाद्यांनी स्वर्णसिंगांवर चिखलफेक केलीच.

'व्होव्हा'ने जे केले ते अतिशय निंद्य होय. पार्लमेंटमधील नकाशावरील चर्चा वाचून, उद्या जर भारतात, रशियन वकिलाती उध्वस्त करीत लोक सुटले, अथवा इथे कोसिजीन येताच त्याला जोडयाने मारला, तर ते केव्हाही योग्य नव्हे. असा राग लोक आवरू शकले नाहीत, तर भूपेश गुप्ता व डांगे यांच्याकडेही लोकांचा क्षोभ वळायचा! 'सोविएत देश'च्या आणि त्यांच्या कचेऱ्यांच्या देखील होळया लोक करायचे. आम्ही म्हणतो दाखवला असेल थोडासा भारतीय प्रदेश चीनचा म्हणून! त्यात एवढे रागवण्यासारखे काय आहे? त्यांनी चीनचा म्हणून न दाखवलेला प्रदेश तर कित्ती तरी आहे. दिल्ली चीनच्या नकाशांत दाखवलेली नाही! शिलाँग, सिमला चीनच्या नकाशांत दाखवलेली नाहीत......! इतके रागवायला काय झाले? आपण जर आपल्याच लोकांच्या जमिनी बळकावतो तर चीनने थोडी आपली बळकावली आहे असे रशियनांनी दाखवले नकाशात तर लगेच स्वर्णसिंग आणि इंदिराजींना वाटेल ते बोलायचे?

व्होव्हाचे काय झाले ते सर्वांनी डोळे उघडून पहावे. रशियनांनी त्याला गोळया घातल्या. इथे रशियाचे राज्य आल्यावर कुणाकुणाला गोळया घालायच्या याची यादी डांग्यांच्या खिशात नेहमी असते...हे सर्वांनी लक्षात ठेवावे.

व्होव्हा मुर्दाबाद. एका भारतीय हत्तीने सूडाच्या आहारी जाऊन, आर्मेनियन सरकारचे जे नुकसान केले त्याची भरपाई इंदिरा सरकार देईल अशी आम्हाला आशा आहे.

हत्तीची गोष्ट इसापाने का लिहिली नाही हे आम्हाला आता कळले. गुलाम कधी स्वातंत्र्यभवनाची गोष्ट लिहू शकत नाही!!



बँक राष्ट्रीयीकरणाचे एक वर्ष

# ठेवी का घटल्या ?

प्रा. रा. म. बिवलकर

गेल्यावर्षी, १९ जुलैच्या रात्री, आकाशवाणीवरून भारताच्या पंतप्रधानांनी चौदा मोठ्या व्यापारी बँकाचे राष्ट्रीयीकरण केल्याची घोषणा केली. भारताच्या आर्थिक आणि राजकीय इतिहासात अत्यत महत्त्व असलेल्या त्या घटनेला आता एक वर्ष पुरे झाले. या एका वर्षाच्या अवधीत, १९ जुलैच्या वटहुकुमाला ९ ऑगस्ट १९६९ रोजी विधिरूप प्राप्त झाले. सरकारची राष्ट्रीयीकरणाची कृती सर्वोच्च न्यायालयात आव्हानिली गेली. ११ फेब्रुवारी १९७० या दिवशी, त्यावरील आपला निवाडा देताना, सर्वोच्च न्यायालयाने, सरकारचा राष्ट्रीयीकरण करण्याचा अधिकार मान्य केला, पण हे राष्ट्रीयीकरण पक्षपाती झाल्याचे मत व्यक्त करून, बँक राष्ट्रीयीकरणाचा कायदा रद्दबातल ठरविला. पुनः कायदेमत्री कै. पी. गोविंद मेनन यांची धावपळ झाली. १५ फेब्रुवारीला (१९७०) जरूर सुधारणासह नवा वटहुकूम काढून राष्ट्रीयीकरण जारी राखण्यात आले. ससदेच्या अधिवेशनात पुनर्राष्ट्रीयीकरणाचा कायदा संमत झाला. गंगेतून खूप पाणी वाहून गेले. त्याबरोबर राजकीय आरोप–प्रत्यारोपही बरेच थंडावले आहेत. पतप्रधानाच्या राजकीय स्थानाला आता बरीच स्थिरताही प्राप्त झाली आहे.

कोणत्याही महत्त्वाच्या धोरणाची यशस्विता एखादवर्षाच्या अनुभवावर मापू जाणे अयोग्य तर खरेच, पण तरीही ज्या उद्देशाने ते प्रागतिक पाऊल उचलले गेले, ती उद्दिष्टे सफल करण्याच्या दृष्टीने त्याची वाटचाल सुरू झाली आहे की नाही हे पाहायला एक वर्षाचा मैलाचा दगड उपयोगी पडावा. ‘ बँकावरील मूठभर लोकाचे नियंत्रण संपुष्टात आणणे, नफामात्र दृष्टीने चाललेले त्याचे व्यवहार देशहितासाठी राबविणे, त्याचे सुनियंत्रण करणे, शेती, लघुउद्योग आणि निर्यात व्यापार यासाठी अधिक पैसा उपलब्ध करून देणे, नव्या उद्योग चालकांना प्रोत्साहन देणे, मागास-

लेल्या वर्गांची आणि भौगोलिक भागांची प्रगती सुविहीतपणे होण्यासाठी, अर्थव्यवस्थेच्या त्या क्षेत्राना महत्त्वानुसार जास्तीत जास्त पतपुरवठा करणे, समाजातील विविध थरातील धंदेवाले, छोटे कारखानदार, कारागीर, वकील, डॉक्टर, नोकरदार याच्यापर्यंत बँकाचा पतपुरवठा पोचविणे, ग्रामीण भागातील लोकांना बचतीची आणि पतपद्धतीच्या उपयोगाची सवय लावणे', इत्यादि विविध उद्दिष्टे बँकाच्या राष्ट्रीयीकरणामागे होती. एका वर्षाच्या अवधीत ही सारी सफल झाली का ? असा प्रश्न विचारणे राजकारणी विरोधकाना शोभेल, अभ्यासकाला शोभणार नाही.

गेल्या वर्षात राष्ट्रीयीकृत बँकानी विविध क्षेत्रात किती प्रगती केली याची १९ जुलै ६९ ते १९ जुलै ७० या वर्षातील सर्वप्रकारची आकडेवारी लगेच उपलब्ध होणे कठीण. तरीही हाती आलेल्या आकडेवारीवरून व माहितीच्या आधारे राष्ट्रीयीकरणाचा आढावा शक्य व्हावा आणि वाहाणाऱ्या वाऱ्याची दिशा लक्षात यावी; व त्यावरून पुढील वाटचालीला योग्य दिशाही गवसावी.

यादृष्टीने काही निर्देशक चांगलेच उपयोगी पडतात. राष्ट्रीयीकरणामुळे मूठभर लोकांची बँकव्यवहारावरील पकड उखडून गेली यात शंका नाही. नाहीतर रिझर्व्ह बँकेने कर्जपुरवठा व तत्सम बाबीवर घातलेले निर्बंध न आवडून चौदा राष्ट्रीयीकृत बँकांच्या चौदा कस्टोडिअन्स्पैकी, दहा जणानी गेल्या वर्षभरात राजिनामे देऊन, प्रकृतीचे कारण दाखवून वा अन्य कारणे दाखवून सेवानिवृत्ती पत्करली नसती !

सर्व बँकानी मिळून परस्पर सहकार्याने गेल्या एक वर्षात एकूण १४५६ एवढ्या नव्या शाखा उघडल्या. यातील दोन तृतीयांश शाखा ग्रामीण भागात उघडल्या गेल्या. शाखा विस्ताराचा हा वेग अभूतपूर्वच म्हटला पाहिजे.

पण शाखा विस्ताराच्या मानाने राष्ट्रीयीकृत बँका आपल्या ठेवी वाढवू शकल्या नाहीत, असे मानले जाते. १९६८–६९ साली स्टेट बँकेसुद्धा २२ राष्ट्रीयीकृत बँकानी आपल्या ठेवी ४४२ कोटी रुपयानी वाढविल्या. राष्ट्रीयीकरणानंतरच्या काळात त्या ४८६·२ कोटीनी वाढल्या हे खरे, पण त्यात स्टेट बँकेचा वाटा १८८·३ कोटीचा आहे. म्हणजे नवराष्ट्रीयीकृत बँकांनी फक्त २९७·९ कोटी रुपयाच्या ठेवीच गोळा केल्या १९६८–६९ साली हा आकडा ३९३ कोटीचा होता. राष्ट्रीयीकरणानंतरच्या एक वर्षात यात ९५ कोटी रुपयाची घट दिसते. ही गोष्ट विरोधक धारेवर धरल्याशिवाय राहाणार नाहीत. वास्तविक जानेवारी १९७० अखेर चौदा राष्ट्रीय बँकांनी आपल्या ठेवी २६० कोटी रुपयानी वाढविल्या होत्या. फेब्रुवारी ते जुलै या महिन्यात तो ठेववाढीचा वेग त्यांना राखता आला नाही. या सर्व परिस्थितीची कारणमीमासा अनेक प्रकारांनी करता येईल.

राष्ट्रीयीकरणाच्या घोषणेमुळे बराच राजकीय धुरोळा उडला होता. मतामतांचा गलबला माजला होता. चुकीचे निष्कर्ष जनतेपुढे ठेवले जात होते. राष्ट्रीयीकरणाचे भवितव्य महाभयंकर असल्याचे वर्तविले जात होते. राष्ट्रीयीकरण करणारा वटहुकूम

सर्वोच्च न्यायालयात पोचला. त्यातली दोन कलमे त्या न्यायालयाने रद्द केली. तेव-ढ्यात राष्ट्रीयीकरणाचा कायदा समत झाला. त्यालाही आव्हान दिले गेले. राष्ट्रीयी-करणाचे भवितव्य परत न्यायालयाच्या तराजूत पडले. ५।६ महिने उलट सुलट विचार न्यायालयापुढे माडले गेले. ११ फेब्रुवारीला निकाल लागला. त्याने राष्ट्रीयी-करण कायदा रद्दबातल केला–पुन्हा वटहुकूम–पुन्हा कायदा संमत–ही सारी परि-स्थिती राष्ट्रीयीकृत बँकव्यवहारावरील जनतेचा विश्वास वाढविणारी तर खासच नव्हती. नव्या राष्ट्रीयीकृत बँकांच्या ठेवी कमी झाल्या पण स्टेट बँकेच्या ठेवी १३१ कोटीऐवजी १८८ कोटीनी वाढल्या ही गोष्ट हेच दाखविते.

जनता संभ्रमात तसे बँकर्सही सभ्रमातच होते. नव्या मार्गावरील त्यांचे पाऊल चुकतमाकतच पडत होते. सरकारही सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाकडे डोळे लावून बसले होते. योजलेल्या अनेक गोष्टीपैकी काही घडत होत्या पण त्यामागे जिद्द नव्हती. बँकव्यवहारातील अनेक बाबीचा अभ्यास करण्याकरता रिझर्व्ह बँकेने अभ्यासमंडळे नियुक्त केली होती. शाखा वाढविण्याचे आदेश दिले होते. विविध थरा-पर्यंत बँकांचा पैसा पोचावा म्हणूनही प्रयत्न केले जात होते, नापतदारांना कर्जे देण्याची चौकटही ठरत होती–जिल्ह्याजिल्ह्यांच्या विकासार्थ काही विशिष्ट तत्त्वा-वर एकेका बँकेकडे जिल्हागटाचे नेतृत्व दिले जात होते, पण या साऱ्या गोष्टीमागे नेटाचे आयोजन होते असे म्हणता यायचे नाही. त्यात जुन्याच बँक संचालकांना कस्टोडिअन्स् नेमले होते. त्यांच्या या नव्या घडीत जीव रमत नव्हता.

ग्रामीण भागात शाखा धडाधड उघडत होत्या. पण तिथे बँकेकरता सुयोग्य जागा मिळणे कठीण होते. नव्या इमारती बाधण्यात पैसा अडकून पडणार होता. जुने घरमालक तोडाला येईल ते भाडे सागत होते! बँक म्हणजे पैसा आला. तो सुर-क्षित राखण्यासाठी वा त्याच्या वहनासाठी योग्य ते संरक्षण ग्रामीण भागात उपलब्ध होणेही कठीण. बँकांची शिक्षित नोकरमडळी खेड्यात–छोट्या शहरात जायला नाराज. खेड्यातून बँकव्यवहार समजणारा सुशिक्षित सापडणे महाकर्मकठीण. त्यात गाठ अशिक्षित खेडुतांशी. त्याना लिहिता वाचता येत नाही. पैसे सोन्यात, जमिनीत नाहीतर घरात गुंतवायची त्यांची सवय. मुळात दारिद्र्यामुळे हाती पैसा कमीच. पतव्यवहार कशाची खातात याबाबतीत ही मंडळी अनभिज्ञ. शाखा उघडल्या तरी ठेवी बँकेपर्यंत पोचाव्या कशा? जनतेला बँक व्यवहार, त्याचे फायदे समजायला काही काळ जाणारच. उघडली बँक की आले ठेवीदार असे कसे घडणार? शिवाय खेड्यात दळणवळणाची साधने कमी. जुन्या पतकसोट्या तिथे निरुपयोगी. नव्या लावायच्या तर धोरणच ठरलेले नाही. मोठ्या शाखेकडून मार्गदर्शन मिळवायचे तर त्याला विलंब फार लागणार. छोट्या शेतकऱ्यांजवळ पैसा थोडा, ठेवीकरता त्याचा विश्वास सपादन करणे कठीण. मोठ्या पैसेवाल्या शेतकऱ्यांना खाजगी भारी दराने कर्जे द्यायची सवय. ते कशाला येतात बँकेत ठेव ठेवायला! ग्रामीण भागात बँकांनी

जम बसवायचा म्हणजे ठेवी गोळा करण्याऐवजी उत्पादक कर्जे देऊन प्रथम शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारायला हवी. मग ते उत्तम ठेवीदार बनतील. उत्पादक कर्जे द्यायची कुठल्या तारणावर ? बऱ्याच जणाजवळ जमीनच नाही. आहेत ते बहुसंख्य जमीनधारक आपले पोटही त्या जमिनीवर भागवू शकत नाहीत. हरित क्रांती आली म्हणून ओरड होत असली तरी ती या सामान्य शेतकऱ्यांपर्यंत पोचलेली नाही. पोचणे शक्य नाही. जमिनीचे सात बाराचे उतारेही मिळणे कठीण. त्यात वाटण्या अमाप, कर्जही अमाप. उत्पन्न लहरी पावसावर अवलंबून असल्याने बेभरवशाचे. बँकर्सना माणसांची ओळख पटणेही कठीण. या सर्व परिस्थितीचा विचार करता, शाखा निघाल्या तरी ठेवी का वाढल्या नाहीत याचे उत्तर सहज मिळते.

याशिवाय आणखीही काही कारणे या ठेवघटीबाबत सांगता येतील. राष्ट्रीयीकरणामुळे शेतकरी, छोटे कारखानदार, कारागीर, हमाल, रिक्षावाले, टॅक्सी ड्रायव्हर यांना कर्जे मिळणार. साहाजिकच मोठ्या उद्योगाचा पतपुरवठा घटणार अशी ओरड सुरुवातीपासूनच ऐकू येत होती. ती थोडीफार सयुक्तिकही होती. त्यामुळे बड्या उद्योगपतीनी आपली भांडवली गरज खुल्या बाजारातून, ठेवी वा कर्जे अधिक व्याज देऊन, मिळवून, भागविली असली पाहिजे. साहाजिकच बँकात जमा होणारा हा पैसा घटला.

काही बँक व्यवहारतज्ञ आणखी दोन कारणे सागतात. एक तर गेल्या वर्षभरात या देशातील तुटीचा अर्थभरणा दरमहा ५ ते ७ कोटीनी कमी झाला. तुटीचा अर्थभरणा कमी, म्हणजे जनतेच्या हाती पडणारा पैसा घटलाच. त्याचा परिणाम ठेवीवर झाला. राज्यानी केलेली हातउचल हेही एक कारण सांगितले जाते.

अशा अनेक गोष्टीमुळे गेल्या वर्षात ठेवी कमी प्रमाणात वाढल्या. वास्तविक याचा परिणाम बँकानी केलेल्या पतपुरवठ्यावर व्हायला हवा होता. पण तसा तो झालेला दिसत नाही. अर्थक्षेत्राच्या उपेक्षित भागावर कर्जे देण्यात बँकांनी कसूर केली नाही. शेतकरी, छोटे उद्योग, वाहातूक करणारे, किरकोळ व्यापारी याना ६८–६९ साली फक्त २०२·११ कोटीचा पतपुरवठा झाला होता. जुलै ६९ ते जून ७० या काळात या उपेक्षित वर्गांना राष्ट्रीयीकृत बँकांनी ३४४·९८ कोटी रुपये पुरविले. ठेवी वाढीचा वेग घटूनही ही कर्जे बँकांनी दिली, अयं विशेषः !

इतकेच नव्हे तर वाहातूक करणारे, किरकोळ व्यापारी आदि मंडळीमधून बँकांच्या खातेदाराची संख्या दुपटीपेक्षा अधिक वाढली आहे. राष्ट्रीयीकृत बँकानी स्वतंत्र उद्योग करणाऱ्या व्यक्तींना दिलेली भांडवली मदतही नजरेत भरते. १९६९ सालच्या जून अखेर अशा ४२२ मडळींना एकूण ३३ लक्ष एवढ्या रकमेची भरघोस मदत १४ बँकांनी केली होती ! राष्ट्रीयीकरणाच्या पुढल्या ७ महिन्यातच या मंडळींच्या संख्येत तर वाढ झालीच पण त्या सर्वांना २·२६ कोटी रुपयांची कर्जे याच १४ बँकांनी मंजूर केली. स्टेटबँकसुद्धा सरकारी! अर्थक्षेत्रातील एकूण २२

बँकांनी शेती व वरील इतर लघुउद्योग यांना एकूण ६०४·७ कोटी रुपयांचा पतपुरवठा केला आहे. इंडियन बँकस् अॅसोसिएशनचे अध्यक्ष श्री. आर. बी. शहा यानी या गोष्टीचा मोठचा अभिमानाने उल्लेख केला आहे. शेतकऱ्याना कर्जे देताना ती धनिक शेतकऱ्यांनाच दिली गेली असा आरोप आहे. चौदा राष्ट्रीय बँकांबाबत तो बहुशः खराही आहे. पण स्टेट बँकेने मात्र गेल्या वर्षात शेतकऱ्यांना दिलेली सर्व कर्जे ५ एकरापेक्षा कमी जमीन धारण करणाऱ्यांना दिल्याचा आवर्जून उल्लेख करायला हवा. छोटघा शेतकऱ्यांना कर्जे देण्याचे निकष अजून ठरले नसल्याने राष्ट्रीयीकृत बँका काही करू शकल्या नसाव्यात.

बँक राष्ट्रीयीकरणामुळे १४५६ नव्या शाखा गतवर्षात निघाल्या याचा उल्लेख वर केला. याचा अर्थ ८ ते १० हजार सुशिक्षित मडळीना नोकऱ्या उपलब्ध झाल्या असा होतो. किती रोजगार प्रत्यक्षात उपलब्ध झाला याचे आकडे बँकानी प्रसिद्ध केले नसले तरी वरील अदाज बरोबर ठरावा. राष्ट्रीयीकरण असे रोजगारदायी व्हावे हेही त्याचे फलितच म्हटले पाहिजे. यावर्षी चौदा राष्ट्रीयीकृत बँका १३५० नव्या शाखा उघडणार आहेत आणि त्यातील ११८६ शाखा अजूनपर्यंत बँक दर्शन न झालेल्या भागात असतील असा संकल्प सुटला आहे. हीही गोष्ट राष्ट्रीयीकरणातील जमेच्याच बाजूची.

इथवर बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचे एक वर्षाचे फलित प्रामुख्याने मांडल्यानंतर त्यातील त्रुटीचा उल्लेख आणि बँकांपुढील व देशापुढील नव्या आव्हानांचा परामर्श घेणे ओघानेच येते.

बँकाचे राष्ट्रीयीकरण झाले. तूर्त प्रत्येक बँक स्वतंत्रपणे कारभार पाहील. त्यांची सध्याची संचालक मंडळे रद्द होतील. पण सचालक मडळाचा अध्यक्ष ' कस्टोडियन ' या नात्याने कारभार पाहील. नव्या सचालक मंडळाची नेमणूक—बँक व्यवहाराचा बदललेला दृष्टिकोन, नव्या गरजा, नव्या समस्या, नवी तत्रे याचा विचार करून लवकरच करण्यात येईल असे जाहीर झाले होते. तत्पूर्वी अर्थमंत्रालयाची सूत्रे पंतप्रधानांनी आपल्या हाती घेतली होती. आपले राजकीय स्थान सुस्थिर करण्यात पंतप्रधान गुतल्याने व राष्ट्रीयीकरणाबाबत इतर घोळ पडल्याने—धोरणविषयक पुढल्या हालचाली ज्या तत्परतेने व्हायला हव्या होत्या त्या झाल्या नाहीत. फेब्रुवारीत पुनर्राष्ट्रीयीकरण कायदा समत झाल्यावरही ४-५ महिने तसेच गेले. बँक राष्ट्रीयीकरण हे नवी अर्थव्यवस्था निर्माण करण्याचे साधन आहे हे उद्घोषित होऊनही हालचाल शून्य. फक्त रिझर्व्ह बँकेमार्फत तिच्या अधिकारात काही फतवे निघत होते. पण त्यामुळे राष्ट्रीय धोरण ठरत नव्हते. शेवटी परवा पंतप्रधानांनी अर्थखाते माननीय श्री. यशवंतरावजी चव्हाण यांच्या गळचात टाकले. मा. यशवंतराव अर्थव्यवस्थेला हवी ती गती देऊ शकतील अशी खात्री होती; मग एक वर्षाचा कालावधी घालविणे देशहिताच्या दृष्टीने घातकच नव्हते का ? नव्या अर्थमंत्र्यांनी

मात्र पुढची निवडणूक वर्षादीड वर्षावर आली असताही नेटाने पावले टाकायला सुरुवात केलेली दिसते. राष्ट्रीयीकरणाच्या वर्षदिनाचा सुमुहूर्त साधून त्यांनी चौदाही बँकांची सचालकमंडळे नेमली आहेत. त्यात रिझर्व्ह बँक व अर्थमंत्रालय यांच्या अधिकाऱ्याच्या बरोबरीने, शेतीतज्ज्ञ, अर्थतज्ज्ञ, प्रगत शेतकरी, देशातील विविध अर्थसस्थांतील मडळी, लघुउद्योग, निर्यातदार आदि क्षेत्रातील जाणित्यांचा समावेश आहे. अर्थमंत्रालय पुन्हा कार्यप्रवण झाल्याचाच तो दाखला आहे. बँकाची नवी घडी कशी असावी ? आयुर्विमा महामंडळासारखे एक महामंडळ स्थापून त्यात साऱ्या राष्ट्रीयीकृत बँकाचा समावेश करावा, की रेल्वेप्रमाणे ५–६ झोन्स् पाडून त्या त्या प्रदेशाचा कारभार एकेका प्रादेशिक महामंडळाकडे सोपवावा ? त्यात 'लीड बँकस्'च्या कल्पनेला कुठे बसवावे ? रिझर्व्ह बँक व स्टेट बँक याचे स्थान कोणते राहावे ? बँकांनी प्रादेशिक विकास कसा हाताळावा ? तो हाताळताना सहकारी चळवळ, इतर प्रादेशिक वा राष्ट्रीय अर्थमहामंडळे याचे व व्यापारी बँकांचे नाते कसे असावे ? असे एक ना दोन अनेक प्रश्न अनुत्तरित राहिले आहेत. बँकिग कमिशन, रिझर्व्ह बँक, अभ्यासमंडळाचे अहवाल यांच्या विचाराने ही नवी घडी पुढील दोन वर्षात ठरायला हवी. नव्या अर्थमंत्र्यापुढे हे मोठेच आव्हान आहे. मोठ्या व्यापारी बँका राष्ट्रीयीकृत झाल्यावर सेवा, कार्यकुशलता, ठेवी मिळविणे, याबाबतीतील स्पर्धा संपुष्टात येणारच. आता हवी आहे ती नक्की स्वरूपाची कार्यपद्धती.

ठेवी घटल्या तरीही बँकांनी विविध थरातील व्यक्तीना, लघुउद्योगांना, शेतीला, कारखानदारीला कर्जे देण्यात कसूर केली नाही असा वर उल्लेख केला. पण ठेवी घटल्याने, ही कर्जे देताना बँकांना आपल्याजवळचे कर्जरोखे मोठ्या प्रमाणावर विक्रीला काढावे लागले. १९६९–७० सालातील तेजीच्या काळात १०३·८८ कोटी रुपये असे उभे करावे लागले. शिवाय रिझर्व बँकेकडून याच काळात २०३·३९ कोटी रुपये उचलावे लागले ते वेगळेच. याचा अर्थ सरळ आहे. कारखानदारी आणि व्यापार यांची कर्जांची गरज भागवून, दुर्लक्षित क्षेत्रांना वाढता कर्जपुरवठा करायचा असेल तर बँकांनी आपल्या ठेवी वाढविल्याच पाहिजेत. कर्जरोखे विकून अगर रिझर्व्ह बँकेकडून कर्ज उभारून ते करू जाणे वेडेपणाचे आहे. कारण तो झरा आटणारा आहे. शाखा वाढविल्या की ठेवी आपोआप वाढतील अशा भ्रमात बँकांनी राहाता नये. त्याकरता जोषदार प्रयत्न करायला हवेत. तसे प्रयत्न झाले तर ठेवी निश्चित वाढतील अशी देशाची आर्थिक स्थिती आज खात्रीने आहे. ६७–६८ सालची मंदीची भीती आता मागे पडली आहे. औद्योगिक उत्पादन झपाट्याने वाढत आहे. स्टॉक मार्केटची परिस्थिती खूपच सुधारली आहे. केंद्रीय वा राज्यीय कर्जांना फार चांगला प्रतिसाद मिळत आहे. खाजगी अर्थक्षेत्रातील भांडवल गुंतवण वाढते आहे. देशाचे ७०–७१ सालचे अंदाजपत्रक उद्योगवाढीचा वेग वाढविणारे आहे. यावर्षी विकास कार्याला खर्च होणारे ४०० कोटी रुपये

भांडवल गुंतवण वाढवतील. त्यातून खाजगी उद्योगांनाही प्रोत्साहन मिळेल. गेली दोन-तीन वर्षे वरुणराजाची कृपा या देशावर दिसते. त्यामुळे शेतमालाचे उत्पादनही १० कोटी टनांची मर्यादा यंदा उल्लघीलसे वाटते. या साऱ्या परिस्थितीत पत-मागणी वाढेल यात शंका नाही. त्याचबरोबर ही भांडवल गुतवण लोकाची उत्पन्नेही वाढवील. पण त्यातून उद्‌भवणारी भाववाढ रोखायची तर जनतेच्या वाढीव उत्पन्नाने बँकेची वाट चालली पाहिजे, नाहीतर विकासाची ही येऊ घातलेली गती कुठीत होईल.

या देशात बँकातील ठेवीचे प्रमाण राष्ट्रीय उत्पन्नाच्या फक्त १४ ते १५ टक्के एवढे आहे. आपल्या शेजारी देशाच्या मानानेही ते खूपच कमी आहे. याचा अर्थ ठेवी वाढवायला या देशात खूपच अवसर आहे. अजून देशातील ७०–८० टक्के व्यवहार रोखीनेच चालतात. चेक्स्, ड्राफ्ट्स्चा वापर कित्येकाना माहीत नाही, असला तर रुचत नाही. खेडोपाडी पोचायला निघालेल्या आपल्या राष्ट्रीयीकृत बँकांपुढे हे एक मोठे आव्हान आहे. बँकातील ठेवीवरील व्याजाच्या रकमेपैकी, ३००० रुपयापर्यंतच्या व्याजात आयकरात सूट जाहीर झाली आहे याही गोष्टीचा बँकांना फायदा करून घेता येईल. गेल्या एका वर्षात ठेवी घटल्या तरी कर्जे देण्याचे प्रमाण वाढल्याने बँकाचा नफा वाढलेला दिसला तरी तो फसवा आहे. ठेवीवर आधारित पतपुरवठा मोठ्या प्रमाणावर करण्याची बँकांची क्षमता वाढायची म्हणजे ठेवी वाढविल्याच पाहिजेत हे उघड आहे.

बँकदर्शन न झालेल्या प्रदेशात आता बँका जाणार. आजवर दुर्लक्षिलेला प्रदेश अशा रीतीने बँकाच्या कक्षेखाली, अत एव विकासाभिमुख बनणार. या ग्रामीण भागातील बँकांच्या शाखा स्वत:च्या पायावर उभ्या राहण्याकरता, म्हणजे ठेवी व पतपुरवठा व्यवहार पुरेशा मोठ्या प्रमाणात हाताळण्याएवढी क्षमता त्याच्यात येण्यास ४–५ वर्षे लागतील. तोवर नव्या शाखा तोट्यात चालणार. चालेनात का? आम्हाला काय त्याचे? सरकार त्या बँकांना सब्सिडी देऊन त्या चालवील. स्टेट बँकेच्या बऱ्याचशा शाखा आजवर तोट्यात चालतातच ना? असे म्हणून बँक संचालकाना उपरणे झटकून मोकळे होता येणार नाही. या बँकावरील तोटा काही प्रमाणात त्यांच्या माता-बँका सोसू शकतील हे खरे, पण थोड्या काळात भारतभर बँकशाखांचे जाळे विणायचे तर ह्या शाखांवरील तोटा कमीतकमी राखण्याकडे बँकसंचालकांनी लक्ष केंद्रित केले पाहिजे. राष्ट्रीयीकृत साऱ्या बँका 'अ' गटात मोडू शकणाऱ्या आहेत. त्यांच्या कर्मचाऱ्यांचे व अधिकाऱ्यांचे पगार आज खूपच चांगले आहेत. एकाच क्वॉलिफिकेशनची दोन माणसे, एक अशा बँकेत व दुसरा सचिवालयात लागला तर त्यांच्या मासिक पगारात शे-दीडशे रुपयाचा फरक पडतो अशी बँकांची स्केल्स् आहेत. या मोठ्या बँकाच्या शाखा लहान शहरात व

पृष्ठ ४८ वर



समीर

## □ ग्रंथालयाचे खरे कार्य

ग्रंथपालाचे कर्तव्य आणि ग्रंथपालनाचे उद्दिष्ट या विषयावर अधिकारपूर्ण मते प्रगट करू शकणाऱ्या तीन अमेरिकन ग्रंथपालिका नुकत्याच भारताला भेट देऊन गेल्या. त्या म्हणजे वेस्टर्न मिशिगन विश्वविद्यालयाच्या ग्रंथपालन विद्यालयाच्या संचालिका डॉ. जीन लोरी, अमेरिकन असोसिएशन ऑफ् स्कूल लायब्रेरियन्स या संस्थेच्या कार्यकारी चिटणीस कु. लू व्हिन्सन, आणि याच संस्थेच्या एक कार्यकर्त्या कु. फिलिस हॉच्‌स्टेट्लर. अमेरिकेतील ग्रंथालयांचे सर्वकष कार्य व त्यांचे ध्येय यांची पुढील उद्‌बोधक माहिती त्यांनी दिली :

अमेरिकेत प्रथमपासून ग्रंथपालनाची सुदृढ परंपरा आहे. कारण प्रत्येक नागरिकाला सार्वजनिक शिक्षण देण्याची कल्पना त्या देशात अठराव्या शतकापासून रुजलेली आहे. प्रत्येक लहान गावात सार्वजनिक ग्रंथालय आहे. त्यामुळे ग्रंथालये उभारण्याची व चालविण्याची नवनवीन तंत्रे बहुधा अमेरिकेतच निघालेली आहेत. वॉशिंग्टनमधली लायब्ररी ऑफ् काँग्रेस हे जगातले सर्वात मोठे ग्रंथालय असून तेथे सुमारे पावणेदोन कोटी पुस्तके आहेत. त्याचप्रमाणे अत्यंत उच्च प्रकारचा संशोधन विभागही आहे.

ग्रंथालयाच्या कार्याची मर्यादा आता इतकी वाढली आहे की आता या क्षेत्रात तज्ज्ञांनाच स्थान आहे, होतकरू अनभिज्ञांना नाही. 'आम्ही ग्रंथपालन–शास्त्रात 'मास्टर' डिग्रीचा कोर्स ठेवला आहे, व त्यानंतर एक उच्च शिक्षणक्रमही आहे. आणि याच्या आधी विद्यार्थी ग्रज्युएट असावा लागतो. कारण अमेरिकेतील ग्रंथपाल एखाद्या विद्यार्थ्याला कुठल्याही विषयावर कोणती पुस्तके व कागदपत्र उपलब्ध आहेत, त्याचप्रमाणे त्या विषयावर अगदी अद्ययावत साहित्य काय लिहिले गेले आहे याबद्दल मार्गदर्शन करू शकला पाहिजे अशी अपेक्षा असते.'

ग्रंथालयाचे हे कार्य अधिक चांगल्याप्रकारे व्हावे म्हणून ग्रंथपालनाच्या शिक्षणक्रमात अधिक विषयांचा समावेश करण्यात येत आहे. उदाहरणार्थ, विज्ञानाच्या विद्यार्थ्यांना व संशोधकांना ग्रंथालयाचा शक्य तेवढा अधिक लाभ करून देण्याचे खास शिक्षण ग्रंथपालांना देण्यात येते. चांगले ग्रंथालय कार्यक्षम तर हवेच पण ते

नियमानी जखडलेले नसावे. विद्यार्थ्यांशी त्याचे सबध 'व्यक्तिगत' स्वरूपाचे असावेत व सशोधनाचे तंत्र शिकविण्याच्या कामी त्याने पुढाकार घेतला पाहिजे.

अमेरिकन ग्रथालये आता 'समग्र ज्ञानसाधने'ची केंद्रेही होत आहेत. कारण त्यात पुस्तके तर ठेवलेली असतातच पण त्या पुस्तकातली माहिती 'जिवत' करण्यासाठी व तिला जोड देण्यासाठी फिल्म, टेप, ध्वनिमुद्रिकाही ठेवलेल्या असतात. ग्रंथालयाना आपल्या सामाजिक जबाबदारीचीही पूर्वी कधी नव्हती इतकी जाणीव होऊ लागली आहे. मागासलेल्या किंवा नवशिक्षित लोकासाठी ती आता विशेष साहित्य, साधने व सोयी तयार करतात गरज पुरविण्याइतकीच गरज निर्माण करणे हे चांगल्या ग्रथालयाचे लक्षण आहे.

कुठल्याही ग्रथालयात जागेची अडचण नेहमीच असते. त्यामुळे अमेरिकन ग्रथालयातून आता अधिकाधिक साहित्य मायक्रोफिल्म व मायक्रोरेकॉर्डवर ठेवले जाते. अमेरिकन सार्वजनिक शाळाच्या ग्रथालयाचे एक समान उद्दिष्ट म्हणजे मानवजातीला समजून घेणाऱ्या ज्ञानावर भर देणे हे आहे यासाठी जागतिक प्रश्न, त्याचप्रमाणे निरनिराळ्या देशातील लोकांच्या चालीरीती याच्यावरील चागल्या पुस्तकाची शिफारस सर्व शाळाना करणे हे अमेरिकन असोसिएशन ऑफ् स्कूल लायब्ररियन्स या सस्थेचे उद्दिष्ट आहे. 'प्राथमिक व दुय्यम शाळेतली आमची ग्रथालयेही अत्यत महत्त्वाची मानली जातात. आमच्या कार्यक्रमात आम्ही पालकाना समाविष्ट करण्याचा शक्य तेवढा प्रयत्न करतो ग्रथालयाचा उद्देश केवळ शिक्षणाला मदत करणे हा नसून शिक्षणाचा दर्जा वाढविणे हाही आहे'

## ◻ परकीय पत्रकाराच्या दृष्टीतून भारत

१९५२ ते १९६४ या काळात दिल्लीला बातमीदार म्हणून राहिलेले एक जर्मन पत्रकार थिलो बोडे यानी आताच्या भारताबद्दल काढलेले काही चिंतनीय उद्गार:

५० कोटी माणसाच्या तुमच्या देशात हुशार माणसे राजकारणात का जात नाहीत हे कोडे आहे. प्रातवाद आता इतका वाढला आहे की श्रीमती गाधीनतर कुणालाही केंद्रीय नेता म्हणून मान्यता मिळेल असे वाटत नाही नेहरूच्या वेळीही प्रांतवाद होता, पण तो झाकून ठेवण्यात येत आहे पण नेहरूच्या वेळी भारतात बरेच काही घडत होते, त्यामुळे परकीय पत्रकाराना बरीच सामग्री मिळे व परकीय वर्तमानपत्रात भारताला बरीच प्रसिद्धी मिळे. आता कोण कोणाला भेटले व कोणी कुठला पक्ष सोडला असल्या कंटाळवाण्या गोष्टीना प्राधान्य मिळाल्याने बऱ्याच परकीय वर्तमानपत्रानी आपली येथली कार्यालये बद केली व परकीय वर्तमानपत्रात भारताला आता फारच थोडे स्थान मिळते.

◻ ◻ ◻



विनोद कुलकर्णी

नाव प्रार्थना. सगळी म्हणत–प्रार्थी.

कुठल्याशा मित्राचा बर्थडे सेलीब्रेट करायला जमलेले आम्ही पंधरा–वीस जण. तिथं ती लकेरीसारखी प्रसन्नपणे समारंभभर वावरत होती. ओळख करून घेताना मी तिला डोळाभर न्याहाळली. तिचे डोळे भलतेच छान होते. आपला खालचा लालचुटुक ओठ नेहमी फिरवून ओला ठेवायची सवय तिला होती. तिच्या गोऱ्यापान गळयाखाली नजर वेधणारा तिळांचा त्रिकोण होता.

परतायसाठी आम्ही बाहेर पडलो तेव्हा तिनं विचारलं, "तुम्हाला कुठं जायचंय ?"

" संध्याटॉकीजजवळ. कां ? "

" मी राजारामपुरीत जाणार. आपली हरकत नसेल तर रिक्षा करू. तुम्ही संध्याजवळ उतरा. मी पुढं जाईन. "

" चला. "

वळणावर रिक्षा मिळाली. आम्ही बसलो. निर्जन रस्त्यावरून, दिव्याचे खांब मागं टाकीत रिक्षा धावू लागली. गार वारं घुसळण घेत होतं. तिनं माथ्यावर शालीन पदर लपेटून घेतला. तिनं शिंपून घेतलेल्या मंद अत्तरानं तिचं अवघं अस्तित्वच सुगंधित झालं होतं.

" तुम्ही आज छान गायलात, " तिच्या गझलचं कौतुक करीत मी म्हटलं.

ती फक्त हसली. अस्फुट. आणि जुईच्या बोटांनी कपाळावर झुलणाऱ्या बटा तिनं मागं सारल्या.

निरोप घेताना तिनं म्हटलं, " असंच पुन्हा भेटू. " आणि एकीकडे सरकून, मी जिथं बसलो होतो तिथं ती बसली.

रिक्षा सुसाट पुढं गेली. आणि चार दिशांना फुटलेल्या रित्या रस्त्यांच्या फुलीवर मी काही क्षण तसाच उभा राहिलो. ◘

पुढ तीन-चार महिन्यानी तिचं एक लांबलचक पत्र आलं. महाबळेश्वरहून. लिहिलं होतं, " इथं विश्रांतीला आलेय. टायफॉइडनं महिनाभर अंथरुणाला खिळून होते. डॉक्टरांचं म्हणणं असं की आणखी दोन महिने इथं राहायला हवं. डोळे भरून पाहावं असं इथं बरंच आहे. पण मला मुळीच करमत नाही. एकटं, उदास वाटतं. धुक्यातून उमलणारा दिवस कंटाळवाणा वाटतो. रात्रभर रानकिड्यांची किर-किर..." आणि पुढं माझ्या कवितांची स्तुती करणाऱ्या कित्येक ओळी– " तुम्हाला इतकं छान सुचतं तरी कसं ? कंटाळा आला की मी तुमच्या कविता पुन: पुन्हा वाचते. आता त्या सगळ्याच मला जवळजवळ पाठ झाल्या आहेत. मला न कळताही काही ओळी ओठावर गुणगुणत राहतात. तुमची ' तराणा ' मी पियानोवर बसवते आहे. तिथं आले की गाऊन दाखवीन. आता पत्र पुरं करते. पहिलंच पत्र इतकं लांब ? हसाल तुम्ही. पण लिहू लागले– आणि लिहीतच गेले. शब्द इतक्या सहजतेनं मद-

तीला येतील अशी अपेक्षा नव्हती. तुमच्या उत्तराची अपेक्षा करू ना ? तुमची प्रार्थी."

तिला काय उत्तर पाठवावं या विचारातच आठ दिवस गेले. मग कामानिमित्त पंधरा दिवस बाहेरगावी जावं लागलं. परतल्यावर तिच्या पत्राची आठवण झाली. पण म्हटलं, आता बराच उशीर झालाय. आणि शिवाय, काय लिहावं हा प्रश्न होताच. ◻

एका सकाळी रम्य स्वप्नासारखी ती दारात उभी राहिली तेव्हा तिचं स्वागत कसं करावं हेच कळेना. तिच्या डोळ्यात अपार हर्ष. ओठावर ओथंबलेलं हसू. मोतिया साडी आणि गुलमोहरी काचोळी. हातात जांभळ्या फुलांचा गुच्छ.

डोळे पागल झाले.

"आत या, बसा– म्हणावयाची पद्धत नाही वाटतं ?"

तेव्हा कुठं जाग आली. तिला सामोरा होत म्हटलं, "सुस्वागतम्."

आत येऊन कौतुकानं खोली न्याहाळीत तिनं स्वत.भोवती गिरकी घेतली. सोफ्यावर बसत म्हटलं, "किती छान आहे जागा ही. दृष्ट लागावी इतकी सुरेख." आणि मग छातीभर श्वास घेत तिनं विचारलं, "इथं हिरवा चाफा कुठं आहे ?"

"मागच्या अंगणात."

"वा: –– महाबळेश्वरला होते ना, तिथं बगल्याच्या आवारात हिरवा चाफा होता. असा घमघमायचा की अवघी रात्र गधानं कोंदाटून जायची." आणि मग संथ, लयदार आवाजात ती बोलत राहिली. अविरत.

तिचा प्रत्येक शब्द फुलासारखा बरसत होता. नाजूक. गंधित. शहारून टाकणारा. आणि ती जायला उठली तेव्हा माझं रक्त लाख पाकळ्यांनी उमललं होतं.

"आज संध्याकाळी घरी यायच पाचला. मी येऊ बोलवायला ?"

"तशी जरूर नाही. येईन मीच. पण काही खास कार्यक्रम ?"

उत्तरादाखल ती मोनालिसासारख हसली. म्हणाली, "चलते मी." ◻

तिसऱ्या मजल्यावर तिची स्वत'ची खोली होती. तिथून रंकाळ्याचं चमचमणारं पाणी दिसायच. कुडीतल्या बोगनवेलीन गुलाबी स्वागत केलं. आतल्या भिंतीना फिका पोपटी रंग. सुबक फ्रेम केलेली रवींद्रांची चित्रं जागोजागी अडकवलेली. पुस्तकांच्या शेल्फवर स्थितप्रज्ञ बुद्ध. एका बाजूला पियानो. फुलदाणीत गुलाबाची टपोरी फुलं. अवघी खोली रसिक.

पोर्चमध्ये तिनं वडलाशी ओळख करून दिली होती. सुखानं भरलेल शरीर. ओठावर पाईप तोलत ते म्हणाले होते, "प्रार्थी नेहमी तुमच्याबद्दल सागत असते. प्लीज्ड् टू सी यू. मला मिटिंगला जायचंय. येत जा असेच. चलतो."

सरबताचे पेले ट्रेत घेऊन ती आली. म्हणाली, "घ्या."

ती निःसकोच होती. निवळशंख नजरेनं माझ्याकडे पाहत होती. लहान मुलान चिमखडी बडबड करावी तसं बोलत होती. खळखळून हसत होती. तिच्या हसण्यानं भितीना पख फुटतीलसं वाटत होतं.

पियानोवरून तिची बोटं फिरू लागली नि स्वरांचं कारंज खोलीभर थुइथुईलं.

निरोप घेताना तू म्हटलेस,
'पुन्हा भेटीचा योग कोठला ?'
अवघडलेला एकच अश्रू
अलगद गालावरती ढळला
तो अश्रू मी जपुन ठेवते
तुज राहू दे ओळख त्याची
मी शब्दाना जपुन ठेवते
तुज राहू दे ओळख त्याची...

मग अशा अनेक भेटी. सध्याकाळी रंकाळयावर फिरणं. पद्मा गार्डन. पन्हाळयाला पिकनिक. मॅटिनीचे इंग्लिश पिक्चर्स. नवी पुस्तकं, नाटकं, चर्चा, गप्पा मतभेद. आणि या सर्वांना सामावून घेणारं तिचं लोभस अस्तित्व. विलोल डोळे. स्पर्शाचे उखाणे. तिळाच्या त्रिकोणाचं आव्हान. तिचा साज शब्दांतून साकार करणाऱ्या मी लिहिलेल्या अनेक कविता. त्या ओळीत लपेटून गेलेली प्रार्थी.

मध्यंतरी ती बडोद्याला गेली. उन्हाळयाच्या सुट्टीत. जाताना म्हणाली, "येईन पंधरा दिवसात. पत्र लिहीन मी. तुम्ही लिहाल ना ? लिहाच. नाहीतर करमणार


## पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नांनंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणास त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतलेला आहे, आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागापासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

वेस्टर्न इंडिया कं. (बी. एन.) पो. कतरीसराय (गया)

नाही मला. गुदमरेन."

सुखरूप पोचल्याचं तिचं पत्र आलं. पण त्यात बडोद्याचा पत्ता द्यायचाच ती विसरली. तिच्या दुसऱ्या पत्राची वाट पाहिली. पाहतच राहिलो. पंधरा दिवस उलटले. महिना उलटला. दोनदा बंगल्यावर जाऊन आलो तर माळ्यानं सांगितलं, "साहेब अजून यायचेत. कधी येणार नक्की नाही."

जूनच्या पहिल्या आठवड्यात तिचं दोन ओळींचं तोकडं पत्र–"पत्रिका पाठवलीय. लग्नाला यायचं. मुंबईला. खूप बोलायचंय. भेटीत बोलूच."

तिच्या लग्नाला जावंसं वाटलंच नाही. त्या दिवशी नुसता पाऊस कोसळत होता. धुवांधार. पाणीच पाणी. मेघांनी माखलेलं आकाश. अंगभर शाल पांघरून मी नुसता खिडकीत बसून होतो.

महिन्यानं तिचं लांबलचक पत्र आलं–"मी रागावलेय. का नाही आलात लग्नाला? किती वाट पाहिली मी...मुंबईला आलात तर घरी या अवश्य..." वगैरे.


त्यानंतर तिची पत्रंच नाहीत.


मीही मग कोल्हापूर सोडलं. होनावरला गेलो. अनेक उपद्व्याप उद्भवले. दिवस कसे उडून गेले कळलंच नाही.

¤

साताऱ्याला परवा ती अकस्मात भेटली. नवऱ्याबरोबर. गर्भवती. सतेजा. अवघडलेली. नवऱ्याशी ओळख करून दिली तिनं. निःसंकोच बोलली. खळखळून हसली. दमल्यानं नवऱ्याच्या खांद्यावर मान टाकली. त्याच्या बोटात बोटं गुंफली. बसमध्ये बसल्यावर म्हणाली, "अलीकडे काही वाचत नाही मी. वेळच नसतो. तुमच्या कवितांचे सूर कानात आहेत, पण शब्द विसरलेत. अलीकडे लिहिता ना? एक सांगते – पहिला संग्रह मलाच अर्पण करायचा बरं का!"

बस सुटली नि हवेत हलकासा गंध तरंगत राहिला.





# युगप्रवर्तक

## हरिभाऊ पगारे

गेल्या दोन-चार वर्षात राष्ट्रपुरुषांच्या जीवनावर चरित्र-कादंबऱ्या लिहिण्याचे सत्र लेखकांनी सुरू केलेले आहे. या सत्रात डॉ. आंबेडकरांसारख्या लोकोत्तर पुरुषावर कादंबरी लिहिली नसती तरच नवल होते. पिचलेल्या समाजातून झुंजत झुंजत वर येऊन स्वतःच्या अस्पृश्य, दलित बांधवास माणुसकीची वस्त्रे दिली त्यांनी ! अस्पृश्यतेचे अमानुष आयुष्य जगणाऱ्या समाजात माणुसकीचे युग सुरू करणारे आंबेडकर हे सर्वार्थाने युगप्रवर्तक होत. अशा या समाजपुरुषाचे संघर्षमय जीवन कादंबरीपेक्षाही वेधक होते. म्हणूनच श्री. हरीभाऊ पगारे यांनी ‘ कादंवरी ’ म्हणून प्रसिद्ध केलेले ‘ युगप्रवर्तक ’ हे पुस्तक मोठ्या आशेने वाचावयास घेतले पण वाचता वाचताच निराशा झाली. कारण ते ‘ कादंबरी ’ नव्हते !

‘ युगप्रवर्तक ’ या कादंबरीची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हाताऱ्याच्या रूपात येऊन जीवन-कहाणी सांगत आहेत अशी अतिशय बाळबोध स्वरूपाची केलेली आहे. कादंबरीच्या पहिल्याच प्रकरणात कादंबरीचे उद्देश्य सांगताना डॉ. आंबेडकरांच्या मुखातून श्री. हरीभाऊ पगारे म्हणतात, ‘ ...माझ्या प्रतिज्ञेचं तुम्हाला विस्मरण होऊ लागलं आहे. आपापसात हेवेदावे सुरू झाले आहेत, पोलादी

**विलास पतकी**

सघटनेचे तुकडे तुकडे झाले आहेत, संघटनेपेक्षा व्यक्तीला प्राधान्य दिलं जात आहे आणि मुकी बिचारी जनता सभ्रमात पडली आहे त्याना आशेचा किरण कोण दाखविणार ? म्हणून परत एकदा मला माझ्या जीवनाची गाथा तुम्हा सर्वांना सागायची आहे ' (पान २०). हे उद्देश्य डोळयासमोर ठेवून कादबरी वाचली, तरीही निराशाच पदरी येते. कारण या आत्मनिवेदनातून पुढे झेप घ्यावी अशा अगभून जोर (Thrust potential) असलेल्या घटना लेखकाने उद्धृत केलेल्या नाहीत. कदाचित याच उद्देश्यासाठी लेखकाने चरित्रनायकाच्या तोंडी व इतर भागनायकाच्या निवेदनात डॉक्टर आबेडकराची अनेक भाषणे जशीच्या तशी घेतलेली आढळतात. श्री. पी. एन्. राजभोज याच्या निवेदनात (भाग नऊ) तर अशा भाषणाची एक मालिकाच सादर केलेली आहे (पान २७७ ते २८५). या नवव्या भागात दहा पानापैकी आठ पाने या सुट्या भाषणवृत्तांतानी व्यापलेली आहेत ! तसेच आर. डी. भडारे याच्या निवेदनात (भाग सात) चौदा प्रकरणांपैकी प्रकरण चार ते चौदा ही सर्व प्रकरणे धर्मांतरावरील भाषणाने व्यापलेली आहेत ! हे सर्व पाहिल्यावर मनाला असा प्रश्न पडतो की लेखकाने डॉ आबेडकरांच्या व्याख्यानाचा सग्रह तर प्रसिद्ध केलेला नाही ? यामुळे 'कादंबरी' विस्कटते.

'युगप्रवर्तक' ही कादंबरी आत्मनिवेदनात्मक पद्धतीने लिहिलेली आहे. एरवी कादंबरीकार वाचकास कथौघातून 'कथाविहार' घडवितो. परंतु आत्मनिवेदनात्मक कादबरीत, कादंबरीचा नायक व नायकाच्या आयुष्याशी संघटीत असणाऱ्या (याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणून वि. स. खांडेकराच्या 'ययाति' कादबरीचे देता येईल. 'ययाति' ही सुद्धा चरित्र-कादंबरीच आहे) सामाजिक राष्ट्रपुरुषाच्या चरित्र कादबऱ्यातून आत्मनिवेदनात्मक पद्धतीचा प्रयोग 'युगप्रवर्तक' या कादबरीत प्रथमच करण्यात आला आहे. हे करणे अवघड होते. अशाप्रकारचा प्रयोग श्री. हरिभाऊ पगारे यानी केला म्हणून त्याचे अभिनदन ! पण दुर्दैवाने हा प्रयोग यशस्वी झालेला नाही म्हणूनच 'युगप्रवर्तक' ही 'कादबरी' होऊ शकलेली नाही ! !

'युगप्रवर्तक' या कादबरीचे एकूण अकरा भाग असून बाबासाहेबाच्या निवेदनासाठी भाग एक, तीन व सहा दिलेले आहेत. भाग दोनमध्ये रमाबाई आबेडकर (प्रथम पत्नी) याचे निवेदन आहे. उरलेले भाग आचार्य मोरेश्वर दोंदे, भाऊराव गायकवाड, आर. डी. भडारे, रेवाराम कवाडे, पी. एन. राजभोज, स्वत: लेखक व आचार्य अत्रे याच्या निवेदनार्थ योजलेले आहेत. कथौघाच्या सहाय्याने जेव्हा कादबरीकार कादबरी उभी करतो तेव्हा सपूर्ण कादबरीभर एक प्रकारची आखीव सलगता (Geometric continuity) आवश्यक असते. आत्मनिवेदनात्मक पद्धतीच्या कादंबरीत कथा, चरित्रनायक व इतर पानाच्या निवेदनात साखळी-सलगता (Chain continuity) अतिशय आवश्यक असते. तसे न झाल्यास कादबरीचा

गोफ तुटका-तुटका दिसतो, व ती ' कादंबरी ' उरत नाही. ' युगप्रवर्तक ' कादबरीत नेमका हाच दोष प्रकर्षाने जाणवतो. कादवरीतील अकरा निवेदनाचे साधे जुळलेले नाहीत. इतकेच नव्हे तर आचार्य मोरेश्वर दोंदे, भाऊराव गायकवाड, आर. डी. भडारे, पी. एन्. राजभोज व हरीभाऊ पगारे याच्या निवेदनातून दोन-चार फुटकळ आठवणी सोडल्या तर बाबासाहेबांचे व्यक्तिमत्त्व समर्थपणे उभ्या करणाऱ्या घटना अजिबात नाहीत. आहेत ती सर्व भाषणे किंवा वरील व्यक्तीचे बाबासाहेबाविषयीचे वैयक्तिक आदरयुक्त उद्गार ! आचार्य दोंदे यांच्या निवेदनातील दोन आठवणी सोडल्या तर बाकी सर्व निवडणुकीच्या प्रचार दौऱ्याचा रुक्ष वृत्तांत आहे. भाऊराव गायकवाड याच्या निवेदनात तर स्वकर्तृत्वाचाही डंका केलेला आढळतो भाऊराव गायकवाडाच्या दोन प्रकरणी निवेदनात पहिले प्रकरण आबेडकराविषयी आदर व्यक्त करण्यासाठी व दुसरे प्रकरण स्वकर्तृत्वाच्या प्रदर्शनासाठी योजलेले आढळते. (हे निवेदन श्री. हरिभाऊ पगारे यानीच लिहिलेले आहे की श्री. भाऊराव गायकवाडानी लिहिले आहे ? अशी शंका येते) श्री. आर. डी. भंडारे याच्या चौदा प्रकरणी निवेदनात मागे सागितल्याप्रमाणे अकरा प्रकरणे धर्मांतराविषयीच्या भाषणाने व्यापलेली आहेत. उरलेल्या तीन प्रकरणापैकी पहिल्या प्रकरणातील पाडवलेण्याच्या सदर्भातील आठवण व ' पंढरपुराचे पाडुरगाचे मदिर म्हणजे भगवान बुद्धाचे मदिर आहे ' हे बाबासाहेबाचे उद्गार यामुळे हे प्रकरण चागलेच लक्षात राहते. तथापि दुसऱ्या प्रकरणात वरळी मैदानावरील भाषणाचे निमित्त करून गाधी निषेध, बाबासाहेबाची जयंती, बाबासाहेबाचा पचावन्नावा वाढदिवस आणिक कितीतरी घटनाचा उल्लेख करून ओढून ताणून चद्रबळ जमवावे तसे दुसरे प्रकरण जमवले आहे यामध्येही ' स्व ' वास आहेच ! पी. एन. राजभोज याच्या निवेदनातही मागे सागितल्याप्रमाणे भाषणांचा सुकाळ व स्वकर्तृत्वाची टिमकी आहेच. श्री. हरिभाऊ पगारे याच्या द्विप्रकरणी दहाव्या भागात, पहिल्या प्रकरणामध्ये निम्यापेक्षा अधिक भाग नाशिक वर्णनानेच व्यापला आहे (पान २८८, २८९), अन् तोही इतका रुक्षपणे, की आपण प्रसिद्धी खात्याचे ' महाराष्ट्र दर्शन ' तर वाचत नाही ना अशी शका येते ! आचार्य अत्र्याच्या भागात बाबासाहेबाच्या अत्यविधीप्रसंगी केलेले संपूर्ण भाषण व अग्रलेखाचे काही भाग दिलेले आहेत. हे सर्व एवढे स्पष्टपणे एवढ्यासाठीच लिहिले की ही सर्व प्रकरणे ' कादबरी 'च्या जवळपाससुद्धा फिरकत नाहीत. वरील सर्व व्यक्तीची निवेदने श्री. हरिभाऊ पगारे यानी लिहिली नसावीत अशी एक शका आहे; पण मग ती ' युगप्रवर्तक ' या ' कादवरीत ' चपखलपणे अजिबात बसत नाहीत. ती सर्व ' डॉ. बाबासाहेब आबेडकर गौरव ग्रंथात ' चागली शोभतील ! या सर्व कादवरीत रमाबाई आबेडकरानी निवेदिलेल्या आठवणी चागल्याच उठून दिसतात. त्या निवेदनात श्री. हरिभाऊ पगारे याच्या ओघवती व रसाळ भाषेचा प्रत्यय येतो. तसाच तो डॉ. आबेडकराच्या निवेदनात व पंडित

रेवाराम कवाडे यांच्या निवेदनातही जाणवतो. (तथापि भाषणे उद्धृत करण्याचा मोह श्री. पगारे यांना आवरत नाही.) त्यामुळे बाबासाहेबांचे थोडेफार सामाजिक जीवन व गृहस्थी जीवनाचे यथार्थ दर्शन घडते. 'चवदार तळ्याचा' सत्याग्रह व धर्मांतर-समारंभाचे वर्णन श्री. पगारे वेधक शब्दात करतात; परंतु श्रीमती रमाबाई आंबेडकरांच्या निवेदनात बाबासाहेबांच्या विक्षिप्त स्वभावाच्या संदर्भात 'कणकीच्या गोळ्याची' आठवण (पान ६१) घातली नसती तर अधिक बरे झाले असते.

आत्मनिवेदनात्मक पद्धतीच्या कादंबरीचे निकष लावल्यास वरील दोष ठळकपणे दिसतात. कोणतीही ललितकृती, कादंबरी, कथा, काव्य लिहिताना लेखकाने त्यात मिसळून जावे, जसे सूर मिसळतात अस्सल गायकाचे तानपुऱ्यांच्या झंकारात! कादंबरीकार त्रयस्थ राहिल्यास साहित्यकृती एकात्म प्रत्यय देऊ शकत नाही याचा प्रत्यय 'युगप्रवर्तक' या कादंबरीत काही ठिकाणी येतो. उदाहरणार्थ, बाबासाहेबांच्या अंत्ययात्रेचे वर्णनात व्यक्तींची नामनिर्देशमालिका एकाद्या वार्ताहराप्रमाणे टिपून ठेवली आहे. नेत्यांच्या व अनुयायांच्या जंत्र्या देण्याचा दोष कादंबरीत अनेक ठिकाणी झाल्यामुळे एकात्म प्रत्यय (Homogeneous experience) येऊ शकत नाही. कादंबरीकाराने वार्ताहराची भूमिका घेतल्यासारखे जाणवते व कादंबरीचे भान सुटते. श्रीमती रमाबाई आंबेडकरांचे व्यक्तिमत्व उभे करताना कित्येक वेळा श्री. पगारेच त्यांच्या तोंडून बोलतात. उदाहरणार्थ, प्रकरण दोन, पान ४९ वर '...पण लंडन ते मुंबई बोटीचा खर्च झेपण्यासारखा नव्हता, म्हणून कमी खर्चाच्या प्रवासाचा मार्ग त्यांना शोधून काढावा लागला. हा कमी खर्चाचा मार्ग




म्हणजे लिव्हरपूल ते कोलबो, कोलंबो ते मद्रास आणि मद्रास ते मुबई हा होय !' नवव्या वर्षीच लग्न झालेल्या अशिक्षित रमाबाई हे बोलतील हे अशक्य !

डॉ. बाबासाहेब आबेडकरांच्या सपूर्ण जीवनाचे यथार्थ दर्शन घडावे एवढा थेटपणा या कादंबरीत नाही. या कादबरीत त्याच्या कार्यकर्त्यांशिवाय राजकीय पुढाऱ्याशी सबध फक्त महात्मा गाधीशीच दाखविला आहे. अन् तोसुद्धा असा की ते जणू एकमेकाचे हाडवैरी होते ! गाधी-आबेडकराचे राजकीय मतभेद जरूर होते, पण राजकीय मतभेद व व्यावहारिक वैर यात फरक असतो. महात्मा गाधी आबेडकराचा परदेशात जाणूनबुजून अपमान करतील (पान ११२) हे जसे शक्य वाटत नाही तसेच डॉ. आबेडकर 'लडन-टाईम्स'ची प्रत गाधीच्या अगावर फेकून (पान ९७) त्याचा उपमर्द करतील हेही असभवनीय या दोन्ही गोष्टी अतिशयोक्त काल्पनिक वाटतात. शिवाय म. गाधी सोडून पडित नेहरू व इतर समकालिन नेत्याशी बाबासाहेबाचे सबंध आलेच नाहीत का ? बाबासाहेबांचा द्वितीय विवाह सुखकारक नव्हता हे सर्वश्रुतच आहे. त्यासबधी अनेक कड्या पण पिकवल्या जातात. या द्वितीय विवाहामुळे बाबासाहेबाना आलेली मानसिक बेचैनी एके ठिकाणी पुसट आढळते, पण ती तेवढीच !

कादबरीतील मुद्रणदोष दाखविणे हे साहित्य-समीक्षात्मक मूल्यात बसणारे नसले तरी मुद्रण-दोषाचे प्रमाण अधिक असल्यामुळे त्याचा उल्लेख करणे आवश्यक वाटते. पान १०९ वर प्रकरण १६ च्या सुरुवातील 'गावी मला घाबरत होते. काँग्रेस पुढारी मला बिचकत होते...' अशी वाक्ये आहेत. यात पहिल्या वाक्यात 'गावी' ऐवजी 'गाधी' हवे हे पुढची वाक्ये सदर्भात आल्यावर लक्षात येते. अगदी नाही म्हटले तरी या व अशा मुद्रण-दोषाशी वाचकांची तद्री अडखळत नाही असे कसे म्हणता येईल ?

या सर्व गोष्टीमुळे 'युगप्रवर्तक' या कादंबरीत 'कादंबरी' म्हणून व 'सपूर्णपणा' म्हणून अपुरेपणा राहिलेला आहे. त्यामुळे बाबासाहेबांच्या जीवनावरील चरित्र – कादबरी हे आव्हान अजूनही शिल्लक आहे. मराठीतील लेखकानी व 'दलित-साहित्य प्रवर्तकानी' आपल्या कक्षा रुदावून हे आव्हान जरूर स्वीकारावे. ◻

**युगप्रवर्तक : हरिभाऊ पगारे : अनिल प्रकाशन, मुंबई : किंमत बारा रुपये.**




हिटलरच्या मनात काय खदखदत आहे हे फ्रेंच नेत्यांना ठाऊक नव्हते असे नाही. परंतु पराभूत मनोवृत्तीने पछाडलेल्या या नेतृत्वाला हिटलरकडे डोळे-झाक

## वि. स. वाळिंबे

## लेखांक : बारा

करण्याशिवाय दुसरे काही करता येण्यासारखे नव्हते. सारा देशाचा देश जिद्द गमावून बसावा, सेनानींना मरगळ आलेली असावी, एरवी सुजाण समजले जाणारे नेतृत्वही खचून गेलेले असावे अशी फ्रान्सची त्यावेळची अवस्था होती.

त्यामुळेच ऱ्हाईनलँडमध्ये सैन्य घुसविण्याच्या दृष्टीने हिटलरची तयारी सुरू असल्याच्या बातम्या वारवार कानावर येऊनही 'शेवटी सर्व काही ठीक होईल' या स्वप्नरजनात फ्रान्स मश्गुल होऊन गेला होता.

व्हर्सायचा करार हा तर जर्मन लोकमत प्रक्षुब्ध करण्याचा हिटलरच्या हातातील हुकुमाचा एक्का होता. या कराराचा देखावा करून, पहिल्या महायुद्धातील विजेत्या राष्ट्रांनी जर्मनीची जी विटबना केली आहे ती पार धुऊन टाकून जर्मनीला पूर्वीची प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचे ऐतिहासिक कार्य पार पाडण्यासाठीच आपण सर्व-सत्ताधीश झालेलो आहोत असा हिटलरचा प्रारंभापासूनचा दावा होता. या ऐतिहासिक कार्याच्या साक्षात्कारापायीच त्याची राक्षसी महत्त्वाकांक्षा चेतविली गेली होती. १६ मार्च १९३५ या दिवशी हिटलर गरजला—"व्हर्साय करारानुसार जर्मनीवर ज्या लष्करी अटी लादण्यात आल्या आहेत त्या आम्ही आता लाथेसरशी ठोकरून लावणार आहोत."

'व्हर्साय—करारातील लष्करी तरतुदी' या शब्दसहितेचा अर्थ स्पष्ट होता. त्या करारानुसार जर्मनीच्या लष्करी सामर्थ्यावर जी मर्यादा घालण्यात आलेली होती ती मानायची हिटलरची तयारी नाही हे जसे या घोषणेने स्पष्ट झाले होते तसेच ऱ्हाईनलँडमध्ये सैन्य ठेवण्याबाबत जर्मनीला करण्यात आलेली मनाई हिटलर धुडकावून लावणार आहे हेही ओघानेच आले होते.

फ्रान्सने भानावर यावे अशी ही घोषणा होती

कारण ऱ्हाईन नदीच्या डाव्या काठावरील जर्मन प्रदेश फ्रान्सच्या नियंत्रणाखाली आला पाहिजे अशी व्हर्साय—कराराच्या वाटाघाटी चालू असताना मार्शल फॉश याने मागणी केली होती आणि ती अँग्लो—अमेरिकनांना मान्य नसल्यामुळे त्यांनी तडजोड म्हणून, ऱ्हाईनलँडचे निर्लष्करीकरण करण्याची तरतूद करारामध्ये

अंतर्भूत केली होती. ही तरतूद करण्यामागचा उद्देश स्पष्ट होता. जर्मनीला एकदम फ्रान्सवर आक्रमण करणे शक्य होऊ नये यासाठीच हा फ्रान्स आणि जर्मनी यांच्या दरम्यान 'निर्लष्करी टापू' निर्माण करण्यात आलेला होता. या निर्लष्करी ऱ्हाईन-लँडच्या बळावरच फ्रान्सने पोलंड आणि चेकोस्लोव्हाकिया या पूर्व युरोपीय राष्ट्रांशी मैत्रीचे करार केले होते. जर्मनीने जर आपल्या या पूर्वेकडील शेजाऱ्यांवर आक्रमण केले तर फ्रान्सला लागलीच आपली सेना निर्लष्करी ऱ्हाईनलँडमधून, जर्मनीचे औद्योगिक हृदय मानले गेलेल्या आणि शस्त्रास्त्रांच्या कारखान्यांनी गजबजलेल्या ऱ्हुर प्रांतापर्यंत नेता येईल, असा त्यामागचा हिशोब होता. व्हर्सायच्या कराराने ऱ्हाईनलँडबाबत लादलेली अट १९२५ मधल्या लोकार्नो–कराराच्या वेळी जर्मनीने आपण होऊन मान्य केली होती.

व्हर्साय करार उधळून लावायला निघालेला हिटलर लोकार्नो–कराराला काय किंमत देणार हे सर्वांनाच माहीत होते. त्यामुळे 'व्हर्साय–करारातील लष्करी तरतुदी आम्ही यापुढे मानणार नाही, असे हिटलरने जाहीर करताच युरोपमध्ये एकच खळबळ उडाली. लागलीच त्याने आपला पवित्रा बदलला. २१ मे रोजी राईशस्टागमध्ये बोलताना हिटलर म्हणाला, "व्हर्साय–करारातील सर्व प्रादेशिक तरतुदी आम्हाला मान्य आहेत. इतकेच नव्हे तर लोकार्नो–करारातील तरतुदीचंही आम्ही पालन करू"

हिटलरच्या या मानभावी घोषणेने युरोपची चागलीच फसगत झाली. हिटलर जरी आक्रमक भाषा वापरीत असला तरी व्हर्साय–करार उधळून लावण्याची त्याला हिंमत होणार नाही असा युरोपीय नेत्यानी या भाषणाचा स्वत ला सोयीस्कर ठरणारा अर्थ काढला. 'प्रादेशिक तरतुदी पाळू; लष्करी तरतुदी तेवढ्या आम्हाला मान्य नाहीत' या भूमिकेचा नेमका अर्थ काय होतो याचा विचार करण्याची त्यावेळी कोणालाच गरज वाटली नाही.

एकीकडे हिटलर जाहीर रीतीने असे सागत होता की ऱ्हाईनलँडच्या निर्लष्करी-करणाबाबत जर्मनी खळखळ करणार नाही आणि आपल्या सेनानींना त्याने दिलेले आदेश वेगळीच भाषा बोलत होते. तो वरिष्ठ सेनानींना सारखे बजावत होता– 'ऱ्हाईनलँड पुन्हा आपल्याला ताब्यात घ्यायच आहे. त्यादृष्टीनं तयारीला लागा.' हा कार्यक्रम अखेरपर्यंत गुप्त राहिला पाहिजे असाही हिटलरचा कटाक्ष होता. तो आपल्या लष्करी सल्लागाराना सागत होता, "ऱ्हाईनलँड ताब्यात घ्यायचा कार्यक्रम इतराना किंचितही पूर्वकल्पना न देता आणि विजेच्या वेगानं आपल्याला पार पाडायचा आहे; म्हणून वरिष्ठ हुद्द्यांवरचे सेनानी वगळता इतर कोणाशीही याबाबतीत चर्चा होता कामा नये. ऱ्हाईनलँड आपल्या ताब्यात आल्यानतरच असं काही घडलं आहे हे जगाला कळावं."

आपल्या या कार्यक्रमाचा इतराना सुगावा लागू नये म्हणून हिटलरने कितीही

काळजी घेतली असली तरी यासंबंधीच्या बातम्या इतरांच्या कानावर येत होत्या. १९३४ च्या ऑक्टोबरमध्ये जॅन दोब्ले या कोलोनमधल्या फ्रेंच प्रतिनिधीने पॅरिसला धाडलेल्या अहवालामध्ये, ऱ्हाईनलॅंडबाबतच्या हिटलरच्या मनसुब्याचा उल्लेख केला होता. १२ एप्रिल १९३५ रोजी दोब्ले याने धाडलेल्या अहवालामध्ये तर ऱ्हाईन-लॅंड ताब्यात घेण्यासंबंधीच्या योजनेचा तपशीलही ग्रथित करण्यात आला होता.

दोब्लेच्या या इशाऱ्याची पॅरिसने मुळीच दखल घेतली नाही. इतकेच काय पण त्याला त्याच्या या पत्रांची साधी पोचदेखील देण्यात येत नव्हती. मग आणखी माहिती काढण्यासंबंधी दोब्ले याला उत्तेजन द्यायचे दूरच राहिले.

दोब्लेप्रमाणेच बर्लिनमधला फ्रेंच राजदूत आन्द्रे फ्रान्कोईस-पोन्से यानेही आपल्या परराष्ट्रखात्याला ऱ्हाईनलॅंडबाबत अगोदरच जागे केले होते. हिटलरच्या मनात नेमके काय आहे हे जाणून घेण्यासाठी फ्रान्कोईस-पोन्से मुद्दामच हिटलरच्या भेटीला गेला होता. त्यावेळी फ्रान्स आणि रशिया याच्या दरम्यान परस्पर-मदतीच्या वाटाघाटी सुरू होत्या. त्यामुळे फ्रान्कोईस-पोन्से याला पाहताच हिटलर भडकला. तो म्हणाला, ' रशियाशी करार करून फ्रान्सन फार मोठा गुन्हा केलेला आहे. '

हिटलरच्या या वाक्यावरून फ्रान्कोईस-पोन्से याला अचूक अर्थबोध झाला. ऱ्हाईनलॅंडमध्ये आपले सैन्य घुसवायला हिटलरला काही तरी सबब हवी आहे आणि फ्रान्स-रशिया कराराचा तो यासाठी उपयोग करणार आहे हे फ्रान्कोईस-पोन्से याने ताडले. त्याने लागलीच पॅरिसला पत्र लिहिले—' ऱ्हाईनलॅंड ताब्यात घेतल्याशिवाय हिटलर स्वस्थ बसणार नाही अशी माझी आता खात्री झालेली आहे. ' यानंतर ३१ डिसेंबरच्या पत्रातही फ्रान्कोईस-पोन्से याने या विषयाचा प्रदीर्घ उहापोह केला होता. ऱ्हाईनलॅंडमध्ये चौक्या उभारण्याचे कार्य जर्मनीने सुरू केल्याचे वृत्त लष्करी माहितीखात्याकडून सरसेनानी जनरल गामेलिन यालाही याच सुमारास कळविण्यात आले होते.

१९३६ साल उजाडले तेव्हा, हिटलर आज ना उद्या ऱ्हाईनलॅंडचा लष्करी कबजा घेणार आहे हे फ्रेंच सरकारला आणि सेनानीना कळून चुकले होते. हिटलरच्या या महत्त्वाकांक्षी धोरणासंबंधी फ्रान्स कोणते धोरण स्वीकारतो हाच महत्त्वाचा प्रश्न होता.

आपल्या एकट्याच्या बळावर काहीही करण्याची फ्रेंच नेतृत्वामध्ये हिंमत नव्हती. फ्रान्सची सारी भिस्त ब्रिटनवर होती. ब्रिटनने जोर केला तर फ्रान्स त्या आवाजात आपला सूर मिळविणार इतकेच. त्यातून यावेळी ब्रिटनने फ्रान्सला न कळविताच जर्मनीशी नाविक करार केलेला असल्यामुळे फ्रान्सला ब्रिटनचा मुळीच भरवसा उरलेला नव्हता. तरीदेखील ऱ्हाईनलॅंडबाबतच्या हिटलरच्या धोरणासंबंधी ब्रिटनची भूमिका कळावी म्हणून ११ जानेवारी १९३६ या दिवशी फ्रेंच प्रधान-

मंत्री लाव्हल याने लंडनमधील आपला राजदूत कोर्बिन याला तार धाडली— ' हिटलर सत्तेवर आल्याचा तीस जानेवारीला वर्धापनदिन आहे. ऱ्हाईनलँड ताब्यात घेऊन हा वर्धापनदिन साजरा करण्याचा हिटलरचा विचार असल्याचे समजले. म्हणून यासंबधीची ब्रिटनची प्रतिक्रिया कळवावी. ' परतु कोर्बिनला ब्रिटनची प्रतिक्रिया कळू शकली नाही.

जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात ब्रिटनचे राजे पाचवे जॉर्ज याचे निधन झाले. त्याच्या अंत्यविधीला उपस्थित राहण्यासाठी परराष्ट्रमंत्री फ्लान्द लंडनला गेला होता. लडनमधल्या वास्तव्यामध्ये फ्लान्द याने प्रथम परराष्ट्रमत्री अँथनी ईडन याच्याशी आणि नंतर प्रधानमत्री स्टॅन्ले बाल्डविन याच्याशी हिटलरच्या संभाव्य आक्रमणासबंधी विचारविनिमय केला.

फ्लान्द याने बाल्डविनला विचारले, ' जर्मन सैन्य ऱ्हाईनलँडमध्ये घुसलं तर ब्रिटन काय करील ?'

बाल्डविन याने प्रतिप्रश्न केला, ' फ्रान्स काय करील हे आम्हाला आधी सम-जावून घ्यावं लागेल. '

फ्लान्द उत्तरला, ' हिटलरच्या या कारवाईचा आपण प्रतिकार केला पाहिजे असं मला वाटत. '

बाल्डविनने पुन्हा विचारले, ' मला फ्रेंच सरकारचं मत जाणून घ्यायचं आहे. '

फ्लान्द म्हणाला, ' पॅरिसला गेल्यावर मी कळवतो. '

फ्लान्द पॅरिसला गेल्यानंतर काय कळविणार आहे हे ब्रिटिश नेत्यांना माहीत होते. त्यामुळे, ऱ्हाईनलँडबाबत ब्रिटन आणि फ्रान्स यानी हिटलरशी वाटाघाटी कराव्यात असे ईडन याने फ्लादला सुचविले. याचा अर्थ असा की हिटलरबाबत ब्रिटन आणि फ्रान्स यांच्या त्यावेळच्या धोरणामध्ये काहीही फरक नव्हता. हिटलरच्या आक्रमणापासून युरोपला वाचवायचे असेल तर त्याचे पहिलेच पाऊल रोखले पाहिजे हे फ्रान्सप्रमाणे ब्रिटनच्याही ध्यानात आले नाही. हिटलरपुढे लोटांगण घालून त्याला राजी राखण्याचीच ब्रिटनची धडपड सुरू होती.

संघर्ष टाळण्याचा प्रयत्न करणारे राष्ट्र अखेरीस एका मोठ्या संघर्षाच्या विळख्यात आपोआप सापडले जाते हे तेव्हा बाल्डविन याला उमगले नव्हते.

मध्यतरीच्या काळात लाव्हल याने त्यागपत्र दिले होते आणि सारॉंत प्रधान-मन्त्रिपदावर आरूढ झाला होता. लंडनहून पॅरिसला परतताच फ्लान्द सारॉंत याला म्हणाला, " ऱ्हाईनलँडमध्ये जर्मन सैन्य घुसलं तर त्या सैन्याला हुसकावून लावण्या-इतकं आपल्याशी लष्करी सामर्थ्य आहे किंवा नाही याचा खुलासा होण्यासाठी सर्वोच्च लष्करी समितीची बैठक बोलावण्यात आली पाहिजे. "

फ्लांदच्या मागणीनुसार सर्वोच्च लष्करी समितीची बैठक भरली. फ्लान्दने पहिला प्रश्न विचारला, " हिटलरचं सैन्य ऱ्हाईनलँडमध्ये येऊन उभं ठाकलं तर

त्याला तेथून मागं पिटाळण्यासाठी आपल्याला काय करता येईल ?"

युद्धमंत्री मॉरिन उत्तरला, "आपण काहीही करू शकणार नाही."

"का ?"

"मॅजिनो तटबंदीचा आधार घेऊन आक्रमकाला अडविणं एवढंच कार्य आपलं लष्कर करू शकत. ऱ्हाईनलॅंडमध्ये जाऊन जर्मन सैन्याशी मुकाबला करण आपल्या लष्कराला जमणार नाही."

युद्धमंत्र्याचे हे शांत उत्तर ऐकून फ्लान्दला धक्काच बसला. दुसऱ्या दिवशी मंत्रिमंडळाची बैठक भरलेली असताना फ्लान्द याने तेथेही ऱ्हाईनलॅंडचा विषय काढला. ऱ्हाईनलॅंड जर्मनीच्या ताब्यात जाऊ नये याबाबत सगळेच मंत्री आग्रही होते. पण हे साध्य कसे करायचे हे कोणी सांगू शकत नव्हता. शेवटी राष्ट्रसंघाच्या मार्फत हा प्रश्न धसास लावावा असे फ्रेंच मंत्रिमंडळाने ठरविले.

युद्धमंत्री मॉरिन याने १२ फेब्रुवारीला फ्लांद यास पत्र लिहून ऱ्हाईनलॅंड ताब्यात घेण्याच्या दृष्टीने हिटलरची तयारी कोठवर झालेली आहे याचा त्याला आपल्या माहितीखात्याकडून मिळालेला तपशील कळविला. ते पत्र वाचल्यानंतर फ्लान्द याने मॉरिनला विचारले, "अशा परिस्थितीत आपण काय करावं असं तुला वाटत ?"

मॉरिनने उत्तर दिले—"आपल्यापुढे एकच मार्ग आहे. आपण जर्मनीविरुद्ध राष्ट्रसंघाकडे तक्रार दाखल करावी."

युद्धमंत्र्याप्रमाणे इतर मंत्रीही हिटलरबाबत बेफिकीर होते. मार्सेल दिएत हा नव-समाजवादी पक्षाचा कार्यकर्ता त्यावेळी वायुदलमंत्री होता. त्यानेही फ्लान्दला कळविले—'हिटलरनं ऱ्हाईनलॅंड ताब्यात घेतल की लगेच तो फ्रान्सवर हल्ला करील असं समजायच मुळीच कारण नाही. त्यामुळे आपण जर ऱ्हाईनलॅंडमध्ये प्रवेश करणाऱ्या जर्मन सैन्याला रोखण्याचा प्रयत्न केला तर अकारण युद्ध मात्र ओढवून घेऊ."

या कालखंडामधील गमतीची गोष्ट अशी की जर्मन सेनानींना मात्र फ्रान्सची भलतीच भीती वाटत होती. ऱ्हाईनलॅंडचा प्रश्न निघाला की ते हिटलरला सांगायचे, "आपण जर ऱ्हाईनलॅंडचा सक्तीनं ताबा मिळविण्याचा प्रयत्न केला तर फ्रान्स आपलं सारं सामर्थ्य ऱ्हाईनलॅंडमध्ये एकवटून आपल्याशी झुंज घेईल. फ्रान्सचं लष्करी सामर्थ्य मुळीच उपेक्षणीय नाही. त्यामुळे ऱ्हाईनलॅंडबाबतचा जुगार आपल्याला महाग पडेल असं आम्हाला वाटतं."

हिटलर उत्तर द्यायचा, "राजकारण करायचं म्हणजे जुगार खेळलाच पाहिजे."

हिटलरची ही धमक पाहिली की त्याचे सेनानी गप्प बसत. फ्रेंच नेतृत्वामध्ये नेमक्या याच गोष्टीची उणीव होती. ऱ्हाईनलॅंड ताब्यात घेण्याबाबत हिटलरचा निश्चय झालेला आहे अशा बातम्या निरनिराळ्या ठिकाणचे फ्रेंच प्रतिनिधी पॅरिस-

कडे धाडीत असतानाही पॅरिसमधील राजनैतिक आणि लष्करी नेतृत्व शरणागतीच्या धोरणाचाच पुरस्कार करीत होते. कोलोन येथील जॅन दोब्ले तर स्वतः पॅरिसला येऊन इत्यंभूत माहिती सांगायला तयार होता. परंतु दर वेळी त्याला नकार कळविला जाई. शेवटी १९३६ च्या फेब्रुवारीमध्ये प्रधानमत्री सारॉत याने दोब्लेला पॅरिसमध्ये बोलावून घेतले. दोब्लेने सागितले. "ऱ्हाईनलँड ताब्यात घेण्याबाबतची हिटलरची सारी तयारी पूर्ण झालेली आहे."

डसेलडोर्फ येथला फ्रेंच प्रतिनिधी हेन्री नोअेल याने १३ फेब्रुवारी रोजी फ्लान्द याला तार केली – 'ऱ्हाईनलँड ताब्यात घेण्यासाठी जर्मन सेनाधिकारी इथं येऊन पोचले असून लोकांना अगोदर सुगावा लागू नये म्हणून सध्या ते लष्करी वेशाऐवजी साध्या वेशात वावरत आहेत.'

ही तार वाचल्यानतर फ्लान्द याने युद्धमंत्र्याला सागितले, "आता तरी आपल्याला तातडी केली पाहिजे. ऱ्हाईनलँडमध्ये जर्मन सेना पोचायच्या आत आपली पथकं तिथं गेली पाहिजेत."

युद्धमंत्री मॉरिन सबबी सागण्यामध्ये हुषार होता. तो फ्लान्दला म्हणाला, "त्याऐवजी फ्रान्स आणि रशिया याच्यातील कराराला मंजुरी देण्याचं कार्य तुम्हीच पुढं ढकलावं हे बरं. कारण या कराराची सबब सांगूनच हिटलर ऱ्हाईनलँडमध्ये सैन्य घुसविणार आहे ना ?

मॉरिनचे हे उद्‌गार ऐकल्यानतर फ्लान्द संतापला. तो म्हणाला, "आमच्या लष्कराला लढण्याशिवाय सगळं काही येतं."

आपली सारी तयारी पूर्ण झाली आहे याची खात्री पटल्यानंतर हिटलर युरोपच्या राजकारणातील पहिला जुगार खेळायला उभा राहिला. ७ मार्च १९३६ च्या पहाटे जर्मन सेनेने ऱ्हाईनलँडमध्ये प्रवेश केला. प्रथम या बातमीवर विश्वास ठेवायला फ्रेंच नेत्याची मुळीच तयारी नव्हती पावणे दहा वाजता पॅरिसमधल्या लष्करी कचेरीत पहिली बातमी आली–' ऱ्हाईनलँडमध्ये जर्मन सैन्य शिरू लागले आहे.' लगेच दुसरा निरोप आला–' तरीदेखील परिस्थिती काळजी करण्याजोगी नाही'

जर्मन परराष्ट्रमत्री बॅरन कॉन्स्टन्टीन फॉन न्युराथ याने बर्लिनमधल्या फ्रेंच, ब्रिटिश आणि इटालियन राजदूताना बोलावून घेऊन सांगितले, 'फ्रान्सनं रशियाशी करार करून लोकार्नो–तहाचा भंग केलेला आहे. फ्रान्सच्या या वर्तनाबद्दलचा आमचा निषेध व्यक्त करण्यासाठी आम्ही ऱ्हाईनलँडमध्ये प्रतीकात्मक पाऊल उचललं असलं तरी युरोपमध्ये शातता नादावी अशीच जर्मनीची इच्छा आहे. ही शांतता कशी टिकेल याचाच आपण सर्वांनी विचार करायचा आहे.'

त्यादिवशी राईशस्टागमध्ये बोलतानाही हिटलरने हाच शांततेचा पाठ म्हटला

होता–' दुसऱ्याची भूमी गिळंकृत करावी असं आमच्या मनात कधीही येत नाही. जर्मनीकडून शाततेचा भंग होणार नाही अशी मी ग्वाही देतो.'

जर्मन सैन्य ऱ्हाईनलँडमध्ये शिरल्याचे कळताच प्रधानमंत्री सारॉत याने काही निवडक मंत्र्याना ताबडतोब विचारविनिमयासाठी बोलावून घेतले. परराष्ट्रमंत्री फ्लान्द, युद्धमंत्री जनरल मॉरिन्, खात्याचा राष्ट्रसघविषयक मत्री पॉल–बोन्कोर आणि टपालमत्री जॉर्ज मान्देल या चौघा मंत्र्याबरोबर सरसेनानी जनरल गामेलिन ह्याही या बैठकीला हजर होता. ऱ्हाईनलँडमध्ये घुसलेल्या जर्मन सेनेला पिटाळून लावण्यासाठी आपण तातडीने हालचाल केली पाहिजे असे या बैठकीत सुचविले जाताच सरसेनानी गामेलिन म्हणाला, "आपल्याला जास्तीत जास्त काय करता येईल हे मी सांगतो. प्रथम रजेवर गेलेल्या सैनिकांना बोलावून घ्यावं लागेल आणि मग आपण आपल सैन्य आपल्या सीमेवर नेऊन ठेवू शकू. म्हणजे जर्मन सैन्य आपल्या प्रदेशामध्ये घुसणार नाही एवढी दक्षता घेणं आपल्याला शक्य आहे."

गामेलिनचे हे उत्तर ऐकताच सारॉत चपापला. तो म्हणाला, "चढाईचं नाव घ्यायला देखील सरसेनानी तयार नाही! ऱ्हाईनलँडमध्ये घुसलेल्या जर्मन सैन्यावर हल्ले करण्याची योजना नाही! फ्रान्सच्या दृष्टीनं काही गंभीर घडत आहे याबद्दल आपलं युद्धखातं निष्काळजी आहे हे पाहून आश्चर्य वाटतं."

पॉल-बोन्कोर गामेलिनला म्हणाला, "तू आताच्या आता मेन्झ गाठावंस असं माझं सांगणं आहे."

गामेलिन उत्तरला, "तो वेगळा प्रश्न आहे. ठीक आहे. मी तुमच्या म्हणण्याप्रमाणं वागायला तयार आहे. पण तेवढ लष्कर कुठं आहे?"


# मुजऱ्याचे मानकरी

## ब. मो. पुरंदरे

### तीन रुपये

राजहंस प्रकाशन

नंतर सारॉंत याने गामेलिनला विचारले, "फ्रान्सनं एकटयानंच जर्मनीविरुद्ध पाऊल उचललं तर काय घडू शकेल असं तुला वाटतं ?"

गामेलिन म्हणाला, "जर्मनीच्या तुलनेन आपलं सामर्थ्य फारच कमी पडेल."

कोणताही निर्णय न करता ही बैठक समाप्त झाली.

या बैठकीला हजर राहण्यासाठी फ्लान्द आपल्या कचेरीतून बाहेर पडण्यापूर्वी पॅरिसमधला ब्रिटिश राजदूत सर जॉर्ज क्लार्क त्याच्या भेटीला आला होता. तो फ्लान्दला म्हणाला, "ब्रिटनशी चर्चा केल्यावाचून फ्रान्सन ऱ्हाईनलॅंडबाबत कोणतीही लष्करी कृती करू नये अस माझं तुम्हाला सागणं आहे. आज शनिवार असल्यामुळे आमचे मत्री आपापल्या ग्रामीण निवासस्थानी गेलेले आहेत. म्हणून सोमवारी आपण या प्रश्नाचा विचार करू."

ऱ्हाईनलॅंडमधील आपला बदोबस्त पक्का करायला हिटलरला अनायासे अठ्ठेचाळीस तास मोकळे मिळणार होते. म्हणून फ्लान्द याने लडनमधला आपला राजदूत चार्लस कोर्बी यास तार केली–'दोन दिवस वाया घालविणे घातक ठरणार आहे हे ब्रिटिश सरकारला पटवून दे." या तारेचा काहीही उपयोग होणार नव्हता. कारण ऱ्हाईनलॅंडच्या प्रश्नावरून हिटलरला दुखवायचे नाही या ब्रिटनच्या धोरणात फ्लान्द याच्या तारेमुळे फरक पडणार नव्हता.

सायकाळी सहा वाजता सारॉंतने पुन्हा मत्रिमडळाची बैठक बोलविली. या बैठकीला आरमारमत्री फ्रान्सुआ पिएत्री आणि वायुदलमत्री मार्सेल दिएत हेही हजर होते. पुन्हा एकदा तपशीलवार चर्चा झाली आणि शेवटी ठरले काय तर हा प्रश्न आपण राष्ट्रसघाकडे सोपवावा.

पॉल रेनॉसारखे काही अपवाद वगळले तर ऱ्हाईनलॅंडबाबत जर्मनीला दुखवावे असे फ्रान्समध्ये कोणालाही वाटत नव्हते. यादृष्टीने डाव्या आणि उजव्या पक्षाच्या प्रतिक्रिया वाचण्यासारख्या आहेत. 'ऑक्सियॉं फ्रान्सेज' या उजव्या गटाच्या वृत्तपत्राने लिहिले–'रशियाला खूष करण्यासाठी हिटलरविरुद्ध युद्ध पुकारणे घातक ठरणार आहे. कारण आता जर फ्रान्स हिटलरशी लढायला उभा टाकला तर त्याचा फायदा केवळ बोल्शेव्हिक रशियाला होणार आहे' 'पोप्युलेर' या समाजवादी पत्राने म्हटले होते–'हिटलरने व्हर्सायचा करार फाडून टाकला असला, अनेक आश्वासने मोडली असली तरी शाततेबद्दल आपल्याला आस्था आहे 'असे तो म्हणत आहे. आपण त्याच्या शब्दावर विश्वास ठेवून ऱ्हाईनलॅंडसबधीचा प्रश्न राष्ट्रसंघाकडे सोपवावा."

'ले मेतॅं' या पत्राने तर ऱ्हाईनलॅंडमध्ये सैन्य घुसविल्याबद्दल हिटलरचे आभार मानले होते. फ्रान्सला साम्यवादी सकटापासून वाचविण्यासाठी हिटलरच्या या लष्करी कारवाईचा खचित उपयोग होईल असा विश्वास या पत्राने आपल्या अग्रलेखात व्यक्त केला होता.

ऱ्हाईनलॅंडचा ताबा घेणाऱ्या जर्मन पथकाना पिटाळून लावण्याचा आपण प्रयत्न

केला तर कदाचित युद्ध भडकेल या भीतीने फ्रान्स त्यावेळी गप्प बसला. परंतु ही भीती सर्वस्वी अनाठायी होती. फ्रान्सविरुद्ध युद्ध पुकारण्याची हिटलरची त्यावेळी हिंमतच झाली नसती. खुद्द हिटलरनेच एके ठिकाणी म्हटले आहे, 'जर फ्रेंच सैन्य त्यावेळी ऱ्हाईनलँडमध्ये घुसलं असतं तर आमच्या सैनिकाना ढुंगणात शेपूट घालून तेथून पळून जावं लागलं असतं. कारण फ्रेंच सरकारशी मुकाबला करावा एवढी आमची तयारी नव्हतीच मुळी. ऱ्हाईनलँडमध्ये सैन्य घुसविल्यापासूनचे पुढचे अठ्ठेचाळीस तास मी जेवढा अस्वस्थ होतो तेवढी अस्वस्थता मी आयुष्यात कधीही अनुभवलेली नव्हती. कारण ऱ्हाईनलँडमधून जर मला माघार घ्यावी लागली तर कदाचित आपली राजवटही कोसळेल हा धोका मला माहीत होता.'

जनरल आल्फ्रेड जोड्लसारख्या निष्णात जर्मन सेनानीनेही अशीच कबुली दिलेली आहे. तो म्हणतो–'त्यावेळी आमची अवस्था अशी होती की फ्रेंच लष्करानं आमचा पार धुव्वा उडवला असता.'

हिटलरला रोखण्याची ही पहिली संधी फ्रान्स आणि ब्रिटन यांनी गमावली आणि त्यामुळेच त्यांनी पुढची अनर्थ-परंपरा ओढवून घेतली. एकदा सुरू झालेली घसरगुडी पुढे कोणालाच थोपविता आली नाही, तशी ती थोपविता येतही नसते.

हिटलरने या घटनेचा अचूक फायदा उठविला नसता तरच नवल. ७ मार्चला त्याने ऱ्हाईनलँडचा कबजा घेतला आणि लागलीच २९ मार्चला जर्मनीमध्ये सार्वमत घेण्यात आले. या सार्वमतामध्ये नव्याण्णव टक्के जर्मन नागरिकानी हिटलरच्या कृत्याचा पाठपुरावा केला होता. आपल्या सेनानीचा विरोध बाजूला सारून हिटलर पहिला जुगार खेळला आणि तो त्याने जिंकला. आता तो खऱ्या अर्थाने जर्मनीचा सर्वसत्ताधीश झाला होता. हिटलरची भाग्यरेखा नव्या तेजाने झळाळू लागली होती.

फ्रेंच नेतृत्वाला याचा पत्ताच नव्हता. लवकरच होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये आपण विजयी कसे होऊ याच काळजीमध्ये उजवे आणि डावे पक्ष गढून गेले होते. ऱ्हाईनलँडमध्ये फ्रेंच लष्कराने हस्तक्षेप केला तर आपल्याला ही निवडणूक जिंकणे कठीण जाईल या कारणासाठी डाव्या पक्षांचा लष्करी हस्तक्षेपाला विरोध होता तर या हस्तक्षेपामुळे रशिया शिरजोर होईल या भीतीपायी उजवे पक्ष शांततेचा पुरस्कार करीत होते.

फ्रान्स कसा वाचवायचा याची त्यांच्यापैकी कोणालाच फिकीर नव्हती.

(क्रमशः)




सुधाकर राजे

## ◘ ‘ माणूस ’च्या ‘ समग्र ’तेचा धूर

‘ माणूस ’ हे एक ‘ समग्र ’ नियतकालिक आहे अशी गेले कित्येक दिवस संपादकांच्या प्रमाणे माझीही गैरसमजूत होती. पण आता ती दूर झाली आहे. कारण ‘ माणूस ’च्या समग्रतेत कोणती महत्त्वाची उणीव आहे याचा मला नुकताच पत्ता लागला आहे. न्यूगिनीमधल्या लोकाना स्वतःची सिगारेट स्वत.च वळायची सवय असते हे लक्षात घेऊन तेथे प्रकाशित होऊ घातलेल्या एका पाक्षिकाच्या संपादकाने म्हणे आपल्या भावी वाचकाना अशी हमी दिली आहे की पाक्षिकाचा कागद सिगारेट वळण्याच्या दर्जाचा ठेवण्याची खास काळजी घेतली जाईल. आता बोला, सपादक ! तुम्ही ‘ माणूस ’च्या वाचकाना दिली आहे अशी काही गॅरंटी ? तुम्ही म्हणाल, ‘ माणूस ’ कथा, लेख, कविता, विनोद, समीक्षण, परीक्षण, निरीक्षण पुरवतो. — मान्य ! पण माणूसचा साधा अक तर सोडाच, पण अगदी दिवाळी अंक देखील सिगारेट सोडा साधी विडी वळायच्या लायकीचा तरी असतो का ? एकेकाळी सोन्याचा धूर निघणाऱ्या या देशात तुमच्या न्यूजप्रिंटचा धूर निघणे शक्य आहे काय ? माणूस ज्वलंत असेल, पण जळाऊ आहे काय ? नाही म्हणायला अस्मादिक माणूससाठी लिहिण्याच्या भरात भाजी आणायची विसरले की “ चुलीत घाला तुमचा तो माणूस ” अशी प्रेमाची सूचना आमची ही देते तेवढाच काय तो माणूस ज्वालाग्राही असल्याचा दावा करता येईल.

बरे, विडी–काडीला उपयोगी पडण्याइतकी ‘ माणूस ’की माणूसमध्ये एक वेळ नसली तरी यशस्वी पत्रकारितेचा आणखी एक महत्त्वाचा गुण तरी माणूसमध्ये आहे काय ? मला आठवते की काही वर्षापूर्वी लडन टाइम्सचा कागद रद्दी म्हणून वापरायच्या लायकीचा राहिला नाही अशी इग्लडमधल्या काही सुगृहिणीनी तक्रार केली होती. आता मला सांगा सपादक, रद्दी म्हणूनही माणूसचा दर्जा रद्दीच नाही काय ? स्त्री ही क्षणाची पत्नी व अनत काळची माता असते असे अत्रे सागून गेले. अगदी त्याच चालीवर मी तुम्हाला सागून ठेवतो की तुमचे कार्य हे क्षणाचे वर्तमानपत्र व अनंत काळची रद्दी निर्माण करण्याचे आहे. असे असताना लडन टाइम्सचा

गंभीर अवगूण माणूसमध्ये नसावा असे नाही तुम्हाला वाटत? पण हाय, काय सांगू, परवा आमचा रद्दीवाला मला चक्क म्हणाला, " साहेब, या चतकोर माणूसच्या रद्दीत काय पण प्राफीट नाय बगा!" माणूसचा ' सर्वांगीण ' दर्जा वाढविणे किती आवश्यक आहे याची आता तरी तुम्हाला जाणीव झाली असेल अशी आशा तुमच्या समस्त चाहत्यानी करावी काय? अहो आमची ही माणूसबद्दल ' चुलीत घाला ' अशी विधायक सूचना करीत असली तरी खरोखरीच माणूसच्या जोरावर कपभर चहा तरी करता येईल काय? तुम्हीच सांगा, माणूसला बदामी कोळशाची सर येईल काय? नाही! मला अत्यत खेदाने असे म्हणावे लागते की तेवढी प्रगती करायला अजून माणूसला बरीच तपश्चर्या करावी लागेल. पण हिंमत हरू नका. आपल्या डोळयासमोर सतत असे उदात्त ध्येय ठेवा की माणूस समग्र झालाच पाहिजे. मग एक दिवस निश्चित असा उगवेल की माणूस कोळशालाच काय पण बरशेनलाही मागे टाकील.

## ¤ परमेश्वर व परदेशी तज्ज्ञ

प्राचीन भारतात परमेश्वराला जो भाव होता तोच भाव अर्वाचीन भारतात परदेशी तज्ज्ञाला आहे. पोलादाचा किंवा पेट्रोलियमचा कारखाना कसा उभारावा येथपासून मेंढ्या कशा पाळाव्यात येथपर्यंत अनेक गोष्टी शिकविण्यासाठी भारता-कडे सगळ्या जगातल्या तज्ज्ञांची रीघ लागलेली असते. अन् आता वर्तमानपत्रात अशी बातमी आहे की मोठमोठ्या हॉटेलातून स्वयंपाक करण्यासाठी परदेशी आचारी बोलवण्यात येणार आहेत. म्हणजे आता आहे की नाही? जेवण आणि जीवन याचा अभेद्य परस्पर-संबध लक्षात घेता भारतीयाचे जीवन आता परदेशी तज्ज्ञावर किती विसंबले आहे याचे हे प्रत्यतरच म्हणायचे. आता आमटीत मीठ जास्त पडले आहे किंवा भाजी अळणी झाली आहे अशी तक्रार करण्याची सोय नाही. कारण ताबडतोब] जबाब मिळायचा–" तुम्हाला त्यातलं काय कळतय्? अमेरिकन आमटी अन् रशियन भाजी अशीच असते." मला सर्वात मोठी काळजी पडली आहे ती म्हणजे दक्षिण आफ्रिकन दशमी आणि पोर्तुगीज पिठल-भात खायचा प्रसंग ओढवला तर पंचाइतच व्हायची.



पृष्ठ २३ वरून

खेडोपाडी उघडल्यास, एक तर तिथे मोठ्या बँकेइतके काम नाही. तिथली कामाची पद्धती वेगळी राहणार. राहाणीमानावरील खर्चही कमी राहणार. एकदर वातावरण बड्या शहरासारखे नसणार. मग तिथे नेमलेल्या कर्मचाऱ्याचे अगर अधिकाऱ्याचे लठ्ठ पगार, चैनी राहाणी जनतेच्या डोळ्यात खुपणार. राहाणीमानाच्या मानाने हाती पैसा विपुल येत असल्याने ही मडळी वाटेल त्या भावाने स्थानिक वस्तू विकत घ्यायला तयार असल्याने तेथील राहाणीचा खर्च वाढणार. त्यामुळे रहिवासी मंडळी या लोकाकडे आपुलकीने न पाहता मत्सराने पाहणार. आमच्या कोकणात दापोलीला कृषिमहाविद्यालय आले. त्यामुळे शे-पाचशे बाहेरची मंडळी गावात आली. गावाच्या राहाणीच्या मानाने त्याचे सर्वांचेच पगार मोठे. दापोलीच्या प्राध्यापकाला ८ रु. डझनाने हापूस आबे खरीदणे परवडते म्हणून तिथला भाव तितका चढला तर ? गावकरी या मडळीवर नाराज होणारच. घरभाडी, दूध, अंडी, कोंबड्या, आंबे, काजू, भाजी वस्तूचे भाव स्थानिक बाजारात वाढले. कृषिमहाविद्यालय मिळाले, त्याचा गावकऱ्याना फायदा हा ! बँकांच्या शाखाबाबतीत तसे होऊ नये, नव्हे होता नये. कारण जनसपर्कावर, लोकांच्या आत्मीयतेवर, विश्वासावर बँकेचा धंदा वाढणार. ते सामान्य नागरिकच जर बँकेकडे क्रुद्ध नजरेने पाहू लागले तर धंदा व्हायचा नाही. इतका महागडा स्टाफ छोट्या गावी ठेवणे बँकेला झेपणारही नाही. त्यादृष्टीने स्टेट बँकेच्या श्री. आर्. के. तलवार यानी केलेली सूचना इथे माडावीशी वाटते. शहरी बँकेतील कर्मचारी व अधिकारी आणि ग्रामीण भागातील शाखांचे अधिकारी व कर्मचारी यांची वेगळी वेतनश्रेणी हवी. ग्रामीण वेतनश्रेणी तिथल्या राहाणीशी, परिस्थितीशी, तिथल्या इतर व्यवसायातील उत्पन्नाशी निगडीत हवी. सरकारने नेटाने अशी वेतनश्रेणी तयार करायला हवी व राष्ट्रहिताकडे दृष्टी ठेऊन बँककर्मचाऱ्यांच्या संघटनांनी ती संमत करायला हवी. एकच वेतनश्रेणी हवी असेल तर ती ग्रामीण भागाशी मिळती जुळती असावी व शहरी भागास याशिवाय शे-दोनशे रुपयांचे भत्ते त्या ठिकाणच्या कर्मचाऱ्यांना द्यावेत. ग्रामीण भागात धंदा वाढवायचा तर ही तफावत दूर झाली पाहिजे, नाही तर सामान्य माणसे बँकेची पायरी चढायला कुचरतील.

राष्ट्रीयीकृत बँका विविध थरातील लोकांना, लोकगटांना, उद्योगांना पतपुरवठा करणार. पण कृषि पतपुरवठा आज सहकारी क्षेत्राकडे आहे तर छोट्या उद्योगांना अगर कारखानदारीला राज्यीय वा केंद्रीय फिनान्शीयल कार्पोरेशन्स् आज पतपुरवठा करतात. राष्ट्रीयीकरणाच्या उद्घोषात या राष्ट्रीयीकृत बँकानी गेल्या वर्षभरात सर्रास सर्वांना शेतकऱ्याना, छोट्या कारखानदाराना, स्वतंत्र धंदेवाल्याना

पतपुरवठा करण्याचा गदारोळ उठवला. बँक राष्ट्रीयीकरणाचे उद्दिष्ट साध्य होत असलेले जनतेच्या डोळचात लगेच भरण्याच्या दृष्टीने असे करणे सबधितांना योग्यही वाटले असेल. पण पतपुरवठचात असे अराजक उपयोगी नाही. त्यामुळे 'एकाच कर्जधारक गटाला कर्ज द्यायला अनेक तयार' असे चित्र गेल्या वर्षात दिसले. आमच्या क्षेत्रात राष्ट्रीयीकृत बँका ढवळाढवळ करतात. आमचा धंदा मारतात अशी तक्रार सहकारक्षेत्रातून व फिनान्स् कार्पोरेशन्सकडून ऐकू येऊ लागली आहे. खरे तर इथे चढाओढीचा प्रश्न नसून सामान्य माणसापर्यंत पतपुरवठा पोचविण्याचे राष्ट्रीय उद्दिष्ट गाठणे हेच या सर्व सस्थाचे ध्येय आहे. म्हणूनच सहकारी पत-पेढ्या वा सस्था, फिनान्स् कार्पोरेशन्स् व राष्ट्रीयीकृत बँका याची नाती नक्की करणे, व्यवहारात मेळ घालणे, कर्जवाटपात 'द्विदान' टाळणे अगत्याचे आहे. सरकारने हे शक्य तितक्या लवकर केले पाहिजे.

खुल्या बाजारातील व्याजाचा दर आणि बँकाचा व्याजाचा दर यात बरीच तफावत असल्याकारणाने, गेल्या वर्षात अनेक उपेक्षित क्षेत्रातील लोकाना बँकाची दारे पतपुरवठचाकरता उघडल्या कारणाने, बँकाकडे या नव्या कर्जदारानी झिम्मड उडविली परिणामतः जी गोष्ट सरकारी 'खात्यात' आजवर दिसत होती तीच गोष्ट राष्ट्रीयीकृत बँकाच्या व्यवहारात दिसू लागली. ती गोष्ट म्हणजे लाचलुचपत. विशेषतः लघुउद्योगाना कर्जे देताना या 'वजनाचा' सर्रास उपयोग झाला असे लोक बोलतात. एका दोघा कस्टोडिअन्स्नीही अशी लाचलुचपत बँक-क्षेत्रात सुरू झाल्याचे कबूल केल्यामुळे या गोष्टीला निराळा रग आला आहे. कर्जाच्या ५% हा लाचेचा दर होता असे वर्तमानपत्रानी जाहीरही केले आहे. या साऱ्या गोष्टी खऱ्या असतील तर ही दुर्दैवी घटनाच म्हणायला हवी. बँक क्षेत्रात दप्तर दिरंगाई, कागद साचविणे, अनिर्णय, लाचलुचपत, वशिलेबाजी, 'पुढारी' मडळीची ढवळाढवळ हे सरकारी 'गुण' येऊ नयेत म्हणून अतिशय जपणे आवश्यक आहे. असे असताना पहिल्याच वर्षात हा अनुभव यावा, अर्थमंत्रालयाला प्रत्येक बँकेत एक 'दक्षता विभाग' काढण्याची आज्ञा द्यायला लागावी ही फार वाईट गोष्ट आहे. हे 'बी-बियाणे' नव्या अर्थमत्र्यानी सुरुवातीलाच जाळून टाकले पाहिजे !

बँकाच्या विस्तारामुळे रोजगारी खूप वाढेल. प्रतिवर्षी निघणाऱ्या बँकाच्या नव्या शाखांतून २० हजार लोकाना तरी रोजगार मिळेल असे रिझर्व्ह बँकेच्या एका अहवालात म्हटले आहे. आजच स्टेट बँकेच्या पूर्व भागात ५०० अधिकाऱ्याच्या जागा, लायक-शिक्षित माणसांच्या अभावी रिकाम्या आहेत. इतर राष्ट्रीयीकृत बँकातही अशा जागा रिकाम्या असतील. शिवाय दरवर्षीची ही मागणी. या गोष्टी विचारात घेऊन 'भरती' व 'तान्त्रिक शिक्षण' याची फार मोठी यत्रणा राष्ट्रीयीकृत बँकाना लगेच उभी करायला हवी. शिक्षित नोकरवर्ग नसेल तर शाखा उघडणार कशा ? आज आहेत त्या सर्व योजना विचारात घेऊन अशी नवी यंत्रणा उभी करणे हा नव्या संचालक मंडळापुढील महत्त्वाचा प्रश्न आहे.

२२ ऑगस्ट १९७०

# धडपडे
# बडबडे
# मारकुटे आणि मंडळी



धडपडे बडबडे मारकुटे आणि मंडळी हे रत्नाकर मतकरीच्या बालनाटच संस्थेचे आठवे नाटक । १९६२ मध्ये सुरू झालेल्या या संस्थेने 'एक होती मुलगी,' 'राक्षसराज जिंदाबाद' 'निम्माशिम्मा राक्षस' यासारखी सुरेख बालनाटच सादर करून मुलाचे मनोरंजन केले. सुरुवातीस डुगडुगत्या आर्थिक पायावर उभ्या असलेल्या संस्थेस चार वर्षापासून अल्पशी सरकारी ग्रँट मिळू लागली. आधल्या वर्षीचे कर्ज फेडण्यासाठी पुढल्या वर्षीची ग्रँट घेणे हा या सरकारी मदतीचा उपयोग. कंपनी टिकवता आली हा मात्र या सरकारी मदतीचा मोठा फायदा. बालनाटच या विषयाकडे सरकार हल्ली थोडे तरी लक्ष देते त्यामुळे पुढे बालनाटचाबाबत चांगले आशादायक धोरण स्वीकारले जाण्याची शक्यता आहे. आजच्या मराठी रंगभूमीवर सर्व थरातील सर्व प्रकारच्या प्रेक्षकांच्या अपेक्षा पुऱ्या करणारी 'गिधाडा'पासून ते "म्हैवणी"पर्यंतची नाटके येतात. नवनवीन होणाऱ्या प्रयोगाचे मोठे कौतुक केले जाते. मोठ्याच्या करमणुकीबरोबर बालाचे मनोरजन व बालनाटच हा मात्र मराठी रगभूमीवरील बराचसा उपेक्षित भाग ! वॉल्ट डिस्नेचे चित्रपट बघून रत्नाकर मतकरी या तरुण कलाकाराचे बालरंगभूमीकडे लक्ष गेले. आपण असे काही रगीबेरगी, मुलाना रिझवणारे, हसवणारे आणि शिकवणारे रंगभूमीच्या माध्यमातून मुलाना काही देऊ शकलो तर ? ही कल्पना. एक नवी हालचाल म्हणून कलात्मकतेकडे लक्ष देऊन मुलाची मानसिक भूक भागवणारे, नेत्रदिपक तसेच जिवंत आणि ताजे, देवदूत, जादू, स्वप्न, आणि राक्षस याबरोबरच आईबाबा, बडाबबडी यासारखे, म्हणजेच वास्तव आणि स्वप्न याची सांगड घालणार असं मुलाचे आनंदी विश्व रंगभूमीवर तयार व्हावं या आत्यंतिक इच्छेतून बालनाटच सस्थेचा प्रपंच रत्नाकर मतकरी व सौ. प्रतिभा मतकरीनी उभारला.

धडपडे बडबडे मारकुटे आणि मडळी हे नाटक म्हणजे या सर्व प्रयत्नातून निर्माण झालेली 'निव्वळ करमणूक'. या प्रकारात मोडणाऱ्या आणि एकात एक गुफलेल्या तीन नाटुकल्या आहेत. नाटकाचे कथानक श्री. रत्नाकर मतकरी यांचे व

दिग्दर्शन सौ. मतकरी यांचे ! सौ. मतकरी यांनी अलकाझींकडे नॅशनल स्कूल ऑफ ड्रामाच्या शिष्यवृत्तीतून दिल्लीचा ३ वर्षांचा दिग्दर्शनाचा विशेष अभ्यास नुकताच पुरा केला आहे. अर्थातच दिग्दर्शनात त्यांची चुणूक दिसतेच. गडबडवाडीच्या तीन घटना तीन अंकात दाखवलेल्या या नाटकात मुलांना हवे असणारे सर्व काही आहे. आजची पिढी ही अधिक शास्त्रीय दृष्टिकोनातून विचार करते. नुसती जादू आणि परी यांनी त्यांची समजूत पटत नाही. त्यांना वास्तवतेची जाणीव अधिक असते. या नाटकात आईबाबा, आनंदा, त्याची मैत्रिण चिमा, देवदूत, मोराचे पीस, राजकन्या जादूगार, ससा हे सर्व आहेत. तुम्हाला आम्हाला वाटेल इतक्या सहजतेने येथे निरनिराळ्या काळातले हे सर्व प्राणी गुण्यागोविंदाने एकत्र वावरताना दिसतात. नाटकात एकात एक गुंफलेल्या अनेक कथात हे ससा, जादूगार, राजकन्या, देवदूत हे कुठेही उपरे वाटत नाहीत. मुलांना निदान हे सर्व सहज वाटते यातच कथानकाचे यश आहे. पुन्हा आनंदा हे सगळं स्वप्न हं अशी समजूत देवदूत आनंदाची आणि पर्यायाने बाल प्रेक्षकांची घालताना दिसतो. एकूण जादूई स्वप्नमंजरीचा फेरफटका करून आणून वास्तवतेची जाणीव ठेवून मतकरी हे सगळं स्वप्न बरका ! खरं नाही ! अशी समजूतही छान घालतात. दिग्दर्शनाबरोबर नाटकाचे कथानक, हीसुद्धा एक जमेची बाजू म्हणावी लागेल. नाटकाचा नायक आनंदा म्हणजे मी असे प्रत्येक मुलगा म्हणेल इतके कथानक साधे व जवळचे आहे. तसेच आकर्षक नेपथ्य व मधूर संगीताने नाटकाची रंगत वाढवली आहे.



रत्नाकर मतकरी
'खूप खूप करायचं अजून'

पडदा उघडल्यावर धडपडेंच्या अंगणात धडपडे कुटुंब उभे असलेले, समोर चिमाची आई, बडबडीण बाईंचे अंगण, बाग व मध्यभागी भूताचे घर असा हा देखावा मुलांना लगेच समजतो. येथे नेपथ्य व सेटस्‌मध्ये चकमकाट नसला तरी एका आनंदाची ही एक साधीसुधी गोष्ट असल्याने हा साधेपणा पटू शकतो. आनंदा धडपडेमुळे चोर पकडला जातो ही घटना पहिल्या अंकात आहे. आनंदाला नसलेल्या शिस्तीवरून डॉ. धडपडे व सौ. धडपडे याचे भांडण, उपाशी झोपण्याची आनंदाला शिक्षा, सौ. धडपडेंचे इकडून व सौ. बडबडेंनी तिकडून ताटलीत जेवण पाठवणे व चिमाआनंदाला कोणाला बोलू नका म्हणून सांगणे. समोरच्या भुताच्या ओसाड

घरातून एका माणसाने आनंदाकडे खायला मागणे, 'देव माणसाच्या रूपात येऊन परीक्षा घेतो व मग प्रसन्न होतो.' या आनंदा चिमाच्या विश्वासाने हा देव असेल म्हणून त्याला खायला देणे, या गुपचुप मामल्यात सौ. धडपडे व गडबडीण बाईंना भूताचा संशय. डॉ. धडपडेचा अविश्वास व त्यामुळे फौजदाराला बोलावणे व शेवटी फौजदाराने देवबाप्पा चोराला पकडणे असा हा पहिला अंक. मुलाचे मानसशास्त्र व प्रत्यक्षात घडणाऱ्या घटना मनाला पटू शकतात. डॉ. धडपडे, सौ. धडपडे, गडबडीण-बाई आनंदा व चिमा.. सर्वांचाच जिवंत अभिनय. मुलांना आवडणाऱ्या अनेक गमती विनोद येथे घडतात. थोड्याशा घडवल्या जातात. पण बालनाट्यात तेवढे चालावे...खाटल्याखाली लपलेल्या आनंदाला मारण्यासाठी खाटल्याखाली घुसलेले डॉ. धडपडे जेव्हा तेथेच अडकून बसतात तेव्हा मुलांना प्रचंड आनंद होतो. मला वाटतं 'बरी शिक्षा झाली आमच्या आनंदाला मारता काय' हा आनंद त्या टाळ्या पिटण्यात असावा. बाबा रागवल्यावर आईने चोरून खायला देणे हा घरोघर घड-णारा प्रसंग आहे. समअनुभूतीने नाटकाचे कथानक मुलापर्यंत पोचते आणि आनंदा-बद्दल बालप्रेक्षकांना अपार जवळीक वाटू लागते.

दुसऱ्या अंकाच्या तिसऱ्या घंटेबरोबर मुले टाळ्यांचा प्रचंड कडकडाट करतात. मुलांनो, पाहिलीत ना गडबडवाडीतील पहिली गम्मत, 'होऽऽ' नाट्यगृहातून हर्षयुक्त प्रतिसाद. आता पहा दुसरी गंमत. . मुलं उत्सुकतेनं बघू लागतात.... दोन देवदूत यांचं काम स्वप्न पाडण्याचे. दोघांचे विषय वेगळे. एकाचे आईबाबा ससा, राजकन्या तर दुसऱ्याचे लॉलीपाप जादुगार, साप, राजपुत्र! एकालाच दोघं स्वप्न पाडणार. पण कसे?...अंधारातून आनंदाच्या खोलीतला सीन दिसू लागतो. आनंदाच्या झोपायच्या खोलीत दोघही देवदूत उडत येतात. आनंदावर स्वप्नाचे सोनेरी कण शिंपडतात....स्वप्नील संगीत सुरू होते आनंदाला स्वप्न पडू लागते. आनंदाचा दवाखाना...आनंदा डॉक्टर होतो. आनंदा धडपडे A B C D E म्हणून ऐटदार पाटी. देवदूत कंपाउंडर. बाबाच्या चिडक्या कंपाउंडरला मंतरलेले लॉली-पॉपचे औषध, डॉ. धडपडेंवर आनंदाचा मानसोपचार (!) डॉ. धडपडे लहान मुलगा होतात. (हे लहान मुलं झाल्यावरचा अभिनय मधुकर नाईक यांनी सुरेख केला आहे. त्यांचे निरीक्षण मार्मिक आहे). भसाड्या आवाजाच्या लंगड्याच्या घशातून बेडूक काढून आनंदा ऑप्रेशनने कोकीळ ठेवतो तो गाऊ लागतो. गाऊ गाणी आनंदाची...थिएटरमधून उत्स्फूर्त ताल धरला जातो....आईबाबा, आनंदा, गडबडीणबाई चिमा देवदूत सर्व तालात नाचताना दुसरा अंक संपतो.

तिसरा अंक याच धरतीचा. नाटकातील नायक आनंदा धडपडेचे काम शैलेज हतंगडीने छान केले आहे. त्याचा अभिनय अतिशय बोलका आहे. मतकरींनी एक नवीन आशा या बालनाट्याच्या रुपाने रंगभूमीला दिली आहे. मिना कर्णिक (चिमा) शुभांगी नावरेकर (राजकन्या) अजय वठावकर (जादुचा गुलाम) यांनी सर्वांनीच



कसा चोर पकडला !

धिटाईने आणि सहजतेने आपापली कामं केली आहेत. अजय वठावकरचे छोटेसे काम जोरदार झाले आहे. पोरगा बाकी बोलतो रुबाबात आणि नाचतोही छान. लहानांपासून मोठ्यांपर्यंत (हे विशेष) सर्वांचे संवाद पाठ होते. मोठ्यांची कामे करणाऱ्यातले शैला बांगट (गडबडीणबाई), सौ. धडपडे (सौ. फडके), मधुकर नाईक (डॉ. धडपडे), दिलीप प्रभावळकर (मारकुटे मास्तर) ही सर्व मोठ्या नाटकात काम करणारी मंडळी या बालनाट्यातही रमून काम करतात. मुलांसाठी ही मंडळी आपली सगळी style बदलतात. मोठ्यांची कामे मोठ्यांनीच करावीत असे मतकरींचे मत योग्य आहे. सगळच चांगलं म्हणताना, पहिला अंक त्यामानाने सपक व कृत्रिम वाटतो असे म्हणावेसे वाटते.

या बालनाट्याच्या संयोजकांची, रत्नाकर मतकरींची अधिक मुलांना या निर्भेळ करमणुकीचा लाभ उठवता यावा या दृष्टीने धडपड होती. त्या दृष्टीने नाटकाचे दर हे खाऊच्या पैशातून मुलांना नाटक बघता यावेत इतके कमी ठेवले आहेत. अधिक मुलांनी यामध्ये आनंद लुटावा म्हणून शाळातून त्यांनी प्रयोग केले. परंतु शाळाचालकांची असहकाराची भावना. शाळातून मुलांच्या मनोरंजनाच्या दृष्टीने प्रयत्न केले जात नाहीत. यावद्दल मतकरींना खेद वाटतो. If the children can not go to the theatre, let the theatre go to children ही रत्नाकर मतकरींची कल्पना त्यामुळे फोल ठरली महागडी नाट्यगृहे, जाहिरातीचे दर, तिकीट दरात कपात या अष्टग्रहीतून बालरंगभूमीला कधी उर्जीतावस्था येईल का अशी शंका मनात निर्माण होते. बघू या आपले जागरूक सरकार, मुलांना निर्भेळ करमणूक देण्याची इच्छा असणारे शाळा चालक हा प्रश्न कसा सोडवतात ते ! तोपर्यंत बालनाट्यसारख्या गुणी व बालरंगभूमीची सेवा करणाऱ्या संस्थांना निदान कर्जफेड करण्यासाठी मदत होणारी सरकारी ग्रँट आहेच !

— सुचित्रा राजूरकर

## चित्रपट

# ज्योती

### प्रामाणिक चित्र

चित्रमित्र या संस्थेने 'ज्योती' या चित्रपटासाठी मोठा अवघड विषय घेऊन त्याची प्रामणिक मांडणी करण्याचा प्रयत्न केला आहे. विज्ञाननिष्ठ वृत्तीचा सूरज, आणि त्याची अंधश्रद्धाळू पत्नी राधा यांच्या संसारातील लहान-मोठ्या घटनांतून श्रद्धा व विज्ञाननिष्ठा यातील संघर्ष निर्माण केला आहे. घडणाऱ्या प्रत्येक प्रसंगा-भोवती या संघर्षाचे वलय आहे. किंवहुना हा संघर्ष निर्माण व्हावा अशा पद्धतीने पटकथेची मांडणी केली आहे.

सूरज हा एक सत्यप्रिय विज्ञानिष्ठ, आणि प्रत्येक गोष्ट तात्त्विक कसोटीवर घासून पहाणारा तरुण, आणि राधा ही परमेश्वरावर अपार श्रद्धा ठेवणारी तरुणी, पतीच्या नास्तिक वृत्तीमुळे, तसेच त्याच्याकडून वारंवार होणाऱ्या चेष्टेमुळे राधा काहीशी नाराज असली तरी आपल्या निष्ठांची ती काळजीपूर्वक जपणूक करीत असते. विवाहाला पाच वर्षे होऊनही घरात पाळणा हलत नाही म्हणून राधा आपल्या भावाच्या सांगण्याप्रमाणे एका साधू महाराजांच्या दर्शनाला जाते. पतीलाही बरोबर घेऊन जाते. सूरज केवळ औपचारीक भाग म्हणून महाराजांकडे जातो. परंतु आपल्या ऑफीसरच्या सल्ल्याप्रमाणे तज्ञ डॉक्टरकडून पत्नीची तपासणी करून घेतो. महाराजांच्या आशीर्वादाने असो अथवा डॉक्टरसाहेबांच्या उपचाराने असो घरात पाळणा हलतो. एक कुडमुड्या ज्योतिषी हा मुलगा महापापी ठरेल अशी भविष्यवाणी वर्तवतो. श्रद्धाळू राधा या घटनेचा धसका घेते. आणि मुलावर सुसंस्कार करून त्याला सश्रद्ध बनवण्याचा प्रयत्न करते. त्यातून गुंता वाढत जातो. आणि अखेरीस सत्यप्रिय सूरजला आपल्या आजारी मुलाला वाचवण्यासाठी —प्रत्यक्षात विमानतळावर तंत्रज्ञ म्हणून काम करत असतानाही त्याचे प्राण वाच-वण्यासाठी—आपण वैमानिक झालो आहोत असे खोटे सांगावे लागते. खोटेपणाचे हे नाटक असेच रंगवत असता सूरज विमान अपघातात सापडतो. प्राणापलीकडे प्रिय असणारा पती गमवावा लागल्यामुळे राधा खचून जाते. परमेश्वराच्या अस्तित्वा-वरील तिचा विश्वास साफ नाहीसा होतो. शोकमग्न संतप्त अवस्थेत राधा देव्हाऱ्यातील देवाला हात घालते. छोटा नंदन देवाला पुन्हा साकडे घालतो—' माझे

बाबा परत दे. मी पुन्हा काही मागणार नाही." आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे भीषण विमान अपघातात सापडूनही सूरज वाचतो. इतकेच नव्हे तर जीवन–मरणाच्या सीमारेषेवरून आपण ईश्वरी कृपेमुळेच जिवंत राहू शकलो अशी त्याची धारणा होते. आणि ईश्वराच्या अस्तित्वासंबंधी भलेमोठे प्रश्नचिन्ह पडद्यावर टाकून दिग्दर्शक चित्रपट संपवतो.



निवेदिता । संजीवकुमार

आजच्या सर्वसाधारण हिन्दी चित्रपटांपेक्षा हा चित्रपट अनेक दृष्टीने वेगळा आहे. तडजोड म्हणून कोणतीही गोष्ट चित्रपटावर लादलेली नाही. हाती घेतलेल्या विषयाशी दिग्दर्शक प्रामणिक आहे. तरीही चित्रपटाची कलात्मक पातळी फारशी समाधानकारक नाही. वातावरणनिर्मिती मोठ्या कौशल्याने केली आहे. चित्रपटाचा नायक एक तीन चारशे रुपये मिळवणारा तंत्रज्ञ आहे ही गोष्ट लक्षांत ठेवून त्याच्या घराची मांडणी केली आहे. वास्तवतेची ही पातळी हिन्दी चित्रपटांमध्ये क्वचितच पहावयास मिळते. दिग्दर्शक श्री. दुलाल गुहा यांचे दिग्दर्शन साधे, सरळ, धोपटमार्गी आहे. कथाविषयाशी प्रामाणिकपणा आणि वास्तवतेची एक विशिष्ट पातळी गाठण्यात त्यांनी यश मिळवले असले तरीही चित्रपटाची कलात्मक उंची वाढवण्यात ते कमी पडले आहेत.

कलाकारांपैकी संजीव कुमार (सूरज) व निवेदिता (राधा) यांना भरपूर वाव आहे. निवेदिताने काम समजून उमजून केले आहे. तर संजीव कुमारने सूरजची अवघड व्यक्तिरेखा समर्थपणे साकार केली आहे. त्याच्या अभिनयकौशल्याने चित्रपटाची उंची निर्विवादपणे वाढली आहे. छोट्या सूरजने आपले काम चोख बजावले आहे. जगदीप व अरुणा इराणी यांनी चित्रपटाच्या उपकथानकाची बाजू व्यवस्थित संभाळली असून ' रिलीफ ' देण्याची कामगिरी संभाळली आहे.

एस्. डी. बर्मन यांचे संगीत चित्रपटाच्या कथाविषयाशी एकरूप होणारे आहे. गाण्यांच्या चाली त्यांनी ठीक बांधल्या आहेत. चित्रपटाच्या तांत्रिक बाजूपैकी कॅमेरावर्क काही वेळा समाधान देऊन जाते. अन्य बाजू दुय्यम दर्जाच्या आहेत.

वेगळ्या विषयावरील प्रामणिक चित्रपट म्हणून 'ज्योती'चे स्वागत करावेसे वाटते.

—शरद गोखले

# अंदाज

पंडित वि. म. जोशी
ज्योतिष विशारद

२२ ते २८ ऑगस्ट १९७०

**मेष :** शनिवारी स्थावरासंबंधी शुभ घटना घडतील. अचानक धनलाभ होईल. घरात पाहुणे व मित्रमंडळी जमतील व दिवस आनंदात जाईल. सोमवार-मंगळवारी साहित्यिकांना यश मिळेल. सरकारी कामाकरता प्रवास करावा लागेल. वैद्यकीय साधने व औषधे तयार करणाऱ्यांची प्रगती मोठ्या प्रमाणात होईल. विद्येत यश येईल. संततीकडून थोडासा त्रास होण्याचा संभव आहे. बुधवार-गुरुवार पराक्रमाला चांगले आहेत. बुध-शुक्र उच्चनीच युती सहाव्या घरात आहे. मातुल घराण्याकडून आर्थिक मदत चांगली होईल. गुरू सप्तमातून तृतीयाशी ९।५ योग करतो. भावंडाकडून आर्थिक मदत होईल. मित्रमंडळी सेवेला हजर असतील. एकच अशुभ योग म्हणजे शनी-मंगळ केंद्रयोग. शनी लग्नात आहे. स्वभावात अतिशय हट्टीपणा येईल. शनिवारी घरात कोणी वृद्ध माणूस आजारी पडण्याचा योग आहे. शनीच्या वाईट फलाचा परिहार करण्याकरता दररोज १०८ गायत्री जप करावा. शुभ तारखा २४।२५।२६।२७.

**वृषभ :** शनिवार-रविवार सर्व बाबतीत धोकादायक. प्रत्येक बाबतीत काटचाचा नायटा होईल. भावंडांशी विरोध, पराक्रमाला कमीपणा, घरासंबंधी कटकटी. अशा सर्व बाजूंनी मन त्रासून जाईल. त्यातून साडेसाती, बारावा शनी व सहावा गुरु. गुरु सहावा वाईटच असतो असे नाही. तो धन स्थान व दशमाशी ९।५ योग करतो. त्यामुळे शेवटी प्रतिष्ठा व धन यात नुकसान येऊ देत नाही. बुध शुक्र उच्चनीच राजयोग पंचमात होतो आहे. हा योग विद्येत यश देईल. संततीचा बौद्धिक उत्कर्ष होईल. नाटच-दिग्दर्शकांना, नाटचक्षेत्रातील अगर सिनेमातील नटचांना जगापुढे येण्याला हा आठवडा चांगला आहे. या व्यवसायाच्या लोकांना धनलाभ अमाप होईल. नाटच-व्यवसायातल्या लोकांना धनलाभ चांगला होईल, पण त्याबरोबर थोडासा बदलौकिकही होण्याचा योग आहे. त्याचा परिहार होण्याकरता दररोज सकाळी शंकराचे दर्शन घेऊन एक बिल्वदल शंकराला वाहावे. शुभ तारखा २६।२७।२८.

**मिथुन :** शनिवार-रविवार हलक्या धंद्यात पुष्कळ पैसा अचानक हातात येईल. आधी मिथुन राशी फार धोरणी व लबाड असते. त्यात बुध-शुक्र चतुर्थात व गुरू पंचमात. समोर एकादशांत शनी-चंद्र. हलके धंदे करणारांना सर्व बाजूंनी फायदा

होईल. सरकारकडून सुद्धा त्रास होणार नाही. खटले झाल्यास अतिशय वजनदार व्यक्तीकडून ते मिटविले जातील. सोमवार-मगळवार चद्र बारावा होतो आहे. तो थोडा त्रास देईल. भावंडांशी मतभेद होईल. धद्यातील भागीदार थोडेसे बिथरतील. पण त्यांना चुचकारून घेणे जमेल. राहू-गुरु ९।५ योग व शनी गुरू समसप्तक त्यामुळे या सर्व घोटाळयातून बाहेर पडता येईल. वाईट धद्यातील सपत्तीत बाहेरचे वाटेकरी फार असतात. व शेवटी श्रमाच्या मानाने द्रव्यलाभ कमी होतो. त्यातून सुटण्याला मार्ग. गुरुवारचे उपवास करावे. आपोआप वृत्तीत फरक पडतो. हा उपवास Astro Medical म्हणून करावा. धार्मिक व्रत म्हणून करू नये. तरीही फायदाच होईल. गुरुवार-शुक्रवार सर्व बाबतीत चांगले आहेत. शुभ ता. २२।२३।२६।२७.

**कर्क :** शनिवार-रविवार उच्च पदस्थ राजकीय पुढाऱ्यांना अगर फार मोठ्या मिलीटरी ऑफिसरना अचानक अत्यत महत्त्वाच्या जागतिक प्रश्नात भाग घेण्या-करता परदेशात जावे लागेल. या राशीच्या व्यक्तीना सर्व आठवडाच शुभ असून हातून खळबळजनक घटना घडविणारा आहे एकादा नवविवाहित वर वधूबरोबर अमेरिकेत जाणे शक्य आहे. ही राशी सिंडिकेटची आहे. हरिश्चद्र, हिटलर, हिरो-हिटो. त्यांच्यात स्वार्थत्यागाची कल्पना पूर्णतया असते. हिटलरने काहीही स्वार्थ केला नाही. सोमवार-मगळवार मित्रपरिवाराबरोबर आनंदात दिवस जातील. मोठमोठ्या कॉन्ट्रॅक्टच्या धंद्यातील लोकांना धंद्यात यश मिळेल. विद्येत सपूर्ण प्रगता होईल. संततीचा उत्कर्ष होईल. घरात वडील माणसे विशेषत: वडील आजारी पड-ण्याचा सभव आहे. बुधवार-गुरुवार थोडासा शारिरीक थकवा येईल. पैसा खर्च होईल. वाचा शुद्धी जाईल. वकील लोकाना महत्त्वाच्या खटल्यात अपयश येईल. शुक्रवार सर्व बाजूनी चागला जाईल. शुभ तारखा २४।२५।२६।२७.

**सिंह :** सिंह खरा, पण या आठवड्यात त्याला शेळी बनावे लागणार! त्याला कारण त्याचे स्वत.चे केलेले चुकीचे अंदाज. शनिवार-रविवार भाग्येश. चतुर्थेश व्ययात व व्ययेश भाग्यात शनीबरोबर. प्रवासात अपघात होण्याचा योग. सरकारी अगर सार्वजनिक कामात सपूर्ण अपयश. फॅन्सी वस्तूचे व्यबसाय करणारांना तर दिवाळे निघण्याची वेळ येईल. कारण त्यांनी सपूर्ण हलक्या स्त्रियांवर विश्वास ठेवून धदा केला. बुधवार-गुरुवार गुरु चंद्र ९।५ तिसऱ्या व आकराव्या घरात होतो आहे. तो चागला आहे. मित्रांकडून आर्थिक मदत होईल. सकटांतून पार पाडता येईल. सोमवार-मंगळवार चंद्र दशमात उच्चीचा येतो आहे. तो व्ययेश आहे. चद्र-रवी ६।८।१२ या घराचे मालक असले तरी दोष नसतो. या दिवशी केलेले प्रयत्न यशस्वी होतील. विशेषत: इंडिकेटच्या व्यक्तीचे लग्नी रवी-केतू ग्रहण आहे. त्यामुळे प्रत्येक वेळी चुकीचाच मार्ग धरला जाईल. भागिदार आणि पत्नी नीट वागणार नाहीत. यावर उपाय म्हणजे दररोज सूर्याला बारा नमस्कार घालणे. शुभ ता. २४।२५।२६।२७.

**कन्या :** "मुखमें रामनाम और बगलमें छूरी" या वृत्तीची कन्या राशीची माणसे असतात. कधीही सरळ वागणार नाहीत. भाग्येश दशमेश लग्नेश आणि धनेश बुध-शुक्रांची युती लग्नात आहे. उच्चनीच राजयोग आहे. बौद्धिक व्यवसायात अनेक लफडी करून भरपूर धनप्राप्ती होईल. वकिलांना कमी प्रतीच्या व्यवसायातील खटल्यात मनमुराद पैसा मिळेल, मात्र यश मिळेलच असे नाही. शनिवार-रविवार सतती व संततीचा मित्रपरिवार याकरता पैसा खर्च करावा लागेल. संतती नीट वागणार नाही. विद्याभ्यासात यशप्राप्ती मोठ्या कष्टाने होईल. कापडाच्या व्यापारात फायदा होईल. छापखानेवाले, पुस्तक विक्रेते यांचा धंदा चांगला चालेल. भागिदार व पत्नी नीट वागणार नाहीत. सार्वजनिक कामात ता. २६।२७ ला भाग घ्यावा लागेले. त्यात मानमरातब मिळेल. राजकारणात ही माणसे फार पुढे असतात. पण सध्या बुध-गुरूचा गट निष्प्रभ झाला आहे म्हणून त्यांना यश मिळणार नाही. शुभ तारखा २५।२६।२७।२८.

**तूळ :** फार व्यवहारी राशी. मोजून मापून बोलणारी. चतुर्थेश शनी सप्तमात. सप्तमेश दशमात आणि दशमेश सप्तमात. लग्नेश-षष्ठेश, भाग्येश-व्ययेश बुध-शुक्र उच्चनीच. राजयोग व्ययात. असे सर्वच योग चागले आहेत. शनिवार-रविवार भागीदार व पत्नीकडून भाग्योदय होणाऱ्या गोष्टी होतील. नट-नटी, गायक, चित्रकलाकार सर्वांना चागले दिवस आहेत. संततीकडून त्रासदायक वागणूक होईल. सरकारी कामात यश मिळणे कठीण. या दृष्टीने सोमवार, मगळवार जरा जास्त त्रासाचे आहेत. बुधवार-गुरुवार कोणत्याही कामाला चागले आहेत. कारखान्याची माडामाड करण्याकरिता प्रवास घडेल. आरोग्याला थोडासा मधुमेहापासून त्रास होईल. ज्यांना मधुमेह असेल त्यानी सोमवार-मंगळवार काळजी घ्यावी. धनलाभ चांगला होईल. कमिशनवर काम कारणारांना जास्त फायदा होईल. वृत्तपत्र व्यवसायात असणाराना मोठेपणा प्राप्त होईल. सार्वजनिक कामात यश मिळेल. शुक्रवारी घरात काही शुभसमारभ घडून येईल. इडिकेट गटाचे काम करणाराना जास्त यश मिळेल. शुभ तारखा २२।२६।२७

**वश्चिक :** पूर्ण व्यवहारी. अध्यात्माचा अगर मानवतेचा लेश नाही. लग्नेश व षष्ठेश मगळ भाग्यात. दशमेश रवी दशमात. एकादशात सप्तमेश-व्ययेश व अष्टमेश-एकादशेश शुक्र-बुधाचा उच्चनीच राजयोग. धनेश-पचमेश व्ययात व तृतीयेश चतुर्थेश शनी सहाव्या घरात. असे सर्व ग्रहाना स्थानबल व योगबल आहे. नाटकी वागणुकीने स्वत:चा स्वार्थ साधता येईल. लहान-मोठे स्त्री-पुरुष मित्र सर्व कामात मदत करतील. सरकारी अधिकाऱ्यांना आणि राज्यकर्त्यांना आपल्या मनाप्रमाणे घटना घडविता येतील. शत्रूसुद्धा मदतीला धावून येतील. सोमवार-मगळवारी इडिकेटचा जय होईल. बुधवार-गुरूवार थोडेसे धकाधकीचे जातील.

संतती नीट वागणार नाही. विद्येत अपयश येईल. १३ ते १९ वयातील व्यक्तींना हा अनुभव जास्त येईल. ३६ च्या पुढील व्यक्तींना वातविकासाचा त्रास होईल. शुभ तारखा २२।२३।२४।२५।२८

**धन :** या राशीची माणसे फार महत्वाकांक्षी असतात. नेहमी असलेल्या परिस्थितीत समाधान मानीत नाहीत. शनिवार पंचमात शनी-चंद्र योग आहे. संततीला त्रास व विद्येत अपयश. अचानक धनलाभ होईल. सोमवार-मंगळवार अष्टमेश चंद्र सहाव्या घरात. लग्नेश-चतुर्थेश गुरू एकादशात. सप्तमेश-दशमेश बुध दशमात. षष्ठेश एकादशाबरोबर. भाग्येश रवी भाग्यात व व्ययेश पंचमेश अष्टमात. असा ग्रहांचा दौरा उदय गोलार्धातून होत आहे. ता. २४।२५ ला प्रत्येक बाबतीत प्रथम थोडा अडथळा येऊन नंतर यश येईल. सरकारी कामात व व्यापारात उत्तम यश मिळेल. कलाकार, पुस्तके विक्री करणारे, प्रकाशक, साहित्यिक याना मान-मरातब व मोठेपणा मिळेल. संततीकडून त्रासदायक वागणूक होईल. मेडिकल अगर मेकॅनिकल व्यवसाय करणाराना अपघाताचा योग आहे. प्रवास जपून करावा. भावंडांशी जमणार नाही. पत्नी व भागीदारांकडून संपूर्ण सहकार्य मिळेल. २६।२७ तारखांना घरात एखादा शुभ समारंभ होईल. शुभ तारखा २४।२५।२६।२७

**मकर :** या राशीच्या व्यक्ती चचल मनाच्या, बेपर्वा, स्वत.चेच गोडवे गाणाऱ्या व उद्धट असतात. लग्नेश-चतुर्थात, चतुर्थेश-सप्तमात व सप्तमेश ता. २२ ला चतुर्थात. हा अन्योन्य योग फार चागला आहे. या दिवशी मातुल घराण्याला माहिती असलेल्या व्यक्तीशी विवाहाबद्दल बोलणी होतील. दशमातील गुरू मानमरातब वाढवील. भाग्यातील बुध-शुक्र व पचमातील २४।२५ ला असणारा चंद्र विद्येत, साहित्यक्षेत्रात अचानक यशाचा मार्ग दाखवील. लिखाणाला प्रसिद्धी मिळेल.

---


# शिलंगणाचं सोनं

## आवृत्ती : तिसरी

**ब. मो. पुरंदरे**

**किंमत : तीन रुपये**

**राजहंस प्रकाशन**


---

धननाश होईल. राहू द्रव्याची अडचण उत्पन्न करील. ता २६।२७ ला भागिदार व पत्नीशी पटणार नाही. स्वतःची चूक असून हट्ट धरला जाईल. ता. २८ ला अचानक हलक्या धंद्यातील व्यक्तीकडून चागला धनलाभ होईल. सरकारी कामात कोर्ट-खटल्यात अपयश येईल. शुभ समारंभाकरता परगावी अध्यक्ष म्हणून अगर जबाबदार कार्यकर्ता म्हणून जावे लागेल. एकूण आठवडा उत्कर्ष करणारा आहे. शुभ तारखा २४।२५।२६।२७।२८

**कुंभ :** सार्वजनिक मोठेपणा मिळविण्याकरता घरच्या अगर जवळच्या माणसाशी वाईट वागायचे – ते सुद्धा मुद्दाम, त्याना सवय असते म्हणून. त्यात आता तर लग्नी राहू, तृतीयात लग्नेश शनी नीचीचा, षष्ठात मगळ, सप्तमात रवी-केतू, आष्टमात बुध-शुक्र व भाग्यात गुरू असे सर्व ग्रह् या स्वभावाला पोषक आहेत. सार्वजनिक कामात पूर्ण यश. घेराव अगर चलो दिल्ली करणाराना यश. सर्व राजकीय व सामाजिक चळवळीच्या पुढाऱ्यांना सपूर्ण यश. बाकी खाजगी जीवनात अपयश. भावडांशी भाडण. संतती वाईट वागेल. विद्येत अपयश. सुखनाश, भाग्यहानो, शत्रूचा त्रास, व्यापारात अपयश. सामाजिक दर्जाला कमीपणा. राग अनावर होईल. त्यावर ता. २३।२३ ला फार नियत्रग ठेवणे जरूर आहे फक्त भागिदार आणि पत्नी सहानुभूतीने वागतील. आमचे वाचक या उलट सुलट भविष्याबद्दल बुच-कळयात पडतील. पण तसे पडण्याचे काही कारग नाहा. हा शनी-रवी-चंद्राचा गट असतो. यांना खाजगी जीवनात सुख नसते: ' Unless man is devalued in domastic life, he never becomes public worker. ' शुभ तारखा २६।२७।२८

**मीन :** मीन राशीच्या स्वभावात एक दोष आहे. ते शत्रू करतासुद्धा प्रयत्न करतील. ज्यानी वाईट केले आहे तोसुद्धा मदत मागायला आल्यास त्याला मदत करतील. पण या आठवड्यात त्यांचीच त्रेधा तिरपीट होणार आहे. धनात शनी, धनेश व भाग्येश मगळ पंचमात. नीचीचा, सहाव्या घरात रवी-केतू, सप्तमात बुध-शुक्र, अष्टमात गुरू असे मगळाखेरीज सर्व ग्रह अशुभ स्थानातून भ्रमण करीत आहेत. धन नाश सपूर्ण. येणाऱ्या रकमा हातात पडणार नाहीत. हा अनुभव ता. २२ ला फार येईल. त्यातल्या त्यात थोडी धनस्थानात सुधारणा ता. २६।२७ ला होईल. मित्रांची मदत होणार नाही. हलक्या लोकांकडून अपमान. सामाजिक दर्जाला कमीपणा. स्त्रियांकडे हलकट वृत्तीच्या व्यक्तीकडून प्रेमविषयक मागणी केली जाईल. पत्नीशी बेबानाव होईल. सतती मात्र चांगली वागेल. विद्याभ्यासात यश येईल. प्रवासाचा योग येईल. त्यात फायदा होईल. अचानक धनलाभाचा योग आहे. हा योग ता. २८ ला जोरदार आहे. शुभ तारखा २६।२७।२८

□ □ □

उद्योगात शिरल्याने त्या विकल्या तर त्यानतर खालील पातळीवरील शेतकऱ्याना आर्थिक अडचणीमुळे जमिनी विकाव्या लागल्या.

पृष्ठ ११ वरील तक्त्याच्या अभ्यासावरून आपल्या लक्षात येईल की जवळजवळ ४२ टक्के खातेदाराकडे ७ टक्के सुद्धा जमीन नव्हती तर ५० एकरांपेक्षा जास्त जमीन असलेल्या ख तेदाराकडे एकूण सरासरी जेवढी जमीन असायला पाहिजे त्यापेक्षा सहापटीने अधिक जमीन होती.

कुळकायद्यातील कमाल मर्यादा ८ एकर बारमाही बागाईत, १६ एकर हगामी बागाईत व ४८ एकर जिराइत अशी ठेवण्यात आली होती खरी. पण १९६१ च्या कमाल धारण मर्यादा कायद्याने ही मर्यादा अनुक्रमे १२ एकर, २४ एकर व १२६ एकर अशी ठरविण्यात आली पण अशाच अनेक पळवाटाही ठेवण्यात आल्या. कमाल जमीन धारणा कायद्याखाली एकूण ११ लाख एकर जमीन उपलब्ध होऊ शकेल अशी अपेक्षा प्रथम करण्यात आली पण १७ जुलै १९६८ रोजी महाराष्ट्राच्या महसूल मत्र्यानी विधानसभेत जी माहिती दिली त्यावरून अशी फक्त १ लाख ४६ हजार एकर एवढीच जमीन उपलब्ध होऊ शकली. यात साखरकारखान्याची असलेली सुमारे ७० हजार एकर जमीन होती ती महामडळाकडे वर्ग करण्यात आली होती. राहिलेली ७० हजार एकर भूमिहीन शेतकऱ्याना वाटली जात असल्याचे त्यानी सागितले. पण या ७० हजारातील २० हजार एकर जमीन लागवडी योग्य नसल्याने फक्त ५० हजार एकर जमीनच काय ती भूमिहीनाच्या वाटपासाठी मिळू शकली.

कायदेशीरदृष्टया कमाल मर्यादेपेक्षा जास्त जमिनी खातेदाराच्या नावावर नसल्या तरी प्रत्यक्षात मात्र वरिष्ठ शेतकऱ्याच्या नियंत्रणाखाली बऱ्याच प्रमाणात अधिक जमीन असावी असे म्हणण्यास वाव आहे.

भूमिहीन शेतमजूराचा प्रश्न फारच गभीर आहे. कारण औद्योगिक वा बिगर शेती व्यवसायातही बेकारी वाढत असल्याने त्याना रोजगार मिळविण्यासाठी शेतजमिनीवरच अवलबून रहावे लागते. अशा परिस्थितीत त्याना रोजगारीची अनिश्चिती व कमी उत्पन्न याच्या कात्रीतून मुक्त करण्यासाठी कायमच्या जमिनी देणे आवश्यक आहे. अर्थातच महाराष्ट्र सरकारने याचा तत्त्व म्हणून स्वीकार केला आहे.

पुढील तक्त्यावरून या दिशेने महाराष्ट्र सरकारने केलेल्या प्रयत्नाची कल्पना येईल.

| भूमिहीनांसाठी उपलब्ध जमीन | लाख एकर |
|---|---|
| लागवडी योग्य पडिक जमीन | ६·०० |
| वन जमीन | २·७५ |
| सीलिंगमुळे मिळालेली जमीन | ०·६० |
| भूदान | ०·२६ |
| | एकून ९·६१ |

ही ९·६१ एकर जमीन सर्वच्या सर्व भूमिहीनाना द्यायची सरकारची तयारी नव्हती. तर त्यातील काही हिस्सा आजी व माजी सैनिक, धरणग्रस्त इत्यादींना द्यावा असे सरकारचे धोरण होते व त्यानुसार काही जमीन त्याना देण्यात आली. परतु हा प्रयत्नही फारच तोकडा असल्याचे पुढील माहितीवरून आपल्या निदर्शनास येईल.

१९६१ साली देशात जनगणना झाली आणि जनगणना अहवालानुसार महाराष्ट्रात भूमिहीन शेतकरी व मजूर याच्या कुटुंबाची सख्या १० लाख भरली. त्यापैकी ज्यांना पडिक व जंगल जमीन वा भूदानातील जमीन मिळाली त्याची सख्या आहे सुमारे ९१ हजार व त्यांना वाटण्यात आलेली जमीन होती ५ लाख ४० हजार एकर म्हणजे ९ लाख ६१ हजारातील उरलेली ४ लाख २१ हजार ही सर्वच्या सर्व जमीन जरी भूमिहीनांना वाटण्यात आली तरी हा प्रयत्न तोकडाच पडेल कारण यामुळे फक्त ८ हजार अधिक भूमिहीनाची सोय होऊ शकेल. त्यामुळे भूमिहीनांसाठी उपलब्ध केलेली सर्वच्या सर्व जमीन जेव्हा वाटण्यात येईल तेव्हा ती फक्त १·७३ लक्षानाच वाटली जाऊ शकेल. उरलेल्या ८ लाख २७ हजार भूमिहीनाचा प्रश्न कायम रहातोच. अर्थातच १० लाख भूमिहीन हा आकडा १९६१ सालचा आहे. यात आतापर्यंत अधिक भर पडली असण्याचीच शक्यता आहे.

त्यातच तज्ञांच्या दुसऱ्या एका पहाणीचा असा निष्कर्ष आहे की गेल्या आठ ते दहा वर्षात अनेक शेतमालकांना परिस्थितीने जमिनी विकणे भाग पाडले आहे. त्यामुळे आहे ही परिस्थिती कायम रहाणे, वाढवणे म्हणजे पुढील गंभीर प्रसगाला वाट करून देण्यासारखे आहे. योजना काळात शेतीविकासाला साह्य देण्यासाठी सरकारने काही कार्यक्रम आखले व सुधारलेल्या नवीन अवजाराची व उत्पादन पद्धतीची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोचविण्याची व्यवस्था केली. चागली खते व बी-बियाणे यांचा पुरवठा व कर्जही देण्याचा सरकारने उपक्रम सुरू केला. अवर्षण-काळात विनामूल्य पाणी उपलब्ध करून दिले व पंचायत समित्यांना तेल-इंजिनेही खरेदी करून दिली. पण दुर्दैवाने यातही फायदा फक्त बड्या शेतकऱ्यांचा झाला.

गेल्या काही वर्षात शेतीतील संपत्ती वाढली हे जरी खरे असले तरी तिचे

वाटप अत्यंत विषम प्रमाणात झाले आहे हे दाखविणारी माहिती व पुढील तक्ता इंडिकेट काँग्रेसचे एक ज्येष्ठ नेते श्री. हर्षदेव मालविय यांच्या 'इम्प्लिमेंटेशन ऑफ लँड रिफॉर्म्स' पुस्तकामध्ये आहे.

### शेतकऱ्यांच्या स्थावर-जंगम मालमत्तेची (टँजिबल अॅसेटस्) दर कुटुंबी आकडेवारी

१९५१–५२ व १९६१–६२

| शेतकऱ्याचा वर्ग थर | १९५१–५२ रुपये | १९६१–६२ | फरक |
|---|---|---|---|
| १. तळचा | २,३३९ | २,०९० | — १०·७ टक्के |
| २. वरचा | ८,३२१ | १४,७४८ | + ७९·२ टक्के |
| ३. सर्व शेतकरी (सरासरी) | ५,२८६ | ६,६०९ | + २५·१ टक्के |

वरील तक्ता दोन्ही शेतकऱ्यांच्या दोन्ही थरातील विषमता दाखविण्यास पुरेसा आहे. गेल्या सात वर्षात तळच्या सुमारे ३० टक्के शेतकऱ्याना त्याच्या जमिनी गमवाव्या लागल्या आहेत तर वरच्या २ टक्के शेतकऱ्याच्या जमिनी वाढल्या आहेत. याच आंदोलनाच्या निमित्ताने ठाणे जिल्हा व विशेषत: पालघर येथे जो सत्याग्रह व्हायचा आहे त्याची पार्श्वभूमी तपासण्याजोगी आहे.

पालघर येथे सुमारे २,००० एकर जमीन ब्रिटिश राजवटीत सन १८९० रोजी ९९९ वर्षाच्या भाडेपट्टीने देण्यात आली. ट्रस्टचे नाव "इरानियन झोरोस्ट्रीयन अजुमन ट्रस्ट" असे आहे. आज ही जमीन ट्रस्टने एका व्यक्तीला व त्यानतर तिच्या वारसाला गवत काढण्यासाठी दिलेली आहे व त्यामुळे ट्रस्टला मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा त्या खाजगी व्यक्तीला कितीतरी भरपूर उत्पन्न मिळत आहेत. एखाद्या ट्रस्टलाही कमाल जमीन धारण कायद्यातून का वगळावे ? या शेकडो एकर जमिनीच्या आसपास अनेक भूमिहीन शेतीचा तुकडा मिळविण्यासाठी धडपडत असतानाही वरील प्रकार चालणे अन्यायकारक आहे.

याचप्रमाणे ठाणे जिल्ह्यात एकूण दीड लाख एकर जमीन गवताच्या लागवडीखाली आहे. यापैकी निम्म्या जमिनीत जरी गवताची सघन लागवड केली तरी जेवढे उत्पन्न दीड लाख एकरातून मिळते तेवढे मिळू शकेल व उरलेली निम्मी जमीन अन्नधान्य लागवडीखाली आणता येईल. पण याही बाबतीत सरकारने उपेक्षेचे धोरण ठेवले असल्याचे दिसते.

सरकारने कसेल त्याची जमीन हे तत्त्व स्वीकारले आहे. पण प्रत्यक्षात न कसणारेच अनेकजण जमिनीचे मालक आहेत. महाराष्ट्रात आणि एक विषमता आहे ती म्हणजे

पश्चिम महाराष्ट्रापेक्षा विदर्भात कमाल धारणेची मर्यादा बरीच अधिक आहे. ही मर्यादा कमी करणे आवश्यक आहे. सामान्य जनतेचे हित पाहून काही प्रसंगी विरोधाला न जुमानता अशा प्रकारची विषमता नष्ट केली पाहिजे. येथे नमूद करण्यासारखी एक गोष्ट म्हणजे अनेक अडीअडचणी असूनही या क्षेत्रात गुजराथ महाराष्ट्रापेक्षा आघाडीवर आहे.


देशाचा विचार करता वरील प्रकारच्या शेतीवाटपामुळे देशातील सुमारे १ कोटी लोकांना रोजगार उपलब्ध करून देता येणे शक्य होऊ शकेल व शेतकऱ्यांना त्यांच्या कामात मदत करू शकतील अशा सर्वसाधारणपणे २ कोटी ग्रामीण वा शहरी युवकांनाही रोजगार मिळू शकेल. (उदा : अशिक्षित शेतकऱ्याला नव्या पद्धतीने शेती कशी करावी हे साऱ्यांना समजावून देण्याचे वा त्यासंबंधीचे लिटरेचर वाचून त्यांचे प्रश्न सोडविण्याचे कार्य ही तरुण मंडळी करू शकतील.)

म्हणूनच सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा विचार करता ग्रामीण भागातील विषमता नाहीशी करण्याकरिता जमिनीचे फेरवाटप आवश्यक ठरते. आजपर्यंत तरी या भूमि–आंदोलनामुळे कायदा व सुव्यवस्था धोक्यात आल्याचे दिसत नाही. मात्र जमीन वाटपाच्या दृष्टीने त्वरीत पाऊले न टाकल्यास पुढे मागे असा प्रसंग राजकीय पक्षांकडून व विशेषतः नक्षलवाद्यांकडून निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, १०२९ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS ( Weekly ) : 40 Paise : Regd. No. M-H 649



“ह्या झोपडपट्ट्या म्हणजे आपल्या देशाच्या परदेशातील उज्ज्वल प्रतिमेवरला डाग! ताबडतोब इथून हलवून परदेशी पाहुण्यांच्या नजरेला पडणार नाहीत अशा ठिकाणी हलवा पाहू ! ! ”